

डॉ. सुहास पेठे

बासरी

बासरी

(जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही मूलभूत चिंतनं)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* बासरी

पुस्तकरूपाने प्रकाशित पाचवी आवृत्ती : डिसेंबर २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

वास्तवातल्या विविध प्रश्नांचे
आणि
त्यावरच्या उत्तरांच्या चिंतनांचे
प्रातिनिधिक स्वर उमटवणारी
ही जीवनसंगीताची.....

बासरी

अशाच सहृदय, कृतिशील वाचकांना
सादर समर्पण...

– सुहास पेठे

... बासरी ...

अनुक्रम

१. माझा वाटा	.. ५
२. गणित : अभ्यासाचं आणि जीवनाचंही	..१०
३. चोरी !	..१४
४. नवे संसर्गजन्य रोग	..१८
५. अवघड शब्द	..२२
६. फोन : कटकटीचा की कौतुकाचा !	..२८
७. प्रेरणा !	..३१
८. मेक-अप्	..३६
९. आपुलकी भवन	..४२
१०. बदलांशी सुसंवाद	..५४
११. '..पाहिजेत..पण..!'	..६३
१२. 'घातक मालमत्ता !'	..८१
१३. बासरी	..९१

*

१. माझा वाटा

एका जुन्या योजनेबद्दल काही माहिती हवी होती. त्यातल्या त्यात माहीतगार मंडळींशी चर्चा झाल्यावर सर्वांनी बनोपंतांची शिफारस केली. जवळजवळ सर्व कामांच्या बाबतीत अखेर त्यांची मदत होत असे. तसे ते आता निवृत्तीला आले होते. मी या गावी बदलून आलो तेव्हा, आल्या दिवसापासूनच त्यांचा परिचय झाला होता.

आल्या दिवशीच असं झालं, मी अकरा वाजता येऊन कामाचा चार्ज घेतला. हजर झालो. कामाला सुरुवात केली आणि तासाभरातच आमच्या सेक्रेटरींनी मला वरिष्ठ कार्यालयाचा आलेला फोन घ्यायला सांगितलं. आमचे त्यांच्याही वरचे साहेब या रूटवर आज आहेत. कदाचित ते अचानकही विभागाला भेट देऊ शकतील, असा निरोप होता. अर्थात तयारीत राहायचं होतं. इथल्या प्रथाच काय, साधी ऑफिसची इमारतही मला नवीन होती. मी सेक्रेटरींनाच विचारून, ते आल्यास काय करावं, याची योजना करायला सांगितली. तेव्हा त्यांनी हारतुरे-गुच्छ, एखादा पेढ्याचा पुडा वगैरे सुचवलं. पण ते म्हणाले, 'आपण बनोपंतांचा सल्ला घेऊ.' मी औपचारिक चौकशी केली, हे कोण म्हणून. पण एक जुने अनुभवी क्लार्क आहेत एवढं कळलं. जास्त खोलात जायला आत्ता वेळही नव्हता.

तासातच सेक्रेटरी परत आले. त्यांनी दोन उपयुक्त सूचना आणल्या. एक तर, वरचे साहेब येतील, ही माहिती खासगीतली होती. त्याची कल्पना आहे, असं दाखवणं उचित नव्हतं. त्यामुळं हारगुच्छ वगैरे टाळावं. शिवाय ते साहेब वरचे असले, तरी त्यांना फॉरमॅलिटी आवडत नाहीत. एखादं फूलसुद्धा बास होईल. त्याऐवजी सामान्यांसाठी असलेल्या एका नवीन योजनेचा शुभारंभ करायचाच आहे, तो आपण त्यांच्या हस्ते करू. दुसरं म्हणजे आज चतुर्थ श्रेणीचे दोन कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना प्रेमाचा निरोप द्यायचा कार्यक्रम आधीच ठरला आहे. ते साहेब त्या वेळेत आलेच, तर तो त्यांच्या हस्ते ठेवू. त्यांच्या हातून निवृत्तिपत्र-चेक दिले, तर त्या कर्मचाऱ्यांना व साहेबांनाही खूप आनंद होईल.

मी सहज या साऱ्या योजनांचा विचार केला. वास्तविक अशा वेळी कुणाला काही सुचवलं की, ते साधारणतः काहीतरी वेगळं सुचवतात. पण ते व्यापाचं,

त्रासाचं असतं. मात्र या आलेल्या योजनांत कुठं तयारीची लगबग, खर्च, धावपळ, माणसं अकारण आपली कामं सोडून गुंतवणं-यांतलं काहीच नव्हतं. उलट होणाऱ्या गोष्टीही विधायक वाटल्या. म्हणून मी सेक्रेटरींना संमती, धन्यवाद दिले. 'एवढ्या वरच्या साहेबांचा स्वभाव तुम्हाला कसा माहीत ?', म्हणून मात्र विचारलं. ते म्हणाले, 'नाही. या साऱ्या कल्पना बनोपंतांच्या आहेत. त्यांनी या साहेबांबरोबर पंचवीस-तीस वर्षांपूर्वी काम केलं आहे.' माझ्या मनात अकारणच बनोपंतांची एक चांगली पण तयारीचे गृहस्थ अशी प्रतिमा तयार व्हायला लागली. पण पुढं कामांच्या नादात तो विषय राहिला.

फोनवरून आलेली सूचना मात्र खरी ठरली. साहेबांची गाडी ऑफीस सुटायच्या वेळी अचानक उपस्थित झाली. मला कळताच केबिनच्या दाराजवळ गेलो. बाहेरच्या शिपायानं आलेल्या साहेबांना सलाम ठोकताच त्यांनी हलक्या आवाजात विचारलेलंही मला ऐकू आलं, 'अरे, बनोपंत खुशाल आहेत ना ?' 'होय साहेब. एकदम बेस्ट, साहेब !' तेव्हाही मला पुन्हा थोडा धक्का बसला. एवढं अगत्य इतक्या मोठ्या पदावरच्या व्यक्तीनं कुणा कर्मचाऱ्याबद्दल दाखवावं, तेही आदरानं, प्रेमानं हे तसं दुर्लभच.

पण मी जरा निर्विकार राहिलो. कारण अनेक ऑफिसमध्ये काही लोक आपापली स्थानं निर्माण करून वर्षानुवर्षं बसलेले असतात. ते माहीतगार असले तरी त्यांच्या कलानं घेतलं तर ते उपयोगी ठरतात, नाही तर त्यांच्याइतका उपद्रव देणारं कुणी नाही, अशी अवस्था असते. म्हणून अशी व्यक्ती खरी कशी आहे, ते कळल्याशिवाय, या कुठल्या बनोपंतांना उत्साहानं विचारात घ्यायची माझी तरी तयारी नव्हती.

पुढं ठरलेले कार्यक्रम झाले. मात्र या कार्यक्रमात या बनोपंतांनी कुठं पुढंपुढं केलेलं दिसलं नाही. एक-दोनदा अडचण आली. प्रथम साहेबांचं स्वागत झालं. पण सत्काराच्या वेळी फूल जागेवर दिसत नाही म्हणताच, चटकन अगदी बागेतून ताजं खुडून आणलेलं आणि त्यांना आवडणारं साधं फूल पुढे आलं.

नव्या योजनेचा जिल्ह्यातला पहिला शुभारंभ म्हणून दीपप्रज्वलन करायचं ठरलं होतं. तिथं साहेबांना घेऊन जाण्यात आलं. दीपप्रज्वलन नेहमीप्रमाणं लावलेल्या

मेणबत्तीनं करायचं ठरलं होतं. त्याप्रमाणं तिथं मेणबत्ती ठेवलेली होती. पण ती लावायला माचिस-काड्यापेटी मात्र ठेवायची राहिली होती. त्यावरून तिथं गोंधळ व्हायच्या आत मागून केबिनच्या शिपायाबरोबर चांगली काड्यापेटी मेणबत्ती लावायला पाठवली गेलेली मी पाहिली. कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीच्या सत्काराच्या प्रसंगी आपल्याला हजर राहाता आलं, याचा साहेबांना झालेला आनंद कळत होताच. भाषणातही तो त्यांनी आवर्जून व्यक्त केला. माझ्या पदोपदी लक्षात येत होतं. ही सारी समयसूचकता आणि प्रसंगी सावरून घेणारा पुरवठा बनोपंतांकडूनच असणार.

भेटीचा सर्व कार्यक्रम उरकल्यावर साहेब खूश होते. तेवढ्या गडबडीतही बनोपंतांना केबिनमध्ये न बोलावता ते त्यांच्या टेबलकडं जाऊन, त्यांची भेट घेऊन आलेलेही मी पाहिले. माझ्या तिथल्या नव्या कारकिर्दीला साहेबांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. एकूण कामकाज आणि आजच्या कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून, ते रवाना झाले.

मग मात्र मी सेक्रेटरींना बरोबर घेऊन बनोपंतांची ओळख करून घ्यायला गेलो. प्रत्यक्ष भेटीनं माझे बरेच पूर्वग्रह दूर झाले. ते खरोखरच सरळ, प्रामाणिक, मनमिळाऊ, विश्वासू गृहस्थ होते. तत्पर होते. त्यांना कुठली गोष्ट विचारल्याचा त्रासही नव्हता, सल्ला घेतल्याचा अहंकारही नव्हता. कधी त्यांना न विचारता एखादी गोष्ट केल्याची त्यांची तक्रारही नव्हती. मग मात्र माझे त्यांचे संबंध इतरांसारखेच जुळून गेले, आनंदमय झाले.

म्हणून आज मी माहितीसाठी त्यांच्या टेबलाजवळ जाऊन समोरच्या खुर्चीवर बसलो. ते उठून उभे राहून माहिती देऊ लागले. मी त्यांना बसायची खूण केली. तरी त्यांनी म्हटलंच, साहेब, तुम्ही माहिती मागवली असती तरी मी त्वरित पाठवली असती. स्वतः उठून यायची तसदी कशाला घेतली ? एव्हाना मला परिचय झाला होता. म्हणून मी त्यांना विचारलं, तुम्ही ही कामं कोणत्या भूमिकेनं करता ?

माझा प्रश्न थेट होता. ते प्रांजळ होते. ते म्हणाले, लोक फक्त टीका करतात- कुणी नीट काम करीत नाही, साधं जागेवर भेटत नाही, फायली पुढं सरकत नाहीत, भ्रष्टाचार वाढला, प्रशासकीय खर्च कमी केले पाहिजेत, स्वतःला लागणारी - खातेनिहाय माहिती सतत अद्ययावत ठेवली पाहिजे - अशा असंख्य गोष्टींबद्दल.

हे सगळं खरं असेलही. पण मला वाटतं, अशा चर्चा करून काही फरक होणार नाही. मी तर सामान्य कर्मचारी माणूस आहे. मला असं वाटतं की, हे झालं पाहिजे, ते झालं पाहिजे, लोकांनी हे केलं पाहिजे, ते केलं पाहिजे - असं म्हणत राहाणं म्हणजे त्या साऱ्यांत माझा काहीच वाटा नसल्याचं म्हणण्यासारखं आहे. लोकांनी काय ते करावं, त्यांच्यात्यांच्या कामाचा, कर्तव्याचा वाटा उचलावा, शुद्ध राहावं, काटकसर करावी असं म्हणणं म्हणजे, या कामांत त्यांचे वाटे कोणते आहेत, ते दाखवून देण्यासारखं आहे. हे तर वर्षानुवर्षं चालूच आहे. त्यानं परिस्थितीत काही फरक पडत नाही, हेही आपण पाहिलं आहे. म्हणून मला वाटतं, याची खरी सुरुवात माझ्यापासून व्हायला हवी. इतरांना हे योग्य वाटेल, तर ते करतीलच. पण निदान माझ्यापुरती तरी या परिस्थितीतली सुधारणा प्रत्यक्ष सुरू होईल. म्हणून मी माझ्यापुरता यातला 'माझा वाटा' उचलून कृती करायची ठरवली आहे. मी सचोटीनं काम करतो.खुर्चीवर कामासाठी उपलब्ध राहातो...'

ते जरा थांबले. संकोचानं. मी ओळखलं. कारण आता पॅडवर मी एकेक वाक्य लिहून घेत होतो. मीच अदबीनं त्यांना म्हटलं, 'पंत, सांगा...यात तुमचा मीपणा नाही. खरं तर हा खरा कृतिकार्यक्रम आहे.'

ते बोलू लागले,'माझ्या टेबलवर भ्रष्टाचार नाही. खात्याकडून येणारी प्रत्येक माहिती मी स्वतःच नोंदवून ठेवतो. आलेली निरुपयोगी कव्हर्स, रॅपर्स यांच्या मागच्या भागांवर ऑफिसचं सर्व कच्चं लेखन करतो.पूर्वीच्या नोंदी अद्ययावत ठेवतो. स्वतःचं काम प्रामाणिकपणे पूर्ण करून इतरांचं करायला सहकार्य करतो. बाहेरच्या मोकळ्या जागेत चार फुलझाडं लावली आहेत. कुणी शिपाईबंधू निगा ठेवतात. पण मी तशी अपेक्षा ठेवीत नाही. स्वतः पाणी घालतो, निगा ठेवतो. ते काही सरकारी काम नाही. माझी समाजसेवा आहे. तीही ऑफिस सुटल्यावर करतो. ऑफिसच्या वेळेत नाही. ऑफिसला वेळेत येणं नि प्रामाणिकपणे अखंड काम करणं, हीच माझी देशसेवा....'

मी त्यांचं ऐकता ऐकता मुद्दे लिहीत होतो. कारण मी पाहिलं होतं, पंतांचं काम बघून आणखी पाच तरी कर्मचाऱ्यांनी, पंतांनी बाहेर लावलेल्या फुलझाडांसारखं, मूळ धरलं होतं. कर्तव्याचा सुगंध देत होते. असंख्य लोक देशासाठी त्यागाच्या गप्पा, भाषणबाजी करताना दिसतात. चुकीच्या गोष्टींच्या तक्रारी करीत आयुष्य काढताना

दिसतात. पण पंतांची पद्धत हे त्याला खरं उत्तर होतं. हे ज्यांना पटलं, त्यांनी कुणी तरी पंत-बनो म्हणून आदरानं त्यांचं नाव बनोपंत ठेवलं हेही मला ओघात कळलं होतं.

आजवर मी वाट्याबद्दल ऐकलं होतं. ते सारे इतरच वाटे होते. तिथंही जो-तो माझा वाटा द्या, म्हणतच होता. पण त्यांना हवे होते, ते वाटे वेगळे होते. कुणी हक्काच्या वाट्यांसाठी लढत होतं. कुणी इस्टेटीत वाटा मागत होतं. कुणी पैशाचे वाटे मागत होते. कुणी जमिनीचे. बनोपंत उचलीत होते तो माझा वाटा कर्तव्याचा होता. इतक्या हक्कांसाठीच्या नि वाट्यांसाठीच्या लढ्यांमध्ये असा माझा कर्तव्याचा वाटा मला मिळावा, म्हणून ना कुठं झगडा होत होता, ना कोर्टात केस जात होती. तशी शक्यताही नव्हती. म्हणूनच बनोपंतांची ही कर्तव्याचा माझा वाटा उचलण्याची कल्पनाच परिस्थिती सुधारायला निखळ नि गरजेची होती.

देशाचे प्रश्न कितीही गंभीर नि मोठे असले तरी, आपापला कर्तव्याचा वाटा उचलायचा ठरला, तर स्वप्नातला आदर्श देश नक्कीच लांब नव्हता. तेवढा माझा वाटा कळायला नि उचलायला असे एक पंत पुरेसे होते. म्हणून मी तिथून उठलो तो, माझा वाटा उचलण्याचं ठरवूनच !

*

२. गणित : अभ्यासाचं आणि जीवनाचंही

शेजारच्या घरात नेहमीप्रमाणं मुलांच्या अभ्यासाबद्दल आरडाओरडा सुरू होता. परीक्षांचा सीझन जवळ येत चालला होता. दहावी-बारावी-कला-शास्त्र-इंजिनिअरिंग सगळ्या स्तरांवर शिकणाऱ्या मुलांवर ताण होता. काहींच्या परीक्षा महिन्यावर, काहींच्या दोन महिन्यांवर. आमच्या आजूबाजूचीच काय, घरची मुलंही त्याला अपवाद नव्हती. ती मोठी होती म्हणून हे राहिलंय-ते राहिलंय, याचं टेन्शन-त्याचं टेन्शन, वर्ष राहातंय की काय-साऱ्या चर्चा घराऐवजी कोपऱ्यावर,चौकात होत होत्या,एवढ्याच फरक.दहावी-बारावीच्या मुलांच्या चर्चा घरात नि तणाव घरात. एवढंच.

तसा हा प्रश्न बऱ्यापैकी सार्वत्रिक असल्यानं मुलांना त्याचं विशेष वाटत नव्हतं.त्यांना तणाव होता.पण खरा तणाव होता तो अर्थात पालकांनाच. कारण वर्षाची नुकसानं, पुढचे प्रवेश, त्यांचे खर्च, वाया जाणारा वेळ, वर्षं, मग मतभेद, चिडचीड-साऱ्यांना सामोरं जावं लागणार हे दिसत होतं. अप्पामामांच्यात बसून तीनचार पालकांची चर्चा चालली होती. त्यांची दोन्ही मुलं मस्त व्यवस्थित अभ्यास करून सुशिक्षित झाली होती. एक उत्तम नोकरीवर परगावी होता. तर एकानं कारखाना टाकला होता. त्यांच्याकडं हा विषय झाल्यानं ते म्हणाले, साऱ्या मुलांना जरा रविवारी माझ्याकडं पाठवाल का ? सर्वांचा होकार होता. फक्त मुलं कशी,किती येतात ते पाहू, असं ठरलं.

शाळा-कॉलेजची सारी मुलं जरा उत्सुकतेनंच आली. काहींना, आपल्याला आता काही लेक्चर ऐकायला लागेल, अशी सुप्त भीती होती. पण अप्पा त्यातले नव्हते. ते नेहमी आनंदी. विशेषतः त्यांच्या मुलांची शिक्षणंसुद्धा कुठला तणाव न घेता-देता चांगली झालेली. त्या मुलांची प्रगती आजूबाजूच्या मुलांना माहीत होती. त्यामुळं त्यांना भीतीपेक्षा उत्सुकताच जास्त होती.

आल्याआल्या साऱ्या मुलांना अप्पामामांनी आगामी परीक्षांसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. मामींनी सर्वांचं खाणंपिणं केलं. ते झाल्यावर मामा म्हणाले, मी तुम्हाला काही आत्ता सांगणार नाही. फक्त आपण दोन-तीन ठिकाणी जाऊन येऊ. आपण आठ-नऊ जण आहोत.आमच्या मोठ्या गाडीनंच जाऊया. चालेल ? त्यांनी

मुलांकडं पाहून विचारलं. गाडीतून म्हटल्यावर आणखीच उत्साह आला. गाडी निघाली. गावाबाहेरच्या मामांच्या मित्राच्या दारात थांबली. ते नारळाचे मोठे बागायतदार व्यापारी. तिथं बिनसोललेल्या नारळांचे ढीग होते आणि सोललेले नारळ पोत्यांवारी ट्रकानं जात होते. ती उलाढाल बघून मुलांना आश्चर्य वाटलं. इतके असोले नारळ सोलून पाठवायची यंत्रणा, पाहाण्याची उत्सुकता सर्वांना होती. दाखवायला स्वतः मालक मागच्या हॉलमध्ये मुलांना घेऊन गेले. तिथं नारळ सोलण्याची मशिनं नव्हती.

आठ-दहा माणसं ओळीनं नारळांचे ढीग एका बाजूला ठेवून कोयत्यानं सोलून दुसऱ्या बाजूला ढीग करीत होती. सोललेल्या नारळाची मोठमोठी सालं, त्याच्याबरोबर बारीक कणांचा केवढा तरी कचरा - याचाही एका बाजूला ढीग पडत होता. तो ढीग अन् कचरा नारळाच्या ढिगापेक्षाही मोठा होता. मध्येच घड्याळाचे टोल पडले. सोलणं थांबलं. दहाही माणसांनी सोललेले नारळ उचलून मोजून पोती भरली. ती कडेला लावली. कचऱ्याचा ढीग मोठमोठ्या झाडण्यांनी गोळा केला. बाहेरच्या पत्र्याच्या ट्रॉल्यांत तो टाकला. बारीक झाडूनं सारं स्वच्छ केलं. ते सारे कामगार चहा-पाण्याला गेले. जमिनीवर आत्ता नारळाच्या केराचा कणही नव्हता. कडेला सकाळपासूनच्या सोललेल्या नारळांची पोती. कामगार गेले तसे सर्वांसह मालक मुलांना घेऊन परतले. मुलांना पुन्हा चहा-पाणी होऊन मुलं गाडीनं परतली.

वाटेत एका घरी गाडी थांबली. तिथं मामांचे एक पाहुणे राहात होते. तिथंही राबता मोठा होता. घरातच बारा-पंधरा माणसं. सतत चहापाणी-नाश्ते-जेवणं प्रत्येकाच्या उद्योग-धंदा-शिक्षण यांच्या वेळेप्रमाणे जाणी-येणी सुरू होती. मुलांच्या ओळखी झाल्यावर मामांनी मुलांना स्वयंपाकघर, बेसिन, सिंक, बाथरूम, बाहेरची वॉशिंग प्लेस - अशा जागा मुद्दाम हिंडवून आणल्या. मग त्या पाहुण्यांच्या मंडळींना त्यांनी मुलांच्या देखतच विचारलं, 'वहिनी, आज काय सकाळच्या नाश्तापाण्याला सुट्टी काय ? की रविवार ?' त्या हसत म्हणाल्या, 'अहो, सुट्टी ऑफिसला, शाळेला. जेवणाखाणाला कुठली सुट्टी ?' 'मग इथं तर सगळं चकाचक दिसतंय. सगळी बाहेर गेली की काय ?' 'हो. इथं केव्हाच नाश्तापाणी सारं झालंय, आता दुपारी जेवणं. चकाचक का, ते तुम्हाला माहीतच आहे की !' मामा हसत बाहेर पडले.

मुलांना घेऊन गाडी घरी परतली. पुन्हा खाण्याची वेळ झाली. मुलांना

एकत्र बसवून अप्पामामा म्हणाले, 'बाळांनो, आत्ता आपण आमच्या पाहुण्यांकडं गेलो. तुम्हाला इतक्या लोकांचं नाश्तापाणी, चहा होऊनसुद्धा एकही भांडं बेसिनमध्ये, वॉशिंग प्लेसला दिसलं नाही. कारण त्या काकूंच्या सासूबाईंनी सांगून ठेवलं होतं, 'हाताबरोबर भांडं घासून टाका. म्हणजे ढीग लागत नाही आणि मग भांडीवालीही लागत नाही. आजही त्यांच्या घरी ते पाळलं जातं. खाण्याला पंधरा-वीस मिनिटं लागतात पण ताटली, बाउल विसळायला दोन-तीन मिनिटं पुरतात. म्हणून एवढी माणसं असूनसुद्धा परावलंबित्व नाही.खर्च वाचतो.त्यांना अशा बचतीची गरज आहे.

'दुसरं, आपण गेलो तिथल्या नारळाच्या सोपटं-सालं नि केराचं ! दर दोन तासाला घड्याळाचे ठोके पडले की काम थांबवून सारा केर निघतो. शिवाय तयार माल लगेच पोत्यात. फरशी स्वच्छ. असं नाही केलं नि दिवसभर साठत राहिलं, तर हॉलमध्ये पाय ठेवायला जागा उरणार नाही, एवढा केर होईल. नारळ सोलायचं काम मशीन कदाचित स्वस्तात करील, पण आज दहा माणसांचा रोजगार जाईल. ते आज हा खर्च पेलू शकतात. शिवाय तीच माणसं पुढचा केर काढून, पाठवायच्या नारळांची पोती भरून, पॅक करून ट्रकात चढवून देतात.

'याचा अभ्यासाशी संबंध तुम्हाला सांगतोच. पण एक लक्षात घ्या, आयुष्यात शालेय अभ्यास एवढंच नाही. ज्यांची परिस्थिती नसेल, त्यांनी हाताबरोबर भांडं घासून आपले खर्च आटोक्यात आणले ना, तर त्या सूत्रानं त्यांच्या आयुष्यात कितीतरी बाबतीत स्वास्थ्य येईल. टाळण्यासारखे खर्च टळतील. त्यांना अकारण कर्ज-हप्ते अशा दुष्टचक्रात अडकावं लागणार नाही. निदान त्यांच्या-त्यांच्या गरजा तरी ते व्यवस्थित भागवू शकतील. कुठं नडणार नाही. त्यांचं कुणाला ओझं होणार नाही. घरात स्वास्थ्य नांदेल, हेही आपण शिकावं. हेही गरजेचंच शिक्षण आहे.

'आता तुम्ही व्यावसायिकांचंही रूटीन पाहिलं. तुम्ही व्यावसायिक व्हाल, भांडवल उभं करू शकाल तर अवश्य व्यावसायिक व्हा. त्यात तुम्ही तर नफा कमवालच. पण चार लोकांना उद्योगाला लावू शकाल. व्यवसाय वाढतो अशाच वेळी, मशीनचा मोह होतो. मला यंत्रयुग मान्य आहे. काही कामांना यंत्रांची गरजही आहे. पण जी कामं माणूस करू शकतो, तिथं यंत्र टाळा. तसं न करता सरसकट यंत्रं वापरलीत तर, यंत्रांच्या कारखान्यात चार कामगार कामाला लागतील.पण इकडं वीस

कामगार घरी बसतील. लक्षात घ्या, वीस कामगार म्हणजे वीस प्रपंच, असा विचार करा. शिवाय आज तुम्ही तिथं पाहिलं तर, समजा, त्या मालकांना घरी काही अडचण आली किंवा इतर काम पडलं, कुणाला काही झालं तर, मालकांनी माणुसकी दाखवून पोटाला लावलेले दहा कामगार आज मालकांसाठी धावून येतील. जाग्यावर उभी असलेली यंत्रं काय करतील ? म्हणून यातून जगण्याचं गणित सुटेल - आपल्याही आणि इतरांच्याही. तेही शिका.

'आता मला सांगा, अभ्यासाचं दुसरं काय असतं ? ठरलेल्या वेळेत आपला अभ्यास उरकायचा असतो. तो उरकत नाही म्हणून ताण येतो. मग अपयश येतं.पण तुमच्या लक्षात आलंच असेल की, अभ्यासाच्या कामाच्या उरकाचंही काही गणित आहेच. विचार केला तर ते कळायला सोपं आहे. उपयोगीही आहे. शिकवलेला धडा हाताबरोबर घरी अभ्यासून टाकायचा. मग जसा केर साठून प्रॉब्लेम होत नाही, तसा अभ्यास साठून ताणतणावही येत नाही.शिवाय रोज अभ्यासाची सवय लागते.अजून वेळ गेलेली नाही. राहिलेल्या वेळेचं नियोजन करा. या वर्षी उपयोग होईल. पुढच्या वर्षी तर खचितच होईल. फक्त त्यासाठी भांडं बेसिनमध्ये पडलं की, हाताबरोबर धुऊन टाकायचं ! नाही तर मग काम न उरकणारं बनतं,तणाव देतं !'

'आता आपण जीवनातली गणितं प्रत्यक्ष सुटताना पाहिली. त्यावरून अभ्यासाची गणितंसुद्धा सोडवणं किती सोपं आहे, ते पाहिलं. खरं तर, ही सूत्रं सगळीकडंच उपयोगी आहेत. घरं आवरणं, साठलेल्या अनेक गोष्टी - पत्रव्यवहार, गटारं, कामं, कार्यालयीन कामांचे ढिगारे - अशा अनेक गोष्टी या सूत्रानं तुम्ही सोप्या करू शकाल. सोडवू शकाल. न्यायालयीन नि सरकारी कामांतल्या निदान टाळता येण्यासारख्या दिरंगाई टाळण्यासाठीसुद्धा भांडं पडताच घासून टाकण्याचं 'उरकाचं गणित' उपयोगी पडेल. शिवाय कार्यक्षमता वाढवील, पुढची स्मरणपत्रं, दिरंगाई, खर्च, हेलपाटे, त्रास वाचतील, ते वेगळेच !

'अभ्यासाची नका काळजी करू. अभ्यासाचेच काय, जीवनाचेसुद्धा प्रश्न कौशल्यानं सोडवणारी अशी आयुष्यं अभ्यासा. पुस्तकांच्या बाहेरही शिका. अशा शिकलेल्या गणितांच्या रीती तुमचा अभ्यासही सोपा करतील आणि जीवनही !'

*

३. चोरी !

किराणा मालाचं दुकान होतं. संध्याकाळची वेळ. अजून अंधार पडायचा होता. ऑफिसंही सुटायची होती. लोकांची संध्याकाळची-रात्रीची गर्दी सुरू व्हायची होती. दुकानात एक-दोन किरकोळ गिऱ्हाइकं. एक नोकर त्यांना वस्तू देत होता. दुसरा काही पुड्या बांधणं वगैरे कामं करीत होता. मालक गल्ल्यावर साधारण दिवसाचा गल्ला पाहात होते. मध्येच काही वह्या चाळीत होते.

तोवर एकदम काही गडबड ऐकू आली. 'अहो, अहो, अहो' नोकर ओरडला. दुसरा ओरडला,'बुवा, बुवा, बुवा !' तिसरा नोकर आतून बाहेर आला. त्यानं पाहिलं, साधूसारखा दिसणारा एक माणूस. दाढी वाढवलेली. खांद्याला दोन पिशव्या-शबनमसारख्या. भिक्षेच्या झोळ्या असाव्यात तशा. सरळ काउंटर उघडून आत आला. जवळ दिसणाऱ्या काही वस्तू मुकाट्यानं पिशवीत टाकून शांतपणे बाहेर पडत होता. ते पहाताच, तो ओरडला, 'चोर..चोर..!' दोघांनी पुढं पळत येऊन त्या माणसाला पकडायचा प्रयत्न केला.

पण तो शांतपणे बाहेर उभा राहिला. तो उभाच राहिल्यावर त्याच्या मागं पळणं, त्याला पकडणं - असल्या गोष्टींना फारसा अर्थच उरला नाही. राहाता राहिला प्रश्न उचललेल्या वस्तूंचा. म्हणून एक नोकर त्याच्यामागून बाहेर पडला. पण साधूच्या शांतपणामुळं त्या नोकराला काय करावं, कळेना. तरीही एवढी चोरी डोळ्यांदेखत झाल्यानं मालकही ओरडतील, म्हणून त्यानं त्या साधूच्या झोळीत हात घालून त्यातल्या वस्तू काढायचा प्रयत्न केला.

साधूनं शांतपणे त्याला थांबवलं, 'थांब. माझ्या झोळीत हात घालायचा नाही ! त्यातल्या माझ्या वस्तूंना तर अजिबात हात लावायचा नाही. मला चोरी अजिबात चालणार नाही !' नोकराला क्षणभर हात मागं घ्यावा लागला. शेवटी झोळी साधूची होती. साधू जरा वेडसर आहे की काय, अशीही शंका त्याला आली. पण तो साधू तेजस्वी होता, निर्भीड होता. त्याच्या शांतपणावर, बोलण्यावर - तो उलट निश्चित सुशिक्षित, शहाणा वाटत होता.

एव्हाना मालकांना काही गडबड झाल्याचं लक्षात आलं होतं. पण गल्ल्यावरचे

पैसे तसेच टाकून त्यांना पटकन येता येईना. फक्त पहात उभ्या राहिलेल्या दुसऱ्या नोकरावर ते खेकसले, 'अरे, उभा काय राहातो..बघ की पुढं जाऊन !'

तोवर साधूजवळच्या नोकरानं त्यातल्या त्यात शांतपणानं साधूला म्हटलं, 'अहो, ती झोळी तुमची असेल, पण आत तुम्ही आमच्या चोरलेल्या वस्तू आहेत !' साधूनं तितक्याच शांतपणे झोळीतली एक तेलाची बाटली बाहेर काढून दाखवीत विचारलं, 'ही तेलाची बाटली ?' नोकर म्हणाला, 'मग ? आमचा माल आहे, आम्ही ओळखू शकतो !'

साधूनं विचारलं, 'कशावरून ? याच्यावर तर कुठं काही तुमचं नावपत्ता नाही ! यावर तर लिहिलाय कुठला सोलनबिलनचा पत्ता.मार्केटेड बाय - हा तर कुठला तिसराच पत्ता आहे, दिल्लीचा ! दुकानाचं म्हणशील तर, ही तेलाची बाटली समोरच्या दुकानातली आहे, असंही असू शकतं. माझी वस्तू तर मीही ओळखू शकतो. आता त्यातून तू ही वस्तू हातातून हिसकावणार असशील तर मी ती देणार नाही, उलट चोरचोर म्हणून ओरडणार !'

नोकरानं विचार केला, इकडं आड तिकडं विहीर ! याच्याशी वाद घालणं अवघड. परत गेलं तर मालक खरडपट्टी काढील, वर चोरीला गेलेल्या वस्तूंची वसुलीसुद्धा आपल्याकडून घेईल. थोडं दमानं घ्यावं. म्हणून त्यानं साधूला म्हटलं, 'बुवा, तुम्ही निदान आमच्या मालकांकडं तरी चला. बाकीचं काय ते तुमचं तुम्ही बघा.'

'चला, तुम्ही बोलावता आहात तर, तुमच्या दुकानात यायला मला काय अडचण ?' झोळीत तेलाची बाटली टाकून साधू नोकरामागून परत दुकानाकडं आला. मालकाला एकदा वाटलं, नोकरानं या गोसावड्याला निदान पकडून तरी आणला. पण जवळ येताच, त्यांचे चेहरे पहाताच चित्र काही वेगळंच होतं, हे कळत होतं. साधू तेजस्वी, शांत. त्यानंच उलट नोकराला बरोबर आणल्यासारखा तो नोकर साधूबरोबर अदबीनं चालत होता. भुरटा काय, सराईत काय - कुणी चोर अशा शांतपणे परत दुकानाच्या पायऱ्या चढत आत आल्यावर, का कुणास ठाऊक, मालकानंच नकळत पुढं होऊन स्वतःच काउंटर उघडलं. साधूला आपल्या गल्ल्याच्या टेबलासमोरच्या खुर्चीवर बसवलं. नोकर तसे भांबावलेले होते. मालकालाही कोणता

स्टॅण्ड घ्यावा, कळत नव्हतं. शेवटी साधूला पाण्याचं भांडं पुढं ठेवून त्यानं विचारलं, 'बुवा, खरंखरं सांगा, काय झालंय ते ?'

साधू म्हणाले, 'तेच मलाही सांगायचंय. वस्तूची रास्त किंमत न देता, त्या घेणं-बळकावणं म्हणजे चोरी. पण त्यांच्या रास्त किमतीपेक्षा जादा पैसे घेणं म्हणजे - उकळणं, लुबाडणं - म्हणजेही चोरीच ! कर चुकवावा म्हणून पावत्या न फाडता विक्री करणं म्हणजेही चोरीच ! हिशेबाच्या दोन वह्या म्हणजेही चोरीच ! आपला धंदा चालत असताना, तो चालत नाही, असं दाखवून व्यापारी बँकांकडून काढलेलं कर्ज बुडवणं - त्यातून त्या संस्था बुडवणं म्हणजेही चोरीच ! दुकान कमी चालतं म्हणून दुकानाला आपणच आग लावून, पंचनामा करून, पैसे चारून नुकसान भरपाई मिळवणं हीसुद्धा चोरीच...!' आता मात्र मालकाला ब्रह्म आठवलं. साधूनं उच्चारलेल्या गोष्टी तशा त्रयस्थाला सामान्य वाटल्या तरी, त्या या मालकाच्याच आयुष्यात घडलेल्या आणि कुणाला फारशा माहीत नसलेल्या गोष्टी होत्या. साधूनं पाणी प्यायच्या आधी मालकानंच त्याच्यासमोरचा पाण्याचा ग्लास घटाघट संपवला. ते झाल्यावर साधू नोकरांकडं वळला.

त्यांच्याकडं पाहून साधूनं झोळीतल्या एकेक करीत पाच वस्तू काढल्या आणि म्हणाला, 'या साऱ्या तुमच्या दुकानातल्या मी आत्ता घेतलेल्या वस्तू ! त्या त्यांच्या जाग्यावर ठेवा. मालक नसताना किंवा त्यांचं लक्ष नसताना, खिशात टाकलेलं चॉकलेट, ब्लेडचं पाकीट, गल्ल्यात कमी टाकलेला एक रुपया याही चोऱ्याच आहेत! कामाचा पगार घेऊन अळंटळं करणं, कामं दुसऱ्यांवर ढकलणं म्हणजेही चोरीच ! याबद्दल तुम्हाला काही म्हणायचं आहे का ?'

सगळ्याच नोकरांचे चेहरे पडलेले होते. साधूनं आत्ताच उच्चारलेली यादी त्यांचीच होती. आता यापुढची आपली यादीच साधू वाचेल की काय, या भीतीनं तिघंही नोकर साधूच्या पाया पडले. साधू म्हणाला, 'आज तुम्ही हे घाबरून करता आहात. असू दे. पण आता ज्या चुका-चोऱ्या लक्षात आल्या, त्या पुन्हा कराल तर ती पुन्हा चोरीच ! तुम्हाला कामासाठी घेतलं ! तुमचं शरीर घेतलं, मनापासून काम करण्यासाठी मन घेतलं. त्यासाठी किंमत दिली - पगार दिला ! त्याची आठवण न ठेवणं नि त्या वेळी, त्या कामासाठी, ते ते प्रामाणिकपणे न वापरणं ही चोरी ! अर्थात

तुम्हाला वेठीला धरून मालक पगार देत नसतील, तर तीही चोरीच !'

मालक शेवटी मालक होते. बुद्धिमान होते. साधूच्या निःस्वार्थीपणाचं तेज औरच होतं. मालकांच्या डोळ्यांत पाणी होतं. साधू मालकांना म्हणाला, 'तुम्हाला एवढा बंगला आहे, एवढं दुकान आहे ! पण दारात एक झाड नाही ! झाडांना पाणी नाही ! त्यासाठी कुणी माळी ठेवून त्याचं पोट भरावं, असा विचार येत नाही ! गरजूला दान नाही ! गाईगुराला द्यायला चारा नाही ! कुणाच्या मदतीच्या हाकेला धावून जायला पाय नाहीत ! स्वार्थाशिवाय गोड बोलता येत नाही !'

'हात-पाय,नाक-डोळे,वाचा,मन-बुद्धी तुम्हाला काय दिलं नाही ? ते ज्यानं दिलं, त्याच्यासाठी न वापरणं ही चोरी नाही ? देवाचं नाव घ्यायला वेळ नाही! ही त्यानंच दिलेल्या वेळेची चोरी नाही ? मी तुमच्या पाचच वस्तू घेतल्या. तुम्ही नीट वापराल म्हणून परत करतो ! देवाच्या-निसर्गाच्याही तुम्ही पाच वस्तूच घेतल्या आहेत, फुकट उचलल्या आहेत ! त्या त्याच्या आहेत ! त्याच्यासाठी न वापराल तर चोरी ! त्यावर पोट भरा, पण त्या 'माझ्या' म्हणू नका ! ती मोठी चोरी आहे !! मी परत केल्या, तो करील की नाही, कुणास ठाऊक...! तुमच्या वडिलांची एक वस्तू गेली आहे ना ?'

मालकांवर हा शेवटचा घाव होता. त्यांच्या वडिलांचे डोळे गेले होते. मृत्यू पावताना ते म्हणाले, 'एका साधूनं खरं तर मला आधी सावध केलं होतं, पण मी सावध झालो नाही ! पुढं डोळे गेले तेव्हा डोळे उघडले ! पण वेळ निघून गेली होती. तू मात्र तसं करू नको. देव करो नि तुला तो साधू लवकर भेटो..!'

आता मालक साधूचे पाय धरून रडू लागले. साधू पाणी प्याला. मालकाचा मान ठेवण्यासाठी. म्हणाला, 'मी निघतो.' मालक म्हणाला, 'साधुमहाराज, आता मी ओळखलंय तुम्हाला...हे सारं आजपासून बदलेल..बदललेलं पहायला पुन्हा कृपा करून या...!' साधू बाहेरच्या अंधारात निघून गेला !

आपल्यातल्या अनेकांना आणि अनेक गावांना तो भेटण्याची गरज आहे, नाही ?

*

४. नवे संसर्गजन्य रोग

शेतकऱ्यांना पिकाच्या नवनव्या जाती आणि प्रकार चांगले परिचित असतात. उत्तम पिकाचं वाण ते जपून ठेवतात. चांगल्या दर्जाचं पीक आलं, कापलं-झोडलं-मळणी झाली, पुढं स्वतःला वापरलं, विकलं तरी पुन्हा पेरायला लागणारं बियाणं आधीच, आवर्जून अन् काळजीपूर्वक ठेवलं जातं. कारण पुढच्या वर्षी पुन्हा असंच सकस, दर्जेदार पीक यावं, सर्वांना मिळावं.

हे शेतीतच घडतं, असंही नाही. एखादं चित्र उत्तम वाटलं, तर पूर्वी त्यावरून अनेक चित्रं बनवीत. आता अशा आदर्श, जमून गेलेल्या चित्राचे कॉपीराईट करून नवनव्या तंत्रज्ञानानं त्याच्या प्रती काढल्या जातात. तेच गाण्यात, कारखान्यातल्या उत्तम डिझाइनमध्ये, पार्टमध्ये, बंगल्यांच्या रेखांकनांमध्ये, सुतारकामाच्या-कलाकुसरीच्या वस्तूंमध्ये - असं असंख्य ठिकाणी दिसेल. असे नवे प्रकार - शोध अनेकदा तर, अभ्यासाला घेतले जातात.

पण हे जसं चांगल्या बाबतीत असतं, तसंच एखाद्या वाईट बाबतीत किंवा नको असणाऱ्या बाबतीतही असू शकतं - याकडं क्वचित लक्ष जातं. जातं, पण काही क्षेत्रांत जातं. उदाहरणार्थ, एखादा घातक रोग उद्भवला, त्याचं नवं पीक आलं, साथ आली की, सावध होऊन अशीच शोधाशोध सुरू होते. अर्थात ही शोधाशोध ते जपण्यासाठी नसून ते नष्ट कसं करता येईल, यासाठी असते. असं नष्ट करणं गरजेचंच आहे, बरोबरच आहे. कारण एक वेळ चांगलं पीक मूळ धरणार नाही. वाढणार नाही. फोफावणार नाही. पण असली वाईट, नवी पिकं मात्र वेगानं फोफावतात. एखादी चांगली गोष्ट अनेक वर्षं लोकांना कळतही नाही. पण एखादी खोटी अफवा मात्र रोग पसरावा तशी पसरत जाते. फोफावते. संसर्गजन्य रोगाच्या फैलावासारखी विनाश घडवीत जाते. त्यामुळं उलट असली नवी पिकं लक्षात येताच, चांगल्याची जपणूक करतात -त्याहीपेक्षा जलदगतीनं घातक पिकांचा नाश करण्याची गरज असते.

असंच एक नवं पीक जाणकारांच्या लक्षात आलं असेल, ते म्हणजे 'झटपटचं' आणि 'घाईचं !' चांगलं पीक किंवा निर्मिती, वाण जसं आधी म्हटलं

तसं शेतीपुरतं नाही, तसं हे 'झटपटचं-घाईचं' पीकही शेतीपुरतं नाही. शेतीत तर ते आलंच. पिकांच्या अनेक नवनव्या जाती विकसित झाल्या. त्या कमी काळात म्हणजे झटपट पीक देऊ लागल्या. मग लवकर उगवणारं, एकरी जास्त उत्पादन असणारं, एका लागवडीवर दुप्पट-तिप्पट पीक काही न करता देणारं - असे अनेक प्रकार आले. तिकडं हे सारं रसायनांतही सुरू झालं, काही विशिष्ट रसायनं घातली तर पीक दुप्पट-तिप्पट-चौपट यायला लागलं. अर्थात त्यातून 'पैशाचं पीक'ही 'झटपट नि घाईचं' आलं.

मूळ वाण 'झटपट'चंच होतं. 'घाई'चंच होतं. दुप्पट-तिप्पट पिकांतून पैसा एकदम अनेकपट झाला. त्यामुळं एखादी वस्तू घरात यायला दोन वर्षं थांबावं लागे, ती आता वर्षाच्या आत यायला लागली. चालत दोन-तीन मैलावरच्या शेतात जायला लागणारा वेळ आणि कष्ट नको वाटू लागले. अर्ध्या तासाची बैलगाडीही फारच रेंगाळणारी, उशीर करणारी वाटू लागली. कारण आता 'घाईचं पीक' डोक्यांत आलं होतं. दहा मिनिटांत पोचवणारी मोटरसायकल हवी वाटू लागली. कारण किक मारली की ती झटपट शेतात पोचवू लागली.

मग या घाईच्या पिकानं मुळात सारं पिकवणाऱ्या काळ्या मातीचे, गडी-माणसांचे विचारही सोडले. मातीवर रसायनानं अत्याचार झाला तरी चालेल. तिनं रसायनं पचवावी, पण झटपट पीक द्यावं, जास्त वेळा द्यावं, भरपूर द्यावं. साऱ्या घाईनं शेवटी खरं पीक अखेर 'झटपट पैशाचं' आलं. भरपूर पैसा आला. आता त्यामुळं कुणाचं आरोग्य, संतुलन, निसर्गाचा तोल-गती, गडीमाणसं, बैलं-गुरं - या कोणाच्याही स्वास्थ्याची पर्वा आता राहिली नाही. 'झटपट द्या, भरपूर द्या, घाईनं द्या.' गाई-म्हशी दूध देत होत्या. सकस होतं. पोषण होत होतं. त्यांचं आरोग्य चांगलं राखलं जात होतं. रोगराई नव्हती. पण आता अविचारी माणसांच्या डोक्यांतल्या या 'झटपट'च्या पिकानं निसर्गाचा क्रम मोडला, गुरांचं स्वास्थ्य घालवलं, संकर करा - आजारी पडली तरी औषधं पाजा, इंजेक्शनं द्या, पण पीक-दूध दुप्पट होऊ द्या. पैसा झटपट आला पाहिजे.

खरं तर जमीन शांतपणे शेकडो वर्षं निसर्गक्रमानं सरळ पावसाच्या, पाटाच्या पाण्यावर प्रमाणात पण उत्तम, सकस पीक देत होती. तिची या 'झटपट'च्या रोगानं,

पैशाच्या घाईच्या रोगानं हळूहळू नासाडी केली. तिला नापीक केली. जनावरं रोगट केली, जास्त पिकासाठी नांगरटीचे बैल गेले. झटपट जाण्यासाठी मोटारसायकली आल्या, तसे लवकर नांगरटीसाठी ट्रॅक्टर आले. त्यांनी निर्दयपणे केलेली झटपट नांगरट मातीचं हृदय भेदू लागली. प्रत्येक गोष्ट 'झटपट', 'घाईनं' हवी. पैसा झटपट हवा, घाईनं हवा, भरपूर हवा - यानं माणसाला पछाडलं. कसल्याही यंत्रांचे शोध करा, ती आणा, आपले आपल्यासारखेच जिवंत जीव कत्तलखान्यात जाऊ द्या, पण यंत्रानं एकदा 'झटपट' काम होऊन पैसा मिळू दे - असले अविचार आले.

चांगल्या पिकाला-वाणाला जसं कुठल्या क्षेत्राचं बंधन नाही, तसं या 'झटपट'च्या पिकालाही बंधन नाही. 'झटपट' पैसा मिळवण्याच्या क्षेत्रांचं पीक फुटलं. त्याच्यावर इतक्या रोगप्रतिबंधक आणि कायदेशीर उपाययोजना करूनही ते आटोक्यात येईना. गाण्यात एक-दोन तपं रियाज केल्याशिवाय बैठकीवर भक्कम पाऊल पडत नसे. असं सावकाश आणि भक्कम पडलेलं पाऊल पुढं आयुष्यभर यशस्वीही होत असे. आता बालवाडीतच 'झटपट' गायक, नट, वादक, कीर्तनकार - यांचं पीक येतं. पण शेतीचं, गुरांचं, पिकांचं - अशा असंख्य गोष्टींचं जे नुकसान होणार तेच यात होणार, याकडं दुर्लक्ष झालं. सरळ मार्गांनं, शांतपणानं, सावकाश येणारा पैसा - आपोआपच पुरवून वापरावा लागत होता. जीवन साधं, सोपं होतं. सरळ होतं. गरजेपुरतं, एकमेकांच्या मदतीनं जगावं लागत होतं. व्यसनांना पैसाही नव्हता. चैनींची ओढ आपोआपच मागं खेचली जात होती.

या अफलातून 'झटपट' नि 'घाई'च्या पिकानं जसं पिकं एकदम दुप्पट-तिप्पट केली, तसा तिकडं पैसा-प्रसिद्धी-वस्तू-उत्पादनंही कितीतरी पट केली. त्यामुळं निर्माण झालेला लोभ, चैनींची ओढ, विलासी जीवन, दुसऱ्याची गरज नि पर्वा न करण्याची वृत्ती - असल्या असंख्य गोष्टींची कीड साऱ्याच मनुष्यजीवनाला लागली. झटपट नि घाईच्या वेगानं ग्रासलेल्या वाहनचालकांना वाटेत किती वाहनं नि जीव यांचे बळी आपण घेतो आहोत, याचं भान सुटलं.

जमिनी नापीक झाल्या, गाईगुरांच्या कत्तली होऊन संख्या घटल्या. अधिकाधिक वाहनांनी माणसांची आरोग्य धोक्यात आणली, तशी या पिकानं 'झटपट' पैशाची असंख्य आमिषं आणली. लाखाच्या गाद्या आल्या-गेल्या, सट्टेबाजार आले,

मटके आले, सुशिक्षित पोषाखातले शेअर्स आले.

अगणित मंडळींनी, असंख्य योजनांनी आपापली आमिषं आणली. फसवणुकी नि भ्रष्टाचाराचा असाध्य कर्करोग आणला. माणुसकीची कत्तल सुरू केली. एकीकडं व्यसनांचे पूर नि दुसरीकडं दोन वेळच्या भाकरीची भ्रांत असा विलक्षण विरोधाभास जीवनात आणला. हे अर्थात एवढ्यावरच थांबणारं नव्हतं. काही सन्मान्य अपवाद सोडता या झटपट पैशानं माणसांतली दरी तर रुंदावलीच, पण गरिबांविषयीच काय, एकूण समाजाविषयीच धनिकांत झटपट पैशाच्या धुंदीनं बेफिकिरी आणली, चैनी नि विलासाची लाजही वाटेनाशी झाली !

फक्त निसर्गाच्या संतुलनानं नि संतांच्या शिकवणुकीनं अजून सात्त्विक, सकस वाणं शेतीत आहेत ! तशी काही माणसांच्या मेंदूतही शाबूत आहेत ! 'झटपट'नं केलेला शेती-निसर्ग-पशुधन - यांचा असा विनाश अनुभवून जसा निसर्गक्रमाकडं वळण्याचं धैर्य नि शहाणपणा आता दिसून येतो आहे, तसा तो जीवनाच्या इतर क्षेत्रातल्या या 'झटपट' नि 'घाई'च्या रोगाकडं आणि त्यावरच्या उपायांतही दिसून येईल, या आशेचे किरण क्षितिजावर आता हळूहळू दिसू लागले आहेत.

काळाच्या घड्याळाचे काटे उलटे फिरवता येत नसले तरी, घड्याळं दुरुस्त करता येतात, चुकलेल्या वेळा सुधारून घड्याळं नीट लावून घेता येतात !

साथींचा रोग चुकून शिरला तरी प्रतिबंधक उपाययोजनांनी तो आटोक्यात आणता येतो. संशोधनानं नष्ट करता येतो. गाडीचा वेग 'झटपट' नि 'घाई'च्या नव्या पिकाची बाधा होऊन वाढला तरी, निदान धोक्याचे सिग्नल लागल्यावर, हानीनं सावध झाल्यावर का होईना, 'घाई'ची बाधा टाळता येते.

फक्त त्यासाठी थोडं थांबून, एवढा विचार करून, निसर्गाच्या सरळ आणि शाश्वत रस्त्यानं, शांतपणे निरोगी जीवन स्वतःला जगता येतं, दुसऱ्यांना जगू देता येतं हे लक्षात घेतलं म्हणजे झालं !

*

५. अवघड शब्द

अवघड शब्द आपल्याला नवीन गोष्ट नाही. शाळेतल्या साध्या पाठ्यपुस्तकातल्या धड्याच्या शेवटीही त्यांचे अर्थ दिलेले असतात. किंबहुना ज्यासी 'आपंगिता' नाही, त्यासी धरी जो हृदयी - असं साधुपुरुषांचं लक्षण सांगणारा अगदी श्री तुकोबारायांच्यासारख्या संतांचा अभंग पद्यविभागात आला की, मुलंच नव्हे, शिक्षकही अडखळतात. स्वाभाविक आहे, अनेक शब्द काळाच्या ओघात वापरात राहात नाहीत. बोलीत उरत नाहीत. मग किती सोपे म्हणून ते वापरले असले तरी, ते हळूहळू अवघड नि कठीण शब्द या कप्प्यात जातात. भाषा प्रवाही असल्यानं तिच्या काठावरची गावं सातत्यानं मागं पडावीत, तसं आज आपण वापरतो आहोत, त्या शब्दांचंही कदाचित काही काळानं तसंच होईल. त्यांतला एखादा एखादा करत एकेक शब्द अवघड शब्दांत दाखल होईल.

यात वाईट किंवा आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही. भाषेच्या प्रक्रियेचा तो इतिहासच आहे. नव्या संस्कृती-इतर भाषा-नवे प्रदेश, त्यांच्या भाषा - असे असंख्य संपर्क येऊन, असेच अनेक नवे शब्द रूढही होत असतात. आपापल्या भाषेत दाखलही होतात. जुने मागं पडतात, अवघड शब्दांच्या कप्प्यात जातात. तसे हे नवे शब्द आपल्या भाषेत-बोलीत दाखल होतात. अरबी, फारशी, हिंदी - आता असंख्य इंग्रजी शब्द आपल्या भाषेत दाखल झाले. आपण तसे उदारमतवादी असल्यानं कुठल्या भाषेनं फारसा आग्रह न धरता ते सारे सामावून घेतले.

अर्थ न कळणं आणि उच्चारणाला जीभ वळायला कठीण जाणं आणि लिहिताना कठीण जाणं - असे खरं तर अवघडपणाचे भाग वरवर पाहाता दिसतात. 'आशीर्वाद' शब्दाचा अर्थ कळतो, कुणी मागितला तर द्यायला तो शब्द उच्चारता येतो. आनंद वाटतो, उच्चारताना मात्र बहुधा 'आशीर्वाद' चा 'आशिर्वाद' होतो. अवघडपणाचा पहिला टप्पा इथं येतो. पुढं लिहिताना मात्र इतर टप्पे यायला लागतात. 'आशीर्वाद'वरचा रफार आशिर्वाद-आर्शिवाद असा अवघड पडतो. ज्यांना त्यांनी स्वतः केलेली प्रत्येक गोष्ट बरोबरच आहे, याची खात्री असते त्यांचा अपवाद सोडा. तसंच यात काही अवघडपणा आहे किंवा काही विचार करण्यासारखं आहे,हे ज्यांच्या

लक्षात येत नाही - असं होतं, त्यांचाही अपवाद सोडा. उरलेल्यांचा हात मात्र हा शब्द लिहिताना थोडा अवघडतो. खात्री, विचार, सराव यानं हे 'अवघड'पण 'सोपं' होतं, हाही अनुभवच आहे.

पण मी असं पाहातो की, ज्यात उच्चारण्यासारखं काही अवघड नाही, लिहायला त्याहून नाही, कळायला त्याहूनही नाही - असे आठ-दहा शब्द आपल्या भाषेत सतत 'अवघड शब्द' म्हणून गणले जाण्यासारखे आहेत. त्यांतले एक-दोन तर इतके साधे आहेत. साध्या शाळकरी मुलाला विचारा, 'मार्क का कमी पडले ?' तो लगेच सांगेल, 'पेपर यावेळी खूप अवघड काढले होते !' कुणी सांगेल, 'पेपर यावेळी कडक तपासले आहेत.' आपण, 'असं कसं होईल ?' म्हणून विचारलं की, लगेच उत्तर येईल,'आम्ही जास्त मार्क पडले तर गाफील राहू नये, भरपूर अभ्यास करावा म्हणून तसं करतात !' 'म्हणजे तुझा अभ्यास उत्तम झालेला आहे तर, फक्त तुम्ही फुगून जाऊ नये, पुन्हा अभ्यासाला लागावं म्हणून कमी मार्क पडले ना ?' अशी खात्री करून घ्या. लगेच होकार येईल.

थोड्या वेळानं पहा, तोच मुलगा टीव्हीसमोर सीरियल पहात बसलेला दिसेल, दोनदोन तास. 'उद्याचा अभ्यास ?' 'नंतर करणार आहे', नाही तर 'आज दिलाच नाही.' तुमच्याकडं न बघता उत्तर येईल. आता सहज विचार करा, एवढं फुगून जाऊ नये आणि अभ्यासाला लागावं म्हणून जर कमी मार्क दिले गेले असतील तर या टीव्ही बघण्यानं तो हेतू नक्कीच साध्य झाला नसला पाहिजे किंवा तो हेतूच नसला पाहिजे ! फक्त आत्ता कमी पडलेल्या मार्कांतून आपली सुटका व्हावी म्हणून पुढे केलेलं ते कारण आहे ! त्याहीपेक्षा खरं म्हणजे, अभ्यासात 'मी चुकलो, कमी पडलो, टाळाटाळ केली.' ही खरी कारणं टाळण्यासाठी पुढं केलेल्या या सबबी आहेत !

ज्या मुलानं 'यावेळी पेपर अवघड काढले' हे सांगितलेलं असतं त्यात क्वचित तथ्य असतं, नाही असं नाही. पण बरेचदा परिस्थिती 'स्वतःचा अभ्यास कमी पडला, त्यात मी दुर्लक्ष केलं.' हीच असते. प्रश्न अवघड आला तर सोडवण्या इतपत अभ्यास करणं, हा अभ्यासाचाच भाग नाही का ! तो तरी यानं नक्कीच केला नाही ना ? पण टाळणं, सबबी शोधणं, पळवाटा काढणं, मूळ मुद्याला बगल देणं,

पालकांना, शिक्षकांना भ्रमात ठेवणं - अशा अनेक खऱ्या कारणांसाठी असली अनेक वाक्यं अखंड फेकली जात असतात आणि आपल्याला ती ऐकावी लागत असतात.

परिणाम व्हायचा तोच होतो. शेवटी सत्याला सामोरं जायची वेळ येते. तेव्हा मात्र मग घोर निराशा, घात-पात, व्यसनं, गायब होणं, कुणी कुणाला पळवून नेल्याची नाटकं करणं, शिक्षक-क्लास-घरातली भावंडं-वातावरणं अशा कुणावरतरी दोषारोप ठेवणं, काहीच न घडल्यासारखं वागून हळूहळू निगरगट्टपणाच्या स्वभावाची विघातक घडण सुरू होणं, निकालच नको, त्यातून खोट्याचे-चोरीचे मार्ग चालू लागणं, मार्कांवर कुठं काय अवलंबून असतं म्हणून समाधान करून घेणं आणि तसं म्हणणारी मित्रमंडळी गोळा करणं - या वाटचालीची यादी एवढी मोठी आणि विघातक आहे की, ना तिनं कधी व्यक्तीचं हित झालेलं, ना समाजाचं !

वास्तविक याची सुरुवात खरं तर 'माझं चुकलं', 'माझा अभ्यास पुरेसा झाला नाही', असल्या दोन-तीन शब्दांच्या वाक्यांत आहे. त्यांतले शब्द खरं तर किती साधे-सोपे, अर्थाला कठीण नाहीत, उच्चाराला अवघड नाहीत, लिहायला त्याहूनही अवघड नाहीत. समजा, ते जर वेळीच उच्चारले गेले, मनापासून उच्चारले गेले तर, त्या व्यक्तीचा पुढचा सारा केवढातरी विघातक आणि विध्वंसक प्रवास थांबवणारे आहेत..!

ठीक आहे. वय, वातावरण, मनोरंजनाचं आकर्षण, संगती - अशा काही कारणांनी अभ्यास झालाही नसेल. तर तो करता येईल. परिस्थिती सुधारेल. प्रत्येकाची कुवत ही वेगवेगळी असते. प्रत्येकाचं स्थान वेगवेगळं असतं. प्रत्येक प्रकारची कुवत वेगवेगळी असली तरी, तिला योग्य अशी कामंही वेगवेगळी मिळू शकतात. त्यामुळं या न झालेल्या अभ्यासाच्या साऱ्याचा अकारण ताण आत्ता अभ्यास करताना घ्यायचं काहीच कारण नसतं. फक्त हा संवाद घरात एकमेकांशी होत नाही. पालकांना फक्त मार्कांचा ढीग हवा असतो, त्यांची एकच कल्पना असते की, मी तुला कशाला कमी केलेलं नाही, मग तुला मार्क कमी कसे पडले ? त्यातून एकतर संघर्ष होतात. संवाद नसेल तर माणसं तुटून जातात. मोठी माणसं म्हणतात, त्यांच नशीब अन् तो. पण यातून परिस्थिती थोडीच सुधारते ? ती तर उलट बिघडतेच.

हे सारे धोके टाळण्यासाठी, खरंतर या कठीण झालेल्या, अवघड झालेल्या शब्दांची एक प्राथमिक तरी यादी करायची निकड निर्माण झालेली आहे. अगदी साधं जोडाक्षरसुद्धा नसलेल्या 'मी चुकलो' इतक्या साध्या शब्दांपासून. ही वाक्यं तशी खूप छोटी आहेत. 'माझं लक्ष नव्हतं. मला कळत नाही. मला कळलं नाही. मी सुधारेन. मी संगत सोडीन. मी एखादी संगत मुद्दाम धरीन.' अशी पुढची अनेक वाक्यं 'माझं चुकलं' हे दोन शब्द उच्चारण्यानं सुरू होतात. ते शब्द उच्चारायला, कळायला खरंतर सोपे आहेत. पण ते उच्चारताना अवघड असले तरी, परिणामी अमृतासारखे ठरतात. हे शब्द कटाक्षानं उच्चारण्यात आपलंच अंतिम कल्याण आहे, नाही का ?

आता आपल्याला ते उच्चारायला एवढं काय आड येत असेल, त्याचाही विचार करावा. एक तर अहंकार, दुसरं आपली आपणच बनवून टिकवू इच्छीत असलेली चांगली प्रतिमा, तिला धक्का लागण्याची भीती. एकदा हे कबूल केल्यावर क्वचित होऊ शकणारा कसल्या तरी स्वरूपाचा त्रास, शिक्षा, घ्यावे लागणारे कष्ट, वाटणारा अपमान, मनोरंजन-करमणुकी - यांसारख्या काही मनाला आवडणाऱ्या-सवयीच्या पण आत्ता घातक ठरणाऱ्या गोष्टींचा करावा लागणारा त्याग - अशा अनेक गोष्टी असतील. पण एक नक्की की, सबंध आयुष्याला मिळणाऱ्या सुंदर वळणाचा, पुढं प्राप्त होणाऱ्या यशाचा, स्वास्थ्याचा विचार करता, त्यामुळं होणाऱ्या सामाजिक स्वास्थ्य-प्रगती-लाभ - यांचा विचार करता, या आड येणाऱ्या गोष्टी टाकणं, हा साधा सौदा म्हणूनसुद्धा परवडणारा आहे. उभयपक्षी फायद्याचा आहे.

कदाचित आपल्याला वाटेल की, हे सारं विद्यार्थी-अभ्यास-मार्क या क्षेत्रापुरतं आहे. पण अर्थात ते तसं अजिबातच नाही. त्याची व्याप्ती आपल्याला कल्पना येणार नाही, एवढी मोठी आहे. ती अशा विद्यार्थ्यांपासून आंदोलनाची हाक देताना योग्य तयारीपूर्वी ती दिली गेल्याची 'हिमालयाएवढी चूक माझी आहे', असं म्हणणाऱ्या महात्मा गांधींपर्यंत आहे. देशाच्याच काय, जगाच्या पातळीपर्यंत आहे. ज्यांनी हे अवघड वाटणारे शब्द वेळीच उच्चारून मार्ग दुरुस्त करून घेतले आहेत, ते स्वतःपुरते सावरले आहेतच, नव्हे त्यांनी जगाला सावरलं आहे, वळण दिलं आहे.

वापरल्यावर जाग्यावर परत न ठेवलेली घरातली साधी वस्तू घ्या, पुन्हा

तिची वेळेला, गरजेला शोधाशोध करण्यात जाणारा तासन्‌तास वेळ घ्या, वेळेत कळूनही न भरलेल्या बिलापोटी विनाकारण भरावा लागलेला दंड घ्या, वाटेत होणारे वाहनांचे अपघात घ्या, चुकीच्या औषधयोजना घ्या, सरकारी निर्णय घ्या, त्या साऱ्यांवरून पुढं होणाऱ्या कटकटी त्रास घ्या, बाहेर वेगवेगळ्या कामांवरून चाललेले अविरत संघर्ष घ्या - असंख्य ठिकाणी हे साधे पण 'अवघड बनलेले' शब्द उच्चारले गेले तर किती त्रास टळतील, संघर्ष कमी होतील, शक्तीचे अपव्यय टळतील..!

ज्यावर आज एवढी मोठी शक्ती, लोकांचा पैसा, अगणित माणसांतली जीव धोक्यात घालून चाललेली लढाई चाललेली आहे, ते गुन्हेगारी क्षेत्र घ्या. कित्येक गुन्हेगारांना त्यांचं चुकलं, हे मनोमन माहिती आहे, अनेक जण ते पश्चात्तापानं, पश्चात्‌बुद्धीनं का होईना, 'माझं चुकलं' म्हणतात. अशा घटना अनेकदा घडलेल्या आपण पाहिल्या असतीलच. अशा वेळी तरी निदान तेच त्यांचं म्हणणं जर तिथंच कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य मानलं जाण्याची यंत्रणा असेल, तर त्याचे परिणाम संबंधित गुन्हेगारानं शिक्षा-दंडांच्या रूपानं भोगूनसुद्धा प्रश्न लवकर सुटतील !

शिवाय त्याकामी राबवाव्या लागणाऱ्या कितीतरी गुंतागुंतीच्या, भयानक खर्चाच्या, प्रचंड वेळ अपरिहार्यपणे जाणाऱ्या तपासयंत्रणा वाचतील ! न्यायालयांवरचे वाढलेले अपरिमित भार कमी होतील ! यात होणारा फायदा अर्थातच सर्वसामान्य जनतेपासून सर्वांचाच आहे. गरज आहे ती फक्त या अवघड बनलेल्या शब्दांकडं लक्ष जाण्याची आणि ते सोपे शब्द उच्चारले जाण्याची!

भारताच्या भूमीतल्या माणसाच्या मेंदूत किती नष्ट करायचा प्रयत्न केला, तरी अजून टिकून असलेली लाखो वर्षांचा इतिहास असलेली सुप्त चांगुलपणाची पेशी माणसाला प्रथम, नकळत हे सोपे, साधे शब्द उच्चारायला अजून तरी प्रवृत्त करते आहे ! परिणाम सोसण्याची तयारी आणि धैर्य देते आहे ! क्षमेचे मार्ग मोकळे करते आहे !

सुधारणांच्या वाटा मोकळ्या आहेत. पण त्यासाठी त्याचे सहजतेनं उच्चारलेले 'माझं चुकलं' सारखे सोपे शब्द उच्चारायला आपण लहानपणापासून तयार होऊ का, तसं वळण स्वतःला आणि पुढच्या पिढीला देऊ का, हा प्रश्न आहे. तो आपण

सोडवला नाही तर, अशा सोप्या शब्दांनी जलद गतीनं सुटणारे हे प्रश्न आज आपण पाहातो, तसे अकारण अवघड झालेले दिसतील. त्याचे अनेक दुर्दैवी परिणामही आपल्याला भोगावे लागतील. वेगवेगळ्या हितसंबंधांसाठी, स्वार्थी हेतूंसाठी, खटले उभे करून तेच प्रश्न जटिल करण्यासाठी निर्माण केलेले सापळे बाजूला ठेवण्याचं धैर्य आपल्यालाच दाखवावं लागेल. ते एकदा दाखवलं तर मात्र कितीतरी लोकांचा पैसा, श्रम, वेळ वाचेल. आपण विचार केला तर लक्षात येईल की, हे शब्द आपणच अवघड करून ठेवले आहेत आणि ते सोपे करणंही आपल्याच हातात आहे !

कळकळीचा प्रश्न एवढाच आहे की, जे शब्द सोपे असताना आपणच भ्रमानं, अशुद्ध हेतूनं अवघड केले, ते निदान आपल्या आणि जगाच्या हितासाठी सोपे करायचं धैर्य आपणच कधी दाखवू ?

एक चांगलं आहे, जो ज्या दिवशी हे धैर्य दाखवील, त्याच्या आयुष्याचा मार्ग तरी, त्यात्या दिवशीपासून सोपा, सरळ, प्रगत होईल - स्वास्थ्याचा होईल !

*

६. फोन : कटकटीचा की कौतुकाचा !

बराच वेळ चाललेला फोन सुमतीनं खाली ठेवला. ठेवण्याच्या आवाजावरूनच कळत होतं तो किती काळ चालला असेल. विशेषतः कुणाचा असेल. तिच्या पतीनं - सुमेधनं- तोपर्यंत घरातली काही गडबडीची कामं उरकायला घेतली होती. वेळ सकाळची होती. त्यात साडेआठ झालेले. एव्हाना खरं तर स्वयंपाक उरकून जायला हवा. एरवी रोज असेही. पण असा फोन आला नाही तर. फोन आला की, किमान पंधरा मिनिटं - नाहीतर अर्धा तास. घरात दोन लहान मुलं. एकाला तर साडेसातला आवरून आधीच सोडून यावं लागे. दुसऱ्याचं आवरणं सुरू. ते अगदीच लहान. जमिनीवर दुपट्यावर. ते ओरडलं की, लक्ष देणंच भाग. त्यात हा फोन.

फोन आला की, ओळखायचं आता अर्धा तास जाणार. म्हणजे काही कामं कट करावी लागणार. धावपळ. बाळाच्या बाबांची धावपळ नि मदत. पण ती किती झालं तरी वरवरची. स्त्रियांची स्वतःच्या कामाची अशी एक आखणी आणि गती असते. त्यात ट्रॅफिकमधून लीलया गाडी पुढं काढणाऱ्या आणि सारे सिग्नल बरोबर चुकवीत जाणाऱ्या एखाद्या ड्रायव्हरची अचूकता आणि कौशल्य असतं. विशेषतः सुमतीसारख्या नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा उरक नि गणित काही आणखीच वेगळं असतं. त्यात असंच ट्रॅफिकमधून अलगद गाडी पुढं काढताना, कुणीतरी ट्रॅक्टरसारखं काही वाहन आडवं घातल्यावर जसं होतं, तसा हा फोन आल्यावर होई. गाडी एकदम गीअर तीन, दोन, एक करीत जवळपास थांबल्यासारखीच व्हायची.

फोन कधी तिच्या आईचा, कधी सुमेधच्या. बरं, सकाळसकाळी सारी कामं अडवून विचारण्यासारखं किंवा सांगण्यासारखं काही असेल म्हणावं, तर तसंही नाही. स्वयंपाक उरकला का, आंघोळी झाल्या का, मन्या शाळेत गेला का, धाकट्याचा खोकला कमी झाला का, जागवतो का - झोपतो का - असे असंख्य प्रश्न. उत्तरं थोड्याफार फरकानं तीच. बरं, गडबड आहे म्हणून थोडक्यात सांगावं, 'हो-नाही-झालं-ठीक आहे' असं बोललं तर प्रश्न आणखीच वाढायचे. 'आज काय झालंय का, दोघांचं नीट आहे ना, भांडलाबिंडला नाहीत ना, तब्येती बऱ्या आहेत का, आवाज बसला आहे का' - एक मोठी सरबत्तीच. त्यापेक्षा सगळ्या प्रश्नांना नीट

उत्तरं दिलेली बरी, असं वाटे. आपण शाळेत पूर्ण वाक्यांत उत्तरं द्यायचे प्रश्न सोडवतो तसं.

बरं, फोन न घेऊन चालत नसे, तो बाबांनी घेऊन चालत नसे, उशीर होतोय अशी तक्रार करून चालत नसे. कारण दोन्हीही आयांनी नोकऱ्या केलेल्या, चांगल्या पेन्शन घेणाऱ्या. त्यामुळं आणखी ऐकावं लागे - उरक पाहिजे, लवकर उठलं पाहिजे, आम्ही नाही का केलं, तरी मुलगी नाही म्हणून बरं, आम्ही चारचार मुलांचं केलं, भाऊजींची गावाकडची दोन मुलं आपल्या दोन मुलांबरोबर शिकायला कशी होती, त्यांचं कसं करावं लागे, शिवाय अलीकडच्यासारख्या फ्रीज, गॅस अन् ओव्हनसारख्या सोयी नव्हत्या तरी कसं वेळेत उरकत होतो - वगैरे..वगैरे... ऐकणारा चुकलं म्हणेपर्यंत. त्यामुळं तोही मार्ग बंद. फोन काढायची सोय नाही - एंगेज लागत होता, कुणाचा आला होता इतका वेळ ... सुरू..!

खात्याच्या कृपेनं किंवा वारावादळानं काही वायर तुटून बंद पडला, तर सुमेधच्या ऑफिसवर फोन - कंप्लेंट नोंदवली का, दुरुस्त झाला की रिंग द्या... ते सुरू..!

बरं, असंही नाही, कुणाची एकाचीच आई हे म्हणे. दोघांच्याही आईंचे फोन आलटूनपालटून येत असल्यानं एकमेकांत तक्रार करायचीही सोय नाही. फक्त उचलला की एकमेकांना खूण करायची, कुणाच्या आईचा 'माझ्या की तुझ्या ' कारण त्यानुसार - बोलणं-माहिती यांची दिशा थोडी बदले. पण प्रश्न तेच.

असं केवळ यांच्या प्रपंचातच होतं असं नाही. कधीकधी ऑफिसमध्ये चर्चा होई, तेव्हा हेच कळे की, बऱ्याच घरी हा प्रश्न होता. नाही, आहे ! कारण एकच, रिकामा वेळ ! सकाळी लवकर उठून, एकदा योगासन, व्यायाम, फिरून आलं की, पुढं दिवसभर टीव्हीशिवाय म्हणावं असं काम नाही. वेळ रिकामाच. त्या रिकाम्या वेळेचा विधायक उपयोग कसा करावा, याचं प्रशिक्षण न मिळता मिळालेला रिकामा वेळ ! त्यात अकारण काळजी करण्याची लागलेली सवय. स्वतःचं स्वामित्व आपल्या घरातूनही आपल्या मुलगा-सुनेवर ठेवण्याची सुप्त इच्छा. आपण जणू काही दोघांचीही काळजी करण्याचं कर्तव्यच पार पाडीत असल्याचा वर आव, मुलामा !

वेळ असतो, शक्ती असते, कामांचा अनुभव असतो म्हणून त्या-त्या

ठिकाणी जाऊन काही मदत करावी, ते नाही. ते करायला गेलंच तर असं की, तिथल्या प्रत्येक गोष्टीला नावं ठेवायची, त्या चुकीच्या कशा आहेत, अगदी भाजीपासून खरेदीपर्यंत काय करणं योग्य आहे, ते सांगणं. त्या निर्णयांचा ताबाच घेणं, अशा साऱ्या कामांच्या पद्धतीमुळं-त्यांचा फोन परवडला, पण येऊन प्रत्यक्ष मदत नको, म्हणायची वेळ. जरा काही बोलायला जावं तर, एक तर वयच काढतील, अनुभवच काढतील, नाहीतर मग फुरंगटणं- त्याला मौन म्हणायचं ! म्हणजे तसाही त्रास.

आज कित्येक घरात मधल्या -त्यामानानं बऱ्या गेलेल्या- काळानं नोकऱ्यांच्या संधी आल्या, अनेकांचं राहणीमान सुधारलं, निवृत्तीनंतर पैशाच्या चिंता राहिल्या नाहीत. गुंतवणुकीवर नि निवृत्तिवेतनांवर जगण्यासारखी परिस्थिती असल्यानं, प्रकृतीची साथ असल्यानं, स्वतंत्र राहण्याची सोय व शक्यता. या अनुकूलता जरूर असाव्या, पण त्यांचं असं नकोसं, साठलेलं तळं बनणंही अर्थातच चांगलं नाही. मुलांवर अवलंबून राहावं लागत नाही, ही परमेश्वराची-निसर्गाची शारीरिक, आर्थिक, परिस्थितीरूप कृपा आहे. तिचं भान जाऊन कसं चालेल ? त्या कृपेच्या तळ्यावरून उलट चार गरजूंच्या कामी पाण्याच्या घागरी रवाना झाल्या, सामाजिक कामांना, छंदांना, इतर घटकांना पोचल्या तर तळं असं साचून कुजणार नाही. ते नकोसं होणार नाही. आजही कितीतरी कामांना, संस्थांना, माणसांना रिकाम्या, कार्यक्षम माणसांची, त्यांच्या मदतीची गरज आहे. याच पाण्याच्या घागरी अशा बिनगरजेच्या फोनवर न ओतता पाण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या रोपांच्या मुळांत ओतल्या, तर ती जगतील.

आपापल्या मुलांच्या घरातली स्वास्थ्यही कायम राहतील, टिकतील, वाढतील. त्यांची वाहनं त्यांच्या पिढीच्या, गरजांच्या गतीनं त्यांना हाकता येतील. त्यांना योग्य वाटणारी ध्येयं त्यांना गाठता येतील. माणसंही मग एकमेकांना कंटाळणार नाहीत. कधीतरी येणाऱ्या फोनलाही नाहीत ! मग तोच फोन विनाकारण, अस्वास्थ्याचा नि तापाचा राहणार नाही. कौतुकाचा ठरेल-ठरावा ! तो कटकटीचा ठरवायचा की कौतुकाचा आपल्याच हातात आहे !

*

७. प्रेरणा !

आमच्या जवळच्या एका मित्रानं मला बाळाभाऊंचं आत्मचरित्र आणून दिलं. 'प्रेरणा'. नाव वाचूनही आनंद वाटला. बाळाभाऊ आमचे सर्वांचेच जुने मित्र असल्यानं, त्या मित्रानं अगत्यानं ते काम केलं. मलाही आनंद झाला. बाळाभाऊंचं आत्मचरित्र ही मलाही उत्सुकतेची गोष्ट होती. माझा-त्यांचा इतरांपेक्षा थोडा जास्त आणि लहानपणापासूनचा परिचय होता. पण आता नोकरीनं मला खूप दूर आणलं होतं. गावाकडं जाणं ही गोष्ट तशी अवघड झाली. फक्त फिरतीवरच्या नोकरीतले कुणी येत-जात, तेव्हा ख्यालीखुशाली कळे.

मित्रानं नुसतं आत्मचरित्र दिलं नाही, तर हेही सांगितलं की, त्यांच्या मुलाला इकडची मुलगी केली. त्यांच्या गावी ते पंधरा दिवसांनी येणार आहेत. ते तर इथं अर्ध्या तासावर आहे. जमलं तर भेट घे. मला त्यामुळं आणखी आनंद झाला आणि मी 'प्रेरणा' त्यामुळं उलट लगेचच वाचायला घेतलं. त्या दोन-तीन दिवसांत ते संपलंही. त्यांच्या जीवनाला मिळालेल्या 'प्रेरणा' त्यांनी नेहमीच्याच सहज सुलभतेनं, प्रांजळपणे मांडल्या होत्या.

मला निदान त्यांच्या पन्नाशीपर्यंतच्या आयुष्यातल्या घटना बऱ्यापैकी माहीत होत्या. शिक्षणातल्या प्रतिकूलतेवर मात करीत त्यांनी शिक्षण तर घेतलंच, पण गावीच असलेल्या छोट्याशा शेतीला धरून पूरक उद्योग काढला. जिवाचं रान करीत तो वाढवला. गावातल्याच नव्हे तर, परगावच्या अनेकांना त्यामुळं रोजगार मिळाला. ते त्या उद्योगाचे मालक म्हणून कधी वावरलेच नाहीत. उलट इतर सहकारी अधिकारी, नोकर यांच्याबरोबर जणू ते एक सहकारीच होते. तो उद्योग जणू त्या सर्वांचाच होता. त्यामुळं ते नुसतेच एक यशस्वी व्यक्ती म्हणून मानले जात नव्हते. ते अनेकांची प्रेरणाही होते. घरच्या जिव्हाळ्याच्या सदस्याचं स्थान त्यांना अनेक घरांत होतं.

अशा असंख्य माहितीच्या घटना त्यांच्या त्या आत्मचरित्रात येऊन गेल्या होत्या. कितीतरी माहीत नसलेले तपशील, अगणित घटना, त्यांच्यामागची पार्श्वभूमी कळली. त्यांनी हे लिहून ठेवलं ते फार बरं झालं, असंच सारखं वाचताना वाटत होतं. कारण आमच्यासारखे कुठल्या तरी पाट्या टाकीत आयुष्य काढणारे हजारो असतात.

पण ज्यांच्या जगण्याला असं उच्च ध्येय असतं, त्यात अपार कष्ट असतात, तेही नुसते स्वतःसाठी नसतात, त्या कष्टांत एक बुद्धिमत्ताही असते आणि कष्टांत अनेकांचं कल्याण करण्याची दुर्दम्य इच्छा असते, ज्यांच्या जगण्यानं त्यांचं तर सार्थक होतंच, पण इतर असंख्य लोकांचं जीवन उजळून निघतं, त्यांच्यामुळं सामान्यच काय, असामान्य माणसंसुद्धा खऱ्या अर्थानं मोठी होतात - अशा बाळाभाऊंसारख्यांनी हे लिहावंच, असंच वाटत होतं. वाचताना पानोपानी ही इच्छा पुरी होत होती.

वास्तविक आत्मचरित्राबद्दल अनेक मतं आढळतात. एकांनी केलेली व्याख्याही प्रसिद्ध आहेच की,ज्यांना आपल्यामागं आपल्याबद्दल कुणी चांगलं लिहील की नाही, अशी शंका वाटते त्यांनी स्वतःच्या हयातीतच स्वतःच्या चांगुलपणाबद्दल केलेलं चरित्रात्मक लेखन म्हणजे आत्मचरित्र ! अनेकदा अशा पुस्तकांतली आत्मप्रशंसा, प्रौढी, अहंकार, इतरांबद्दल तुच्छता, आपल्याच कार्याचं स्वतःला वाटणारं कौतुक - अशा असंख्य गोष्टींनी अशा व्याख्या आणि काही नकारात्मक मतं खरी ठरवली आहेत, हे आपणही जाणतो. पण बाळाभाऊंच्या स्वभावाचं प्रतिबिंब दाखवणारं ते आत्मचरित्र मात्र त्याला अपवाद होतं. त्याचा उद्देशच प्रेरणा घेणं आणि देणं हा होता. तीही निखळ होती. बाळाभाऊ लगेच या भागात यायचेच होते. त्यामुळं त्यांच्याशी त्वरित संपर्क साधून, मी त्यांची वेळ ठरवून, भेट घेतली.

भेटल्याचा आनंद त्यांना नेहमीसारखाच होता. त्यांच्या लेखी एवढं ते आत्मचरित्र, त्यावरची आताची माझी ही प्रतिक्रिया काय-वगैरे गोष्टींना स्थानच नव्हतं. एवढं आवर्जून संपर्क साधून, वेळ काढून भेटल्याबद्दल, जुनी मैत्री ताजी केल्याबद्दल मनमोकळे आभार होते. आपुलकी पूर्वीप्रमाणंच ओसंडून वहात होती. मला पुन्हा ताजंतवानं व्हायला झालं. मी त्या आनंदात, ओघानं वाचताना येत असलेली डोक्यातली एक शंका विचारली, 'बाळाभाऊ, तुमच्या पुस्तकानं आनंद तर दिलाच. पण एक मात्र सारखं विचारावंसं वाटत राहिलं की, साऱ्या नाही तरी काही घटनांत, मला तुमच्याजवळून त्या काळात वावरता आलं आहे. काही प्रसंग मी लांबून अनुभवले आहेत. लोक तुम्हाला आज यशस्वी उद्योजक म्हणून ओळखतात, आदर देतात. हे सारं खरं आहे. पण तुम्हाला कित्येक प्रसंगांत कित्येक व्यक्तींकडून त्रास सोसताना मी पाहिलं आहे. अनेकांच्या असूया, मत्सर, त्यापोटी त्यांनी निर्माण केलेले अडथळे

तुम्ही सहन केलेले आहेत. कित्येक लाभांवर, हक्कांवर तुम्ही पाणी सोडलेलं आहे. अनेकांनी अनुल्लेखानं तुम्हाला दुखवायचा प्रयत्न केला, तर कुणी प्रत्यक्ष निंदा करून ! पण त्यांच्याविषयी या साऱ्या प्रवासात तुम्ही कुठंच उल्लेखही केला नाही. हे तुम्ही मुद्दाम केलं का ?'

बाळाभाऊ दिलखुलास हसले. म्हणाले, 'मला वाटलंच, तुमच्यासारखा माझा जुना माणूस हे विचारील. मला अनेक वाईट माणसं भेटली, अनुभवही आले. पण हे मीच लिहीत असल्यानं काय लिहायचं ते स्वातंत्र्य होतं ना, म्हणून मी त्याचा वापर केला !'

आमचे संबंध जुने होते. मी म्हटलं, 'तुम्ही स्वातंत्र्याचा वापर करून उलट लिहू शकला असता, म्हणून विचारलं. तुम्ही तर स्वातंत्र्याचा वापर करून लिहिलं नाही, म्हणून मुद्दा बरोबर टाळला. मग हे लेखन प्रामाणिक नाही, असं नाही का म्हणता येणार ?' मला माहीत होतं, मी जरा एक प्यादं एका वेळी एकाऐवजी दोन घरं चालवलं होतं. पण ते धाडस मैत्रीत नुसतं माफ होणारं नव्हतं तर त्या निमित्तानं मला उलट बाळाभाऊंच्याकडून काही प्रगल्भ गोष्टी ऐकायला मिळाल्या असत्या.

बाळाभाऊ उत्तरले, 'खरं आहे. त्या अर्थानं ते लेखन अप्रामाणिक आहे खरं. पण तुम्हाला सांगू का, याबद्दल दोन-तीन गोष्टी मी तरी नेहमीच लक्षात घेतो. एक तर, एखाद्या प्रसंगात एखादा माणूस माझ्याशी वाईट वागला, चुकीचं वागला. हे कळलं, तरी हे मी नेहमीच लक्षात ठेवतो की, मला त्याचं 'वाईट, चुकीचं' वाटणारं वागणं हे, माझ्या बाजूनं पहाताना घडणारी प्रतिक्रिया आहे. त्याच्या बाजूनं त्यात खरं कायकाय असेल हे मला माहीत नसतं किंवा पूर्ण माहीत होण्याची अनेकदा शक्यताही नसते. त्यामुळं त्याक्षणी ते चुकीचं असलं तरी ते उगाळीत राहण्यात अर्थ नसतोच पण ते 'चुकीचंच आहे', असं ठामपणे समजण्यातही अर्थ नसतो.

'अनेकदा मला ते चुकीचं वाटतं याचं कारण मला ते सोयीचं नसतं, मला वेळेला उपयोगी पडणारं नसतं, सुखाचं नसतं किंवा त्रासाचं झालेलं असतं - हेही असतं. त्यांतही पुन्हा चूकबरोबरच्या माझ्या काही कल्पना आहेत, त्याबद्दल माझ्यावर झालेले संस्कार आहेत. त्यांतले काही तर इतके पक्के आहेत की, काळानं, अनुभवानं अनेकदा त्या गोष्टी चुकीच्या, जुनाट ठरूनसुद्धा त्या सोडण्याचं धाडस मला होत

नाही, हे खरं आहे ना ?

'मग मला सांगा, त्यालाही त्याच्यात्याच्या चूकबरोबरच्या कल्पना बाळगण्याचं, त्यानुसार माझ्याही कृती वाईट-चुकीच्या ठरवण्याचं स्वातंत्र्य आहेच. अंतिमतः चूक-बरोबर ठरवणं तर खूपदा कठीण जातं. आज बरोबर, योग्य वाटणारं काळानं उद्या चूक ठरतं, अयोग्य, अनावश्यक ठरतं. त्यामुळं कुणाला चुकीनं, वाईट लेबल लावणं अवघड तर आहेच, पण काही वेळा अन्यायाचंही आहे.

'तुम्ही व्यवहारात पाहिलं आहे ना, आपलाच अनुभव पाहा. एखादा मनुष्य वेळेला आपल्या उपयोगी पडला नाही, त्यानं मदत केली नाही की, तो आपल्या दृष्टीनं वाईट ठरतो. ती भावनिक वेळ जरा जाऊ द्या. ती अडचण मागं पडू द्या. मग शांतपणानं आपणच विचार करावा की, पूर्वी माझ्यावर किती वेळा वेळ आली, आपण हाक दिली आणि तो मदतीला आला. तर शांतपणानं, काही काळानं आपणच मनोमन सांगू शकू की, पूर्वी आठ-दहा वेळा तरी असं घडलेलं आहे. त्यानं मदत केली आहे. या वेळी त्यानं केली नाही म्हणून तो समजा वाईट असेलच तर, पुरता नक्कीच नाही. काय तो एक दशांश वाईट असेल. एक अकरांश वाईट असेल. पण आपलं दुर्दैव असं की, आपल्याला लाभलेलं मन फक्त हा त्याला एकवेळचा वाईटपणा देतं, लक्षात ठेवतं नि दहा वेळचा चांगुलपणा विसरून जातं. इतकंच काय, त्याच्या आधीच्या दहा चांगुलपणांची साधी आठवणही उरत नाही, जाणीव-कृती तर दूरच. म्हणून वाईट लक्षात ठेवणं, किंवा निदान उगाळणं हा अविवेक नाही का ?'

मी बाळाभाऊंना म्हटलं, 'अजूनही कारणं असतील. खरं तर ती शिकण्यासाठीच मी विचारतो आहे...'

ते सहजतेनं म्हणाले, 'असं पाहा, जगात आधीच एवढ्या वाईट गोष्टी आहेत. आपापली व्यक्तिगत मतं, अनुभव एक वेळ जाऊद्यात. पण इतका खूनखराबा-बेदरकार वहानं-अपघात-भ्रष्टाचार-लाचखोरी-बलात्कार-दहशतवाद-हिंसाचार असंख्य गोष्टी वाईट आहेत. नाईलाजानं त्याची दुर्गंधी सामान्य माणूस सहन करतो आहे. त्यांच्याबद्दलचा त्रास त्याला आधीच आहे-रोजचाच आहे. त्यात वाईटपणा दाखवून, सांगून आपण आणखी भर घालायची का ? वास्तवता असावी, कथनात सत्य असावं, तथ्य असावं हे खरं असलं तरी, तारतम्यही असावं. आधीच वाईटाच्या या

आगीत मनुष्य होरपळत असेल तर, माझ्या वाईट कथनानं भले ते सत्य असेल, तोच माणूस आणखी होरपळून निघणार नाही का ? त्यापेक्षा चांगल्या अनुभवाची एखादी फुंकर त्याला विसावा नाही का देणार ? बरं, ती काही असत्य अनुभवाची नाही, काल्पनिक अनुभवाची नाही, खऱ्याचीच ना ?

'अर्थात यात मतभेद असू शकतीलच. अनेक जण आग लावीत निघाले असतील तर एखाद्याचं म्हणणं पडेल, तुम्ही त्यांना रोखा, आवर घाला. एखादा म्हणेल, तुमच्याकडं पाणी आहे ना, त्याच्या बादल्या आणून ओता. निदान थोडी आग तरी विझेल, झळ कमी होईल, नुकसान टळेल. एखादा रागानं अशीही प्रतिक्रिया देईल, ते आगी लावतात ते चुकीचं आहे ना, मग तुम्ही त्याला आग लावूनच प्रत्युत्तर द्या. असे अनेक दृष्टिकोन, मतं असू शकतील. पण मी तर तसा एक अगदी सामान्य माणूस आहे. मला सुदैवानं चांगल्याचाही खूप अनुभव आला आहे. म्हणून मी तो मांडला, तुम्ही ठरवा बाबा, चूक बरोबर !'

माझ्या मनात आलं, वास्तविक बाळाभाऊ चांगलं, जगावेगळं मांडीत होते. माझ्यासारखे असंख्य त्यामुळं अधिक चांगलं जगणार होते. पण हे सांगतानासुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर काही जगावेगळं केल्याचा भाव नव्हता. नेहमीचाच काही विशेष न केल्याचा प्रांजळ भाव होता. निगर्वीपण होतं. आपुलकी होती. ती तर आणखीच मोठी 'प्रेरणा' होती, साक्षात 'प्रेरणा !'

मी नकळत उद्‌गारलो, 'बाळाभाऊ, आम्ही काय चूकबरोबर ठरवणार ? आणि कसं शक्य आहे ते ? तुम्ही उन्ह अंगावर घेऊन सावली देणाऱ्या झाडासारखे आहात. आम्ही तर असे ऊनपाऊसही झेललेले नाहीत अन् इतरांना सावलीही दिली नाही. उलट आम्हीच तुमच्यासारख्यांच्या सावलीला उभे आहोत. आम्ही उलट यांतून कसा विचार करता येतो, वागता येतं, ते शिकण्याचा प्रयत्न करणार, आमची तेवढी कुवत नाही, पण प्रयत्न तरी करणार, 'प्रेरणा' घ्यायचा, 'प्रेरणा !'

*

८. मेक-अप्

अनेकदा शब्दांचा वापर आपल्या बोलीभाषेत मुक्तपणानं सुरू असतो. अर्थ समजण्याच्या जरुरीपोटी ते वापरायला सुरुवात झाली. त्यात ते विशेषतः इंग्रजी असले की, जरा उगाचच प्रतिष्ठितपणाचे वाटतात. मनुष्य व्हायचा त्याच दवाखान्यात दाखल होतो. पण 'ॲडमिट' झाला म्हटलं की, उगाचच काही विशेष घडल्यासारखं वाटतं. जातो प्रातर्विधींनाच, पण जरा 'टॉयलेट'ला म्हटलं की, जणू काही महत्त्वाचं, अवघड कार्य करून आल्यासारखा वाटतो. बसतो तो हृदयविकाराचा झटकाच, पण 'हार्ट ॲटॅक' म्हटलं की एकदम आपली पत वाढली, उच्चभ्रू असल्यासारखं का वाटतं, ते आपणच ओळखावं.

महाविद्यालयात 'प्रवेश' घेतला की, काही तरी मिळमिळीत वाटतं. 'कॉलेजात ॲडमिशन' घेतली की, जणू मोठ्या कुठल्या तरी 'मिलिटरी ऑपरेशन'वर रवाना झाल्यासारखं वाटतं. अनेक पिढ्यांच्या गुलामगिरीनं मनावर सोडलेला हा परिणाम आहे, हे लक्षात येईल तेव्हा येवो. शब्दांना मात्र आम्ही नुसते कवटाळून बसलो आहोत, असं नाही. ते बदलत बदलत त्यांच्या अर्थांचाही आम्ही चांगला विकास घडवला आहे, असं आपल्या लक्षात येईल.

असा एक शब्द म्हणजे 'मेक-अप् !' 'मेक'पासून अनेक शब्द होतात. आपण ते वापरतोही. जसं मेक अप् युवर माईंड - मनाचा निर्धार कर, निर्णय घे. पण या मेक-अप्नं केलेलं कार्य आणि घातलेला गोंधळ मात्र केवढा मोठा आहे, याची कल्पनाच केलेली बरी. पूर्वी शब्द आला, तेव्हा चेहऱ्याला थोडीफार काही सौंदर्यप्रसाधनं लावण्यापुरता हा मेक-अप् शब्द होता. त्यामुळं सामान्य माणसांना ते 'पावडरकुंकू' आहे, एवढंच कळत होतं. किंबहुना 'पावडरकुंकू' करून येते - असा मेक-अप् शब्दाला मराठी पर्यायही अनेक दशकं रूढ होता.स्वच्छ तोंड धुऊनही काम होत होतं!

पण सिनेमा आला, सौंदर्याची जाणीव नव्हे 'ब्यूटीसेन्स' (?) आला. साधी पावडर नि कुंकू कुठं कधी हरवलं, ते कळलंच नाही, इतका प्रसाधनांचा लोंढा आला. यादी लिहायची गरज नाही, इतकी ती आता परिचित आहे. घरोघरी पोराबाळांना माहिती आहे. एकवेळ तरुणींना, युवतींना त्याची काय ती गरज असेलही. पण हा

'मेकअप्'सेन्स आता वयस्करच काय, वृद्धातिवृद्ध स्त्रियांनाही आला. येवो बिचारा. पण हा 'एस्थेटिक सेन्स' पुरुषांनाच नव्हे तर, अजाण मुलांनाही जाणवायला लागला. त्यातल्या एका मुलाला 'मेक-अप्'चं स्पेलिंग विचारता, या मराठीनं आपल्याशा केलेल्या आणि आता फार वेगवेगळ्या थरांवर पोचलेल्या शब्दांचं स्पेलिंग 'एम् ए वाय्, सी यू पी' असं गडबडीत सांगून, तो 'क्रीम' लावून 'स्प्रे' मारायला पळालासुद्धा. कारण त्याला कुठल्यातरी मित्रांच्या पार्टीला जायचं होतं !

थकल्याभागल्या चेहऱ्याला जशी थोडी पाणी मारण्याची गरज आहे, मनुष्य घाम पुसतो, तोंड धुतो, चेहरा गोरागोमटा वाटावा, घामेजू नये म्हणून वर पावडर लावतो एवढंही समजू शकत होतं. पण हा जोडशब्द मेक-अप् आता 'मेकप' झाला होता. आमच्या जरुरीनुसार त्याचा अर्थ आणि वापर यांची ओढाताण 'सौंदर्यभ्रमानं ग्रासलेल्या' सर्वांची सुरू झाली. चेहऱ्यात थोड्या दुर्दैवानं असलेल्या त्रुटी, उणिवा - यांना झाकून तो चांगला वाटेल, असं करण्यापुरतं या मेकपचं कार्य राहिलं नाही, हे आपण आता जाणलं आहे.

गळ्यात घातलेली चेन, दागिना लखलखत असला म्हणजे माणसाची पत, श्रीमंती जोखता यायची. आता लांबूनच काय, जवळून पाहिलं तरी, तो दागिना लॉकरमधून आणलेला, खरा सोन्याचा आहे की, हजार-दोन हजाराला मिळणारा बेंटेक्स आहे, ते कळणं कठीण झालं. त्याहीपुढं जाऊन तो खरा की कार्यक्रमाच्या तीन-चार तासांपुरता दोनपाचशे रुपयांचा 'मेकपसाहित्यातला' भाड्याच्या साहित्यापैकी आहे, हेसुद्धा ठरवणं कठीण झालं. पूर्वी मेक-अप म्हणून लावीत, ती पावडरची डबी घेण्याइतपत ऐपत तरी त्या पावडर लावणाऱ्याची होती. तो कार्यक्रमापुरता काळ्याचा गोरा भासेना का, त्यासाठी लागणाऱ्या खर्चाइतपत तरी त्याच्यावर विश्वास ठेवता येत होता. आता परिस्थिती बदलली.

मेकप रुळला तो इतका की, तो असा साधा, फारसा उपद्रवी नसलेला, उलट काही वेळा त्वचेला गरजेची मदत वेळेला देणारा प्रकार होता. पण पुढं त्याच्या चुकीच्या व अतिवापरामुळं तो तसा प्रकार न ठरता, अविश्वास नि संशयाचं प्रतीक झाला. लग्नापुरत्या आणलेल्या भाड्याच्या दागिन्यांच्या मेकपवरून लग्नं मोडली जाऊ लागली, चांदीला सोन्याचं मेकप केलेले दागिने सुनांना माहेरची वाट दाखवू लागले.

म्हणून म्हटलं की, या मेकपनं बराच गोंधळ सुरू केला, नव्हे अजूनही करतो आहे. एखाद्या रोगाचा फैलाव व्हावा, तसा विविध क्षेत्रांत तो पसरून आता विषाणू ठरणार आहे, हा धोका आपण ओळखला तर बरं होईल.

विद्यार्थ्यांचा अभ्यास नीट घेतला जात नाही, तेही नीट घरी गृहपाठ करीत नाहीत. परिणामी गुण कमी पडून नापासांचं प्रमाण वाढलं. ते इतकं की, शून्य टक्के निकालापर्यंत काही शाळा घसरल्या. मग परीक्षेच्या पद्धतीत मेकप सुरू झालं. कारण शिक्षणक्षेत्राचं असं भयाण, पण खरं दृश्य पाहाणं शाळांना - पालकांना कठीण झालं. तर सरकारला अडचणीचं. मग पेपर सोपे काढण्याचा एक मेकप प्रकार करून झाला. हुकमी मार्क देईल, असा ऑब्जेक्टिव्हचा मेकप करून झाला. पण मूळ अभ्यासच कच्चा असल्यानं, हे करूनही चेहरा सुधारेना. निकालाची शाळेची तरी टक्केवारी वाढू दे, म्हणून गुणवत्तेला कमी पडलेल्या पण इतर परीक्षा तंत्रज्ञानात प्रवीण विद्यार्थ्यांनी कॉपीचा मेकप फासून पाहिला. तो यशस्वी झाला. पण तो कायदेशीर नसल्यानं, कडक तपासण्या, भरारी पथकं, पोलिस - अशा असंख्य यंत्रणा हा मेकप रोखण्यासाठी राबवाव्या लागल्या. खरं तर, वेगळ्या कामांसाठी असलेल्या या जिल्हाधिकारी, पोलीस अशा महत्त्वाच्या यंत्रणांवर या मेकपनं अपरंपार खर्च, कितीतरी अनावश्यक कामांचा ताण आणला.

मूळ प्रश्न उत्तम व दर्जेदार शिक्षण. परीक्षापद्धतीतला प्रामाणिकपणा. तो प्रामाणिकपणाही राखून जो मिळेल तो निकाल खरा म्हणून स्वीकारणं - आणि पुढच्या गुणवत्तावाढीच्या उपाययोजनांना लागणं, ही सरळ कार्यपद्धती. ती वेळखाऊ नि कष्टाची असल्यानं, पुन्हा मेकपचा काही नवा प्रकार कायद्याच्याच चौकटीत शोधता येण्याचे प्रयत्न झाले. विद्यार्थ्यांना बाहेरून घेतली जाणारी ही परीक्षा आणि मार्क यामुळं त्रास होतो आहे. त्यांना कॉपीसारखी उघड वाईट दिसणारी, खालच्या दर्जाची मेकपपद्धत टाकून त्याऐवजी त्यांच्या वर्षभराच्या कामाच्या मूल्यांकनाचे वीस मार्कच शाळाशाळांकडं द्यावे व उरलेल्या मार्कांची परीक्षा घ्यावी, असा मुलायम, सोज्ज्वळ मेकअप निघाला. पास व्हायला पस्तीस पुरतच होते. तेही खरं तर, पंचवीसच्या पुढं असलं म्हणजे मेकप करूनच पुढंपुढं न्यायचे होते. त्यातही वीस गुण शाळेकडं.

अखेर शाळा विद्यार्थ्यांची - विद्यार्थी शाळेचे. सर्वांना वीस किंवा जवळपास

दिले तरी, एकदोन पानं पेपरमध्ये लिहिली तरी, एकदम पाससाठी हा मेकप एकदम कायदेशीर कक्षेतला असल्यानं, विद्यार्थ्यांपासून अधिकारीच काय, सर्व संबंधित मंत्र्यांपर्यंत सर्वांचे चेहरे उजळून टाकणारा हा मेकप खूपच उपयोगी ठरला. गेली पाचपन्नास वर्षं पन्नास टक्केसुद्धा न गाठणारं पासिंग पर्सेंटेज एकदम सत्तरजवळ नेणारा ठरला. ज्याचा त्याचा मेकप त्यानं त्यानं बरोबर केला, त्यामुळं 'निकालाची फत्ते' झाली.

पण मुळात मेक-अप हा - नसलेलं, आहे - हे दाखवण्याचा अर्थ असलेला शब्द ठरला. आधी सत्तरसत्तर टक्के निकालानं बेंटेक्सला सोन्याची झळाळी दिली. विद्यार्थी, शाळा, संस्था, सर्व खाती खूश झाली. पण पुढच्या सार्वत्रिक परीक्षांत मात्र निकाल वीसतीस टक्क्यानं खाली येऊ लागले. पुढं परीक्षांची भीती, तणाव, पुढचे प्रवेश, त्यात निराशा - अशा अनेक गोष्टी वाट्याला यायला लागल्या कारण - अखेर खोटं ते खोटंच असल्यानं बेन्टेक्स काळं पडू लागलं. एकतर कष्ट, वेळ खर्च करून सोन्याचं पाणी द्यायचं, नाहीतर शंभरदीडशे काय मिळेल त्याला विकून टाकायचं, तसं झालं. त्यामुळं पुढं एकदम निराशा, करिअरचे स्वप्नभंग - कायकाय होतं आहे ते आपण पाहातोच आहोत !

पण हा मेकपचा शिरकाव वेगवेगळ्या क्षेत्रांत झाला. मुळात खोट्याचं खरं भासवण्याची विद्या असल्यानं - तेवढा सुपीक मेंदू असलेल्यांनी मनीचेन काढल्या, भांड्यांवर भांडी-फुकटचे गाळे काढले, थोडे दिवस टेबलखुर्ची, बोर्ड, उद्घाटन कॉम्प्युटर पेमेंट - सगळे मेकप केले. भुललेल्यांचा पैसा गोळा झाला. मेकप उतरणारसं दिसल्यावर रात्रीत दाराला टाळी, ऑफिसचे बोर्डच गायब दिसू लागले. मेकप हा घातक रोग ठरला. मृगजळ ठरला.

दर आठवड्याला या ना त्या गावांतले वेगवेगळ्या क्षेत्रांतले मेकप ओघळून, उतरून , खरे रंग दिसायला लागले. जिंदगीची कमाई गुंतवलेले रस्त्यावर येण्याच्या घटना घडू लागल्या. त्या आजही सुरूच आहेत. हाच मेकप करून, कुणी ॲप्रन घालून पेशंटचे दागिने सरळ उचलून जिथं कुणाचा कुणाला पत्ता लागणं कठीण, अशा मोठमोठ्या इस्पितळांतून गायब होऊ लागले. उपचारासाठी दाखल झालेली गरीब रुग्ण माणसं नागवली गेली. हॉस्पिटलच्या पोषाखाच्या मेकपला बळी पडली.

हळूहळू मेकप बुवाबाजीत शिरला. एकवेळ घरातल्या, मुळात साध्या, तशा निरुपद्रवी असलेल्या, चेहरा सुधारणाऱ्या पावडरकुंकूच्या गरजेच्या मेक-अप्पेक्षा हा रूळलेला मेकप अधिकच पुढच्या फसवणुकींचा अवतार होता. बुवाबाजीत तर चेहराच काय, डोक्याच्या वाढवलेल्या जटांपासून, दाढीपासून, माळा, कफन्या, खडावांपर्यंत असंख्य बाबतीत मेकपला वाव. जितका हा मेकप चांगला, तितके भुलणारे जास्त. उत्पन्न जास्त. उलाढाली जास्त. मग फसवणुकीच्या तक्रारी. अखेर मेक-अप हा असत्याचं सत्य करून दाखवणारा मुलामाच. तो इथं तरी कसा टिकणार? फक्त असला मेक-अप क्षेत्र जेवढं व्यापक, तेवढा फसवणूक व्यापक करून जातो !

आता या मेकपनं अकाउंट्स्च्या क्षेत्रात प्रवेश केला. मालमत्ता एक कोटीची असते. बाजारभाव-लोकेशन-अकाउंटिंग स्टॅण्डर्डस् कुणाला तरी मेकप करून ती दोनच काय, कित्येक कोटींचीही करता येते. तिच्यावर तशा प्रमाणात कर्ज करता येतं. 'सत्यमेव जयते'चं ब्रीदवाक्य असलेल्या आणि ते शाश्वत सत्यही असलेल्या देशातच या अकाउंटिंगमधल्या मेकपनं 'सत्यम्'चंच 'असत्यम्' करून टाकलं. शेकडो लोकांना रस्त्यावर फेकलं, हजारोंना हृदयविकाराचे झटके दिले. मेकपच्या विषाणूनं घेतलेला हा अलीकडचा सर्वांत मोठा बळी. असा कित्येक क्षेत्रांत शिरलेला हा मेकप! खास देशी !

हाच मेकप मध्यमवर्गीयांच्या जीवनपद्धतीत शिरला. त्यानं तर अधिकच गोंधळ घातला. विद्यार्थ्यांचे मेकप केलेले मार्क कधी तरी खरे रंग दाखवून घरांतलं स्वास्थ्य घालवू लागले, एकेक करून सांगितलेले संपत्तीचे आकडे रंग उतरल्यावर सत्य सांगण्याचा ताणतणाव देऊ लागले, मुलगी बघताना चांगुलपणाचे केलेले मेकप लग्न झाल्यावर उतरून सासूसासऱ्यांच्या नि मुलाच्या खऱ्या स्वभावाचे रंग उघडे टाकू लागले, घरोघरी वाद-विसंवाद कोर्टकचेऱ्यांपर्यंत पोचले, मेकपनं डोळ्यांत टाकलेल्या लेन्सेस हरवून पुन्हा मुलींच्या डोळ्यांवर जाड चष्मे आले, नाकाच्या प्लॅस्टिक सर्जऱ्या नि खोटे दात आता वादांचे विषय झाले, मुलांचे निर्व्यसनीपणाचे मेकप साप्ताहिक रंगीत पार्टीवर पुन्हा परतून बाबी घटस्फोटाची वाट चालू लागल्या. मेकपचे प्रताप अजून चालूच आहेत.

म्हणून आपण सुरुवातीलाच पाहिलं की, मुलामा ही एक मर्यादित, तात्पुरती

पळवाट आहे. थोडी काळानुसार, निरुपद्रवी असते, तोवर चालायची ! खरंतर तात्पुरतं खोटं आयुष्य स्टेजवर, पडद्यावर उभं करायचं असतं त्यांच्यासाठी ती होती आणि ती त्यांच्यापुरती आणि तेवढ्या वेळेपुरतीच होती. ती तात्पुरती सौंदर्य, देखावा वाढवीत असली तरी लावलेला कृत्रिम मेक-अप त्वचेचं हळूहळू कायमचं नुकसान करीत असतो, हे लक्षात ठेवून करायची होती. ज्यांचा तो व्यवसायच आहे, त्यांनी नाइलाज म्हणून. इतरांनी मात्र अत्यंत गरजेपुरती, काळाबरोबर फक्त काही क्षण राहाण्यापुरती. तीही सावधतेनं. म्हणजे निदान मूळ हानी मोठी होत नाही. पुढं फार मोठ्या अपेक्षा रहात नाहीत नि भंगही अर्थातच वाट्याला येत नाहीत. कारण लावलेला रंग किती काळ टिकणार ? पाऊसपाणी-काळ-परिस्थिती- यांच्या सत्याच्या प्रवाहात असत्य ओघळून जाणारच.

मेकप आपला असो, इतरांचा असो. सध्याच्या परिस्थितीत मूळ मेकप टाळणं कठीण वाटलं तर जरुरीपुरता करणं, समजून-समजावून, प्रामाणिकपणे करणं नि लवकरात लवकर सोडून देणं - हेच हिताचं आहे. कारण हा शब्द नि संस्कृती परदेशी आहे - या मातीत काय कुठंही 'सत्यमेव जयते !'च. ते थोडं त्रासाचं वाटेल. पण पुढं कायमचं टिकेल आणि स्वास्थ्याचंही राहील !

*

९. आपुलकी भवन

मधू घरातून बाहेर पडला. जायचं होतं शेजारीच. पण कदाचित बाबासाहेबांना गरज पडल्यास डॉक्टरांकडं न्यावं लागेल, हे त्याला माहीत होतं. कदाचित डॉक्टरांना घरी आणावं लागेल - हेही त्याला माहीत होतं. म्हणून त्यानं पत्नीला-अवंतीला निघतानाच -वेळ लागेल- हे सांगून ठेवलं होतं. तिला आता ते माहीत झालं होतं. जास्त वेळ लागणार असला तर कळवा, मदत लागली तर निशाला पाठवते - हेही तिनं बजावलं.

बाबासाहेब शेजारच्या हवेलीत राहात. आता एकटेच. अशा अलीकडं गावोगावी आढळणाऱ्या पालकांसारखेच. मुलं तिघंही हुशार. पण तिघंही परदेशी. दोघे मुलगे आधीच परदेशी गेले होते. मुलीचं लग्न होऊन तिचा नवरा परदेशी म्हणून आता तीही परदेशीच. दोन वर्षांपूर्वी पत्नी वारली तेव्हा सारी एकदा येऊन गेली - आईसाठी. तेव्हा कित्येक वर्षांनी ती हवेली गजबजलेली अवंतीनं पाहिली होती.

इतरही गोतावळा जमला होता. शेजारच्या एकपाखी चार खणी जुन्याशा घरात राहणाऱ्या मधूच्या कुटुंबातल्या सर्वांकडं त्यांची ये-जा झाली होती. वस्तू-पास्तू लागत होत्या. माहिती-कामं अशा अनेक गरजांसाठी बाबासाहेबांचा थोरला मुलगा - सारंग- अनेकदा येऊन गेला. तोच अर्थात मधूचा लहानपणचा वर्गमित्र होता. सतत संपर्क ठेवून होता. मधला फिरकलाही नाही. तो सारंगपेक्षाही अधिक बुद्धिमान. पण एकलकोंडा. स्वभावही तुसडा. फारसं कुणाशी सख्य नाही. त्याचं कुटुंबही अर्थात त्याच संस्कारानं तसंच झालं होतं. पत्नी नि मुलगा, एकदा व्यवहार म्हणून जाताना सांगून गेले. त्या आठ दिवसांच्या मुक्कामात सारंगच्या पन्नास खेपा झाल्या असतील. बाबासाहेबांच्या मुलीनंही दहा खेपा मधूदादाकडं घातल्या असतील. पण मधला फिरकलाही नाही. शेजारीच नव्हे तर, इतर गावातसुद्धा कुठं तो बाहेर पडताना कुणाला दिसला नव्हता.

मधूच्या लग्नाला सारंग तर होताच आलेला परदेशातून. पण पुढंही त्याचा नियमित संपर्क होता. बाबासाहेब हे गावातले जुन्या पिढीचे नामांकित वकील. त्यांचा हात धरणारा वकील जिल्ह्यातसुद्धा शोधणं कठीण. पण त्यांच्या निष्णातपणाची

जितकी ख्याती होती, तितकीच त्यांच्या स्वभावाच्या चांगुलपणाचीही. सुदैवानं त्यांची तीनही मुलं हुशार निघाली. काळाची पावलं ओळखून त्यांनी मुलांना त्यांच्या-त्यांच्या आवडीप्रमाणं शिक्षणं घेऊ दिली. त्यांना संधी मिळत होत्या, त्या घेऊ दिल्या. पुढं जाऊ दिलं. माझी वकिली कुणी तरी चालवावी, अशीही अपेक्षा ठेवली नाही.

अर्थात म्हणूनच जवळ कुणी राहू शकलं नाही. वाटा फुटत गेल्या, तसे तिघंही शिकत गेले. परदेशात गेले. बाबासाहेबांची वकिली ऐन भरात होती. त्यांना मुलांना पाठबळ देण्यात कुठली अडचण नव्हतीच. त्यांच्यामागं वडिलोपार्जित काहीच नव्हतं. त्यांनी स्वकष्टानं उभी केलेली दुमजली इमारत. पण तिच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेनं ती दिसे एखाद्या हवेलीसारखी. त्यांच्या मंडळीही चार माणसं जोडून राहाणाऱ्या होत्या. चार नातेवाईक होते. चार चाकर होते. मुलं आपल्या वाटांनी गेली तरी घरची वर्दळ तशीच होती. पण पुढं बाबासाहेब थकले. यश होतं, तरी शरीर साथ देत नव्हतं. त्यात अपघातात फ्रॅक्चर होऊन ते घरी बसले. काही काळानं ते चांगले हिंडू-फिरू लागले असते, पण त्यांनी इथंही काळाचा कौल ओळखला. आपल्या ज्यूनिअर्सना बोलावून, साऱ्या अशीलांना त्यांच्याकडं नीट सोपवून, निवृत्ती घेतली. शक्य आहे तोवर सल्ला देईन, एवढं आश्वासन दिलं. पण ते बरे झाले तरी कोर्टाकडं फिरकले नाहीत.

अर्थात संपर्क कमी होत गेला. वर्दळ ओसरली. हळूहळू त्यांच्या पत्नीची आजारपणं सुरू झाली. त्यांचं वर्तुळ कमी झालं. हवेलीतल्या वरच्या मजल्याचा वापर तर सोडाच, पण स्वच्छतेसाठीसुद्धा मुद्दाम माणूस लावावा लागे. बाबासाहेबांकडं येणारे जुने मित्र हळूहळू काळाच्या पडद्याआड जाऊ लागले. त्यांना आधार उरला तो शेजारच्या मधूचाच. त्याचं शिक्षण मध्यम, नोकरी गावातच. पण स्वभाव सारंगसारखा - प्रेमळ. आधी आधी ते त्याच्याकडं जात. गप्पा मारायला. कधी फिरून आले की, तिथं दहा मिनिटं थांबून मग हवेलीत परतत.

ते घर अखेर त्यांच्या मित्राचंच होतं. मधूचे वडील अन् ते बरोबरीचे होते. ऐन उमेदीत दोघांनी त्या जागा मोठ्या काटकसरीनं नि हिमतीनं शेजारी घेतल्या. ऐपतीप्रमाणं घरं बांधली. ऐपतीतला फरक घरात पडणं स्वाभाविकच होतं. एकमेकांना त्यावरून कधी हेवाही नाही वाटला, कधी मोठेपणाही नाही. फक्त नियतीनं धक्का

दिला तो, सारं घर उभं केल्यावर लहान मधूला नि त्याच्या आईला मागं ठेवून अकाली गेलेल्या मधूच्या वडिलांच्या निधनानं. त्यांच्या रोगाचं निदान झालंच नाही. आहे ते स्वीकारावं लागलं - परिस्थिती नि घराचं कर्जही. त्यावेळी घराला भक्कम शेजार होता तो बाबासाहेबांचा, त्यांनी जपलेल्या माणुसकीचा.

मधूच्या आईला झेपतील अशी घरगुती कामं मिळवून देण्यापासून मधूच्या शिक्षणापर्यंत सर्वांसाठी बाबासाहेबच छत्रछाया होते. एक मित्रकर्तव्यच नव्हे तर, सामाजिक जबाबदारी म्हणूनही त्यांनी या गोष्टी पार पाडल्या. मधूची नोकरी, लग्न, मधूची आई सोडून गेली तिथंपर्यंत. आता मधूच्या मुलांचे आजोबाही तेच होते.

इतकं सारं अवंतीच्या प्रथम लक्षात येत नसे. शेजारच्यांच्या मदतीला जावं, हे तिला पटे. पण परदेशातून घरच्या कामांसाठी, माहिती, काळजी यांपोटी येणारे सारंगचे लांबलचक फोन, पुन्हा त्यानुसार बाबासाहेबांकडं खेपा, ती कामं, त्यामुळं घरी कमी मिळणारा वेळ - अशा अनेक गोष्टींमुळं काही वेळा चिडचिड होई. मधू समजावून सांगे. प्रत्यक्ष बाबासाहेबांचं वागणं पाहूनही तिला त्यांना मदत करण्याची, त्यांचं करण्याची गरज पटे.

पण ती गरज तिला खरी पटली, ती तिच्या माहेरी घडलेल्या प्रसंगामुळं. तिचाही भाऊ परदेशी होता. आई-वडील एकटे होते. वडिलांची तब्येत खालावत होती, ते कळत होतं. मधूनं तिला आपल्या आईवडिलांच्या मदतीला कधीच पाठवलं होतं.त्या घरचं सारं सांभाळून, रोज ती भावाला फोन करी.तो तिथलीच रडगाणी गाई. काम किती पडतं, वातावरण कसं वेगळं आहे. वास्तविक, ती काही अडाणी नव्हती. त्याची आर्थिक स्थिती तिला माहीत होती. पण कधी काम, कधी पैसा - असं कुठलं तरी कारण काढून तो येणं टाळीत होता. वडिलांची अखेर दोन दिवसांचीही खात्री नाही म्हटलं, तेव्हाही त्यानं काही हालचाल केली नाही. काळ थोडाच थांबणार होता ?

मधू मात्र या हालचाली कळताच तडक तिच्या मदतीला आला होता. बाबासाहेबांनी त्याच्या हातात कोरा चेक ठेवला होता. लागेल ती रक्कम टाक नि घेऊन जा, म्हणून. तो आल्यावर यातलं काही बोलला नाही. अवंतीच्या भावाला त्यानं निर्वाणीचं सांगून पाहिलं. पण त्याच्या 'प्रयत्न करतो' म्हणण्यात आतला जोर दिसत नव्हताच. दुसरे दिवशी वडील गेल्याचा फोन केल्यावर, त्यानं आता येऊन

काही उपयोग नाही. अंत्यदर्शनाचा फोटो घेऊन मेलवर पाठवायला सांगितलं. ते सारं अवंतीच्या कल्पनेच्यापलीकडचं होतं. मधूनं तिचा भाऊ करणार नाही एवढ्या प्रेमानं, तिच्या वडिलांचं सारं केलं. आईची व्यवस्था केली.

त्या प्रसंगापासून, तिची मधूबद्दलचीच नव्हे तर, तो बाबासाहेबांना करीत असलेल्या मदतीबद्दलचीही दृष्टी बदलून गेली. म्हणूनच तिनं आत्ता मधूला आनंदानं 'जा' म्हटलं. एवढंच नव्हे तर, 'काही लागलं तर कळवा' म्हणून सांगितलं होतं. आता तर बाबासाहेब एकटे होते. अंथरुणाला खिळले होते. मध्यंतरी जरा जास्त वाटलं म्हणून त्यानं सारंगला कळवलं. तेव्हा ते तिघंही येऊन गेले. प्रकृतीत सुधारणा होते आहे म्हटल्यावर, मधूवर सारं सोपवून तिघंही परत परदेशी रवाना झाली.

मधूनं आजची बाबासाहेबांची परिस्थिती पाहिली. ती त्याला वेगळी वाटली. त्यानं डॉक्टरना बोलवलं. त्यांनी दवाखान्यात दाखल करणं गरजेचं आहे, असं सांगितलं. बाबासाहेब तयार नव्हतेच. पण मधूनं अवंतीलाही बोलावलं. तिच्या लक्षात आलं. त्यांना मायेची, आग्रहाची नि आधाराची गरज आहे. तिनं सांगितलं, 'बाबासाहेब, आम्ही लगेच सारंगला कळवतोच आहोत. पण तो येईपर्यंत आम्ही दोघंही तुमच्याजवळ राहू. निशा आता मोठी आहे. ती दोन्ही घरं सांभाळेल. तुम्ही निश्चिंतपणे उपचारांसाठी चला. इथली काही काळजी करू नका.'

दवाखान्यात नेतानेताच बाबासाहेबांना हृदयविकाराचा एक धक्का बसला. मधूनं साऱ्या हालचाली त्वरित केलेल्या होत्या. सारंग तिकडून निघालाही होता. मुलगी पाठोपाठ निघाली होती. तिची - अवंतीची आता चांगली मैत्री झाली होती. एकमेकींची अवस्था जाणून मधल्या काळात त्या अधिक जवळ आल्या होत्या. त्या एकमेकींच्या संपर्कात होत्या. मधल्या मुलाचा निरोप आला होता की, 'मधला अनुभव' पाहाता लगेच काही मी निघत नाही. अगदीच 'तसं' वाटलं तर कळव. 'सध्या तरी' इथं भरपूर कामाचा सीझन आहे. सुटी मिळणंही अवघड आहे.'

सारंग अन् धाकटी मुलगी येऊन पोचले. तो दिवस बरा गेला. बाबासाहेब दोघांशीही बोलले. बाजूला मधू नि अवंती उभे होते. त्यांच्याकडं बघून त्यांना भरून येत होतं. सारंग नि बहीण सारं ओळखू शकत होते. आता जणू त्या पाचही जणांतली लौकिक नाती, वय, व्यवसाय असे व्यावहारिक भेदभाव मावळले होते. ते मित्र होते

- पाच. ते एकमेकांच्या मैत्रीभावाच्या आनंदात असताना त्यांच्यातल्या एका मित्रानं - बाबासाहेबांनी - अखेरचा श्वास कधी घेतला, ते कळलंच नाही. चौघांच्या सहवासात, डोळ्यांदेखत, त्यांनी आनंदात, शांतपणे जीवनयात्रा संपवली होती. मधला मुलगा फोन करून, थोडी वाट पाहूनही अखेर आलाच नाही. आता बाबासाहेबांना जणू काही हीच चार मुलं होती. त्यांनी सर्वांनी मिळून पुढची सारी व्यवस्था केली. सारंग, बहीण, तिचे यजमान सर्वांनी आपापल्या रजा वाढवल्या. पंधरा दिवसांनी बहीण-मधू आणि अवंती - यांचा निरोप घेऊन पुढं निघाली. अवंतीला मात्र आपलीच बहीण परदेशी चालल्यासारखं वाटत होतं. दोघांनीही तिला सांगितलं की, 'आता बाबासाहेबही नाहीत त्यामुळं तुम्ही परत येणार नाही, असं करू नका. त्यांचं घर भले असो, नसो. आमचं आहे. तिथं वर्षातून-दोन वर्षांतून येत होता. तसं इथं या.' ती बहीण आणि तिचे यजमान भारावलेले होते. तेही म्हणाले, 'अवश्य येऊ.' 'नुसतं म्हणत नाही. आमचं सारंगदादाशी बोलणं झालं आहे. तो तुमच्याशी बोलेलच.' मधूनं मान हालवली. तो त्याच्याच विचारात होता. जणू काही शब्द त्याच्या कानी येतच नव्हते.

सारंगनं मात्र पत्नीसह महिनाभर मुक्काम केला. ते उभयता जवळपास मधूच्याच घरी होते. अवंतीच्या माहेरचाही विषय झाला. उच्च शिक्षणं, नोकरीच्या संधी, देश-परदेश, पालक, त्यांच्याबद्दलची कर्तव्यं, एकमेकांविषयीच्या भावना, बाहेरच्या बाजारीकरणाचा परिणाम, सारंगच्या व अवंतीच्या भावासारखी इकडचं सारं विसरून-तोडून गेलेली मुलं, तर अजूनही इथल्या मातीची-माणसांची ओढ असलेली मुलं, कौटुंबिक व सामाजिक कर्तव्यं मानणाऱ्या या क्षेत्रातल्या असंख्य व्यक्ती, परदेशी स्थायिक होणं, न होणं-त्यांतले प्रश्न, परदेशातच जन्माला आलेल्या पुढच्या पिढ्यांचे संस्काराचे प्रश्न - अशा असंख्य गोष्टींची मनापासून चर्चा होत होती.

सारंगचा जायचा दिवस जवळ येत चालला होता. रोज मधूला ऑफिसला जावं लागे. त्या वेळपुरता सारंग हवेलीत असे. नाहीतर, कागदपत्रं, दस्त, कोर्टकचेऱ्या - असल्या कुठल्या कुठल्या कामांत. मधल्यानं तर तिथूनच कळवलं होतं की, मला आता तिकडं येऊन काही उपयोग नाही. त्या भकास जुनाट घरातही काही रस नाही. कुठं कागदपत्रांवर सह्या लागणार असतील तर त्यासाठी सहकार्याची मात्र त्यानं पूर्ण तयारी दर्शवली होती. त्याला त्याच्या पैशाचा हिस्सा मात्र हवा होता. इतका अपरंपार

पैसा त्याच्याकडं असूनही. एकूण, पैशाच्या जंतूची बाधा होऊन, पैशानं त्याच्यातल्या माणुसकीचा अंश कुरतडला होता, हे खरं.

जाण्यापूर्वी दोन दिवस सारंग आणि त्याची पत्नी नेहमीप्रमाणं रात्री मधूकडं जेवायला आले. मधू म्हणाला, 'सारंग, आता तुम्ही परवा जाल. आपण अनेक गोष्टींची चर्चा केली. काळाच्या गतीप्रमाणं आपल्याला पुढं जावं तर लागेलच. तुम्ही गेला की, आम्हाला पोकळी जाणवेल. आज चाळीस-पंचेचाळीस वर्षांच्या आठवणी उरतील. तुम्ही हाललात की हवेली भकास होईल. तू तुझ्या परीनं तिची व्यवस्था लाव. फक्त तीही आता जुनी झालेली आहे. आम्हाला ती पडझड झालेली पाहावायची नाही. ती जागती राहील, असं काही करता येईल का बघ.'

जेवता जेवता सारंगनं त्यांच्या बॅगेकडं बोट दाखवलं. 'त्यात मी काही व्यवस्था करूनच आणली आहे.' मधू म्हणाला, 'बरं झालं. कुणाला तरी चांगल्या शेजाऱ्याला भाडेपट्टा करून दिलीस, तरी बरं होईल. आम्हाला भकास वाटणार नाही. शेजारी माणसं गरजू नि चांगली असली की,झालं.श्रीमंत तेवढी नको बाबा !'

सारंग नंतर बॅग उघडताना म्हणाला, 'हो, पण त्यासाठी मला तुझी थोडी मदत लागेल.' न कळून मधू म्हणाला, 'तू सांग. माझी परिस्थिती तुला माहीत आहे. त्यातसुद्धा मी जमेल ती कष्टांनंच काय, आर्थिक मदतसुद्धा करीन.'

आता या चौघांबरोबर निशाही सामील झाली. तीही काही लहान नव्हती. सामाजिक कार्यातलं तिचं पदव्युत्तर शिक्षण सुरू होतं. सारंग म्हणाला, 'हे पाहा निशा, तूसुद्धा याचं स्वरूप समजून घे. आज आमच्या बाबासाहेबांसारखी वेळ अनेक पालकांवर आहे. त्यासाठी काही शहरांत असे पालक एकत्र येऊन एकमेकांना मदत करतात. आधार देतात. मुलं असली तरी परदेशात असतात. हजर असत नाहीत. सगळ्याच मुलांना मातीची ओढ नसते, असं नाही. आईवडिलांचं कर्तव्य करायचं नसतं, असंही नाही. आमच्या घरातला किंवा तुमच्या मामाचा अपवाद सोड. पण आज आम्ही दोघं आहोत, माझी बहीण-मेहुणे आहेत. एवढंच नाही, या जिल्ह्यातून परदेशात गेलेल्या सर्वांशी मी एक कल्पना घेऊन संपर्क साधला आहे. प्रश्न नुसते पालकांचेच नाहीत. परत येऊ इच्छिणाऱ्यांचे आहेत, येऊ न शकणाऱ्यांचे आहेत. आमच्यासारख्यांचे आहेत. आता तुमचं घर आहे. एका पिढीचा घरोबा आहे.

म्हणून आम्ही वर्षाकाठी एकदा तरी इकडं यावं, अशी इच्छा बाळगून आहोत...'

'तुम्ही तर याच, पण ते तर मी तुमच्या ताईंनाही सांगितलंय आणि त्यांच्या यजमानांनाही...' अवंती म्हणाली.

'पण आम्ही आलो तर आता कुठं उतरू ?'

'त्यात काय प्रश्न आहे ?.. आमच्या घरी..' अवंती म्हणाली. 'थोडी अडचण होईल तुमची... पण आम्हाला काही नाही वाटणार..'

'वहिनी, आम्ही जागेकडं बघून येणार की, तुमच्या आपुलकीकडं ?'

'अर्थात, आमच्या आपुलकीकडं..'

'आम्ही तसे येणारही आहोत. पण बाकीच्या पन्नासजणांचं काय ? माझी बहीण आहे. तिचे यजमान आहेत... बरं, यासाठी आम्ही इथं हवेलीला कुलुपं घालून ठेवली तर आम्ही तिथं असे एकदम उतरू शकू का आणि एरवी काय करायचं! आणि गावातल्या, जिल्ह्यातल्या इतरांचं काय..! जसे या मातीला विसरणारे, पैशाला भुलणारे आहेत, तसे इथं आईवडील असलेलेही आहेत, नसलेलेही आहेत. परदेशी गेलेल्यांना दुजाभाव दाखवणारेच काय, विसरून गेलेले किंवा फक्त त्यांच्या पैशाची वाट पहाणारेही असतील !... प्रश्न कितीतरी मोठे आहेत... पण ते सारे आपल्या परीनं सुटलेही पाहिजेत..'

मधू म्हणाला, 'मला वाटतं, हे सारे प्रश्न वाटतात खूप आणि मोठेही. पण ते माणुसकीनं, समजुतीनं आणि आपुलकीनं सुटू शकतात. सगळ्यांनाच ती दाखवावी लागेल. उगीच कुणाला, परिस्थितीला दोष देण्यात अर्थ नाही. प्रत्येकानं थोडं सोसायचं ठरवलं तर, हे इतकं अवघड नाही..'

'तुझी तयारी असेल, तर यात मी तुझ्याच पुढाकारानं एक योजना आखतो आहे. मी स्वतः नुसती योजना आखतो आहे, असं नाही. त्यात बाबासाहेबांच्या इच्छेचाही विचार करतो आहे. इतकंच नव्हे तर, त्यातली सर्व प्रकारची मदत आणि पुढं लागल्यास पुढाकारही घेण्याची तयारी ठेवूनच, मी हे सारं करतो आहे. त्यात मला हिची साथ आहे. सगळं अवघड असलं तरी, तू म्हणालास तसंच ते अवघड आणि मोठं गणित आपुलकीच्या आणि निरपेक्षतेच्या रीतीनं सोडवायला सुरुवात केली तर, नक्की सुटेल, असं मला वाटतं.'

मधू म्हणाला, 'ते खरं आहे, असं मला वाटतं. आज बाबासाहेब किंवा तुमची आई इथं होती आणि तुम्ही सारे तिकडं होता तरी तेवढ्यापुरता जमेल तसा तो प्रश्न सुटला. बाबासाहेब एकटे असतानाही रोजच हा सोबतीचा, मदतीचा प्रश्नही सुटत होता. आपण एकमेकांच्या संपर्कात होतो. आम्ही घेत असलेल्या निर्णयांना तुमचं भक्कम पाठबळ होतं. मला अवंतीची, निशाची साथ होती. फक्त या साऱ्यानं आता पुढं निर्माण होणारे मोठे प्रश्न आपण कसे सोडवू शकू, ते माझ्या लक्षात येत नाही. माझ्यापुरतं तरी तुमचं आपुलकीचं नातंही टिकून आहे आणि भले छोटंसं असेल, पण कधीही तुम्हाला स्वदेशी यायला जायला हक्काचं घरही आहे. एवढं तर आम्ही आहोत, तोपर्यंत चालवू. पण या मोठ्या प्रश्नांचं काय ?'

सारंग म्हणाला, 'तू म्हणतोस तसं काम आत्ता सुरू आहेच. पण त्याला खरा आधार तुमच्या माणुसकीचा, आपुलकीचा आहे. निःस्वार्थीपणाचा आहे. भले हे काम छोटं असेल. पणतीचं असेल. तुला माहीत आहे, पूर्वी तुमच्या घरीही आई देवासमोर पणती लावी. आमच्याकडं समई लागे. प्रकाश तर पणतीचाही होता अन् समईचाही होता. म्हटलं तर पणतीची-समईची किंवा खूप मोठ्या पंचारतीची एका अर्थानं तुलना होणार नाही. पण दुसऱ्या अर्थानं यांतली प्रत्येक गोष्ट एकच काम करीत असते, ते म्हणजे अंधार दूर करण्याचं. तुमच्या देवासमोरच्या पणतीत हे छोटं घर प्रकाशानं उजळून जाई.आपले सारे व्यवहार होत. मोठ्या घरात कदाचित पणतीचा प्रकाश मिणमिणता वाटेल, त्याला उपाय करता येईल. पण अंधाराचं गणित सोडवण्याची रीत मात्र आपल्याला सापडलेली आहे. जो पणतीचा मार्ग तोच समईचा.

'आत्ता आपल्यासमोर कामं आली, अनेक प्रश्न आले. त्यांची व्याप्ती आपल्याला मोठी वाटते आहे. पण त्यात फार गडबडण्यासारखं नाही. आपल्याला आता पणतीऐवजी समई लागेल, कदाचित पंचारती लागेल. दोन खोल्यांच्या जागी हवेली लागेल. तुला माहीत आहे, बाबासाहेब खूप दूरदृष्टीचे होते. काळ ओळखणारे होते. माणसं ओळखणारे होते. भावी प्रश्न आणि त्यांची उत्तरं शोधणारेही होते. म्हणूनच तुला मी आता त्यांनी केलेल्या पुढच्या विचाराची कल्पना देतो. छोट्याशा घरी अंधाराचा प्रश्न सोडवायला पणती चालली, दोन खोल्या चालल्या. आता मोठे प्रश्न सोडवायला समया लागतील. पुढं तर आजच्या काळातले मोठे दिवे लागतील.

हवेली तर लागेलच लागेल ! म्हणून त्यांनी ही हवेली तुम्हा दोघांच्या हवाली करायला सांगितलं आहे. आत्ता म्हटलं तसं, मोठे प्रश्न सोडवायला तिची गरज तर आहेच. नुसतं हवेलीवरच भागणार नाही...'

मधू आणि अवंती दोघंही क्षणभर काय ऐकत होते ते त्यांना कळेना. ते अभावितपणे म्हणाले, 'आम्हाला यातलं इंचभरही काही नको. तुम्हाला आमच्या या छोट्या घरात यायला संकोच होणार आहे का ?'

सारंग म्हणाला, 'तो तर आम्हाला पूर्वीही कधी झाला नाही आणि पुढंही कधी होणार नाही. प्रश्न आहे, तो आपण बोललेल्या आजच्या काळाच्या संदर्भातल्या मोठ्या कार्याचा, त्याच्या व्यापाचा. त्यासाठी नुसतीच हवेली लागणार नाही तर, संपर्काची साधनं, मनुष्यबळ, आर्थिक मदत - अशा असंख्य गोष्टी लागतील, हे तर आता आपल्या सर्वांच्याच लक्षात आलं आहे. या साऱ्यांपेक्षाही गरज लागणार आहे ती, या माणुसकीची, आपुलकीची, निखळ मैत्रीभावनेची वाढ होण्याची. ती तर कुठं उपदेश करून वाढणार नाही. पैशानं मिळणार नाही. आज बाबासाहेबांच्या अंतकाळी आपण पाचजण ज्या आपुलकी आणि मैत्रीनं एका स्तरावर खूप जवळ होतो, तो कसा निर्माण होईल, हे शोधण्याचीच जास्त गरज आहे. त्याचं उत्तरही आपल्याजवळच आहे. असे अनेक जण असतीलही. प्रश्न राहील तो फक्त या माणुसकीनं एकमेकांना जाणून घेण्याचा, जोडण्याचा, त्यासाठी स्वतः त्याग करून सुरुवात करण्याचा. आपण चौघं तर आहोतच. तुला माहीत आहे, यात माझी बहीण आणि तिचे यजमान हेही मनानं तितकेच सहभागी आहेत. बाबासाहेब दूरदृष्टीचे होते. असे प्रश्न पुढं वाढतील आणि त्यासाठी आपण काही करू शकू, हे त्यांनी हेरलं होतं. त्यांचा त्यागावर आणि कृतीवर भर होता. म्हणून जाण्यापूर्वीच त्यांनी त्यांची ही स्वकष्टार्जित हवेली तुझ्या आणि अवंतीच्या नावे केली आहे, त्यासाठी लागणाऱ्या सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून. त्यात ते तज्ज्ञ होते हे तुम्हाला माहीतच आहे.

'राहाता राहिला इतर मदतींचा प्रश्न. वारस म्हणून आमच्या वाट्याला जी संपत्ती येणार होती तिचे त्यांनी चार वाटे केले आहेत. आम्ही तिघं आणि तू चौथा. त्यांचे सर्व बँकव्यवहार मी पूर्ण केले आहेत. मधल्याला त्याचा वाटा पाठवून दिला आहे. हा तुझ्या वाट्याचा चेक...'

मधू म्हणाला, 'मला हे काही नको आहे. फक्त तुम्ही सर्व प्रेमानं या-जा. मला एवढी कार्याची जबाबदारीही पेलणार नाही.'

सारंग म्हणाला, 'हे बघ, तू दडपण घेऊ नकोस. तू अनेकदा हवेलीत खेळला आहेस, राहिला आहेस. अनेक प्रसंग तू तिथं पाहिले आहेस, त्यात भाग घेतला आहेस. तुला ती नवीन नाही. तू ती मागितली नाहीस. हे बाबासाहेबांचं देणं आहे. ते विनाअट आहे. आपल्या डोळ्यांसमोर असलेली मोठी कार्यं करण्याची जबाबदारी तुझ्यावर नाही. आहे ती फक्त ही हवेली तुझी समजून जागती ठेवण्याची. ते तर तू सुरुवातीलाच म्हणत होतास ना ! सध्या तेवढं कर. पुढचं कार्य हे पुढचं पाऊल आहे. ते घेताना तुला मोठ्या जागेचीही गरज लागेल अन् अनेक प्रकारच्या मदतींचीही. त्याचा पाठपुरावा मी आणि माझी बहीण तिथूनही करू. मी अधूनमधून येत जाईन. तुला काही अडचणी आल्या तर, त्यात मदत करीन.

'आज हे कार्य आपल्या कुटुंबांपुरतं तू करतोच आहेस ना ! तुला शक्य होईल तसं, ते वाढवताना तुला हवेलीचा उपयोग होईल. यातल्या गरजू पालकांपासून परदेशाशी निगडीत असलेल्या मुलांपर्यंत सर्वांची वर्दळ या हवेलीत सुरू होईल. यामागं बाबासाहेबांनीही कुठली संस्था - ट्रस्ट करण्याची योजना मुद्दामच केली नाही. आम्हा भावंडांनाही ते पटलेलं आहे. आम्हा सर्वांना तुमच्या घरी यायचं आहे, उतरायचं आहे, राहायचं आहे - कुठल्या ट्रस्टच्या ऑफिसवर - लॉजवर नव्हे.

'म्हणून ही हवेली कार्य केवढंही करो, ते तुमच्या कुटुंबाचंच घर राहील. खासगी राहील. परिस्थितीनं एकाकी, भकास जीवन झालेल्या अशा पालकांना आपुलकी देणारं घर. परदेशातून येऊन जाणाऱ्यांना घरपण देणारं घर. मातीची ओढ असूनही तिकडं स्थायिक झालेल्यांना मातीशी प्रेमळपणे जोडून ठेवणारं घर. इथं पुन्हा परतू इच्छिणाऱ्या अनेकांना इथल्या बदललेल्या परिस्थितीत कसं जुळवून घ्यावं आणि पुन्हा आपल्या मातीत रुजून जावं, हे आपुलकीनं शिकवणारं घर. देशोदेशी पसरलेल्या असंख्य नातेवाईकांना जोडून देणारं, तांत्रिक तपशील पुरवणारं - मदत करणारं घर. या साऱ्याला मोठी जागाच नाही तर, तंत्रज्ञानाची मदतही लागेल. आर्थिक बळ लागेल. माणसं लागतील. घराचं घरपण टिकून हे सारं कार्य पेलणारे हातही लागतील.'

मधू आणि अवंतीला एक उत्साह निर्माण झाला होता, ही गोष्ट खरी. सारंग आणि त्याची पत्नी मोठ्या आशेनं त्या तिघांकडं पहात होती. म्हटलं तर प्रश्न होता, पण सुटण्याची गरजही होती आणि तो सोडवण्याची सारी साधनंही सारंगनं समोर ठेवली होती. ते सारं पोकळ नव्हतं. त्याचा एकट्याचा प्रश्न तर कसाही सुटू शकला असता. पण इतरांचे प्रश्न सुटावेत, ही त्याची कळकळही तितकीच प्रामाणिक होती. याची बीजंही बाबासाहेबांनी पेरून ठेवली होती. शेवटी पुढची पिढीच मदतीला पुढं झाली. निशा म्हणाली, 'काका, बाबा, तुम्ही काळजी करू नका. बाबाआजोबांच्या कल्पनेतलं आपुलकीचं घर आणि आजच्या काळातल्या एका वाढत्या सामाजिक प्रश्नावरचं उत्तर म्हणून आपण हे हवेलीचं काम जरूर हाती घेऊया. माझीपण तुम्हाला साथ आहे.'

आता सारंगलाच नव्हे तर मधू, अवंती, सारंगची पत्नी या सर्वांनाच दिलासा मिळाला. उत्साह वाढला. मधू म्हणाला,'करू आम्ही हे काम ! घरच्या आपुलकीच्या पणतीवर आता आम्हाला झेपतील तशा अनेक पणत्या आम्ही हवेलीतही लावू. समया लावू. हवेली आमच्या कुवतीप्रमाणं आपुलकीच्या प्रकाशानं उजळून टाकू. मात्र याला तुम्ही दोघं इथं हवे होतात.'

सारंग म्हणाला, 'तेच मी आता तुला सांगणार आहे. या कामासाठी मी दर सहा महिन्यांनी परत येणार आहे. आता तर पुढचं काम नव्या तंत्रज्ञानानं तिथूनही होऊ शकेल. त्यातून मदत लागली तर आम्ही दोघंही केव्हाही इथं हजर होऊ. अजूनही एक व्यवस्था तुझ्या मदतीला राहील. आम्हाला म्हणजे मला आणि माझ्या बहिणीला मिळालेल्या वडिलोपार्जित रकमेचे हे ड्राफ्ट. ताई आणि मी ते तुम्हाला देत आहोत. मला तुमच्या परिस्थितीची कल्पना आहे. निशाच्या लग्नाच्या जबाबदारीची कल्पना आहे. हे पैसे ही आमची बाबासाहेबांच्या स्मरणार्थ कौटुंबिक देणगी आहे. तिच्यातूनच हे कार्य केलं पाहिजे, असं कुठलंही बंधन तुमच्यावर नाही. फक्त कार्यातच काय, घरातही नडू नये, एवढीच इच्छा आहे. देवदयेनं आम्हाला भरपूर आहे. हे आहे, ते खरं तुमचंच आहे. आणखी एक, आम्ही दोघंही पाच वर्षांनी पुन्हा इथं कायमचं परतत आहोत. तेव्हा आमची खरी मदत तुम्हाला होईल. तोपर्यंत या विषयातल्या गरजूंची यादी करणं, संपर्क साधणं, त्यांना तिथं शक्य असेल तो आधार मिळवून

देणं - ही कामं मी तुझ्याही संपर्कात राहून सतत करीत राहीनच. कदाचित ताईच्या घरच्यांचा विचार बदलला तर, तेही इथं परततील. तोवर तुमच्या आमंत्रणाप्रमाणं आम्ही मधूनमधून पूर्वीसारखंच इथं येत राहू. तुमच्या घरी ! पण हवेलीतल्या !'

'आमच्या हवेलीत कुठल्या ? बाबासाहेबांच्या हवेलीतल्या !' मधू आणि अवंती उद्‌गारले.

सारंग म्हणाला, 'नाही, तुमच्याच घरी.'

मधू म्हणाला, 'मला वाटतं, हे कार्य, हे राहाणं, ही आपुलकीची येणी-जाणी हे पाहाता हे घर, भले आमचं खासगी असो, पण ते त्या अर्थानं आता राहाणार नाही. माणुसकीनं आणि आपुलकीनं जोडलेल्या या देशविदेशाच्या प्रश्नांशी निगडीत अशा सर्वांचं ते घर होईल. बाबासाहेबांच्या इच्छेचा मान, तुमची तळमळ हे सारं लक्षात घेतलं तर, हे घराचे कागदपत्र मी फक्त विश्वस्त म्हणून स्वीकारतो. बरोबर आहे..?' असं म्हणून त्यानं अवंती आणि निशाकडं पाहिलं.

'होय. पण जबाबदारीसुद्धा मालकी म्हणून नव्हे, विश्वस्ताची म्हणूनच घेऊ.' सारंगकडं पहात ती मधूला म्हणाली, 'हे आपलं नसलेलं घर आपल्याला आता या दोन खोल्यांतल्या आणि आपणा पाच-सहा जणांतल्या आपुलकीच्या कितीतरी पट काम करून चालवावं लागेल. हे सारं लक्षात ठेवण्यासाठी आपण या हवेलीला आता आमच्या सर्वांच्या कर्तव्यांची आठवण देईल, असं काही नावच देऊया का ?'

सर्वांनी प्रश्न केला, 'कोणतं ?' ...

इतकी वर्षं कुठलं नाव नसलेल्या त्या हवेलीला दुसऱ्या दिवशी सारंग अन् मधूच्या हस्ते साऱ्या भावना आणि कार्यांचं भान देणारं नाव झळकलं, 'आपुलकी भवन !' साक्षीला होती मोठ्या आपुलकीनं आणि आशेनं कामाला तत्पर असलेली सारंगची पत्नी, अवंती आणि निशा !

गावोगावी भविष्यकाळात उभ्या राहणाऱ्या भवनांतलं हे तर पहिलं भवन होतं !

*

१०. बदलांशी सुसंवाद

दोन दिवसांपूर्वीच रामनसाहेबांचा भव्य सेंड् ऑफ् झाला होता. गर्दी तशी अपेक्षेपेक्षा जास्त होती. जास्त म्हणजे चाळीस-पन्नास लोक. एरवी गोळा करून, हाका मारून कसे तरी दहा-पंधरा गोळा करावे लागायचे. त्या मानानं बरेच. नंतर चांगली डिश असल्याचा तो परिणाम होता, असं काही लोक मागं नंतर बोलतच होते. गेले दोनही दिवस रामनसाहेब एकदम रिलॅक्स होते. अनेक वर्षं व्यवस्थापनात काम केल्यामुळं, त्यांनी त्याच कौशल्यानं दुसरे दिवशी सकाळीच त्यांच्यानंतर त्यांच्या जागी जबाबदारीच्या जागेवर नेमणूक झालेल्या माणसाला सकाळसकाळी फोन करून शुभेच्छा दिल्या. 'काही अडनड लागली तर कळवा',असं सांगून, यशस्वी होण्यासाठी काही सूचनाही त्यांनी केल्या. त्या साहेबांनीही उत्साहानं सारं ऐकलं, धन्यवाद दिले.

घरच्यांच्या आग्रहामुळं, ते लगेच अनेक वर्षं त्यांच्या कामांमुळं न जमलेली कुलूमनाली-उत्तर भारतसह वगैरे वगैरे चांगली एकवीस दिवसांची टूर करायला यात्राकंपनीबरोबर रवाना झाले. मध्येच त्यांना आपलं काम, करियर, तिथं त्यांच्यावर अवलंबून असलेले लोक, प्रश्न, त्यांनी पूर्वी केलेली प्रश्नांची सोडवणूक, कामाचा प्रचंड अनुभव या साऱ्याच्या अनेक आठवणी येत. काही माणसांना त्यांनी कबूल केलेल्या, पण त्यांच्या मुदतीत त्यांना न जमलेल्या कामांचीही त्यांना आठवण होई. आपण त्या कामांचा फॉलो-अप करावा, अशी ऊर्मीही त्यांना वाटे. पण पत्नी आणि बरोबरच्या मुलांच्या आग्रहामुळं त्यांनी कटाक्षानं फोन करणं टाळलं.

त्यांची खिशातला मोबाईल काढून परत ठेवतानाची अस्वस्थता आणि चुळबुळ पाहून शेवटी पत्नीला दया आली. तिनं सांगितलं, 'करा वाटलं तर एखादा फोन.' त्यांनी लगेच लॉजच्या गॅलरीत जाऊन आपल्या जागी आलेल्या नव्या साहेबांना फोन केला. त्यांनी तो प्रथम उचललाच नाही. मग त्यांनी हाताखालच्या एका माणसाला फोन केला. एरवी ते अधिकाराप्रमाणं अंतर ठेवून वागत. पण आत्ता तरी-पर्याय नव्हता. त्यानं फोन उचलला. पण थंडपणानं. 'नवे साहेबही आहेत. पण मीटिंगमध्ये असावेत', असं मोघम सांगितलं.मग ते,'हा कुठं आहे, तो कुठं आहे, या कामाचं काय झालं,त्याचं काय झालं' - असं सवयीनं विचारायला लागले. त्यावर

त्यानं, 'मी जरा गडबडीत आहे, नंतर फोन करता का ?', म्हणून फोन कट केला.

त्यांना हाच माणूस आपल्या भेटीसाठी बाहेर ताटकळत कसा उभा राहात असे, आपल्या सेक्रेटरीकडून ओळख काढून कशी अपॉइंटमेंट घेत असे - अशा अनेक आठवणी आल्या. फोन बंद झाल्यानं ते वैतागले. मग पुन्हा त्यांनी त्या नव्या साहेबांना कॉल केला. यावेळी त्यांनी फोन घेतला. पण,'मी मीटिंगमध्ये आहे. मीच मोकळा झाल्यावर नंतर फोन करतो किंवा उशीर झाल्यास सकाळी करतो.', म्हणून ठेवून दिला. रामनसाहेबांची आणखीच चिडचिड झाली.

ते थोडेसे वैतागून आत आले. त्यांचा मूड पाहाता, पत्नीनं थोडक्यात काय ते ओळखलं. उगाच ट्रिपचा मूड जायला नको म्हणून, त्यांनी दुसराच घरचा विषय काढत गप्पा सुरू केल्या नि 'जेवायला जाऊ या' म्हटलं. तोवर बाहेर खरेदीला गेलेली मुलं परतली. त्यांना बाबांचा मूड थोडा बदलला आहे, हे लक्षात आलं. पण आत्ताचं कारण माहीत नसलं तरी त्यांना त्यात नवीन नव्हतं. ते ऑफिसमध्ये साहेब होते, तसेच ते घरीही साहेबच असत. तिथल्याच अधिकारवाणीनं, शिस्तीनं - ते घरच्यांना वागतीत. सतत चुका दाखवणं, मार्गदर्शन करणं, गोष्टी न झाल्यास रागावणं, फारसं कुणाचं न ऐकून घेणं, सतत काम पूर्ण होतं आहे की नाही याबद्दल अस्वस्थ असणं, त्यांनी कामं केली तरी समाधानी नसणं-अशा त्यांच्या स्वभावाची सर्वांना अनेक वर्षं सवय होती.तीही आता मोठी होती.मुलगा इंजिनिअर होऊन नुकताच नोकरीला लागलेला. मुलीचंही उच्च शिक्षण पूर्ण होत आलेलं. मुलंही आता फारसं ऐकून घेत नसत.

जेवतानाही रामनसाहेब त्यांच्या ऑफिसच्याच विचारात होते. साधी ओळखसुद्धा कुणी दाखवली नाही. नवा माणूस इतक्यात एवढा बिझी झाला का ? हाताखालचा साधा कारकून - मला वेळ नाही म्हणून फोन बंद करतो ? एरवी त्यांनी सारं लेखीच घेतलं असतं, बदल्या केल्या असत्या, पुरेशी अद्दल घडवली असती - पण आता जेवण संपल्यावर हात कागदी नॅपकीनला जोरजोरात पुसण्यापलीकडं ते काही करू शकत नव्हते.

पुढची ट्रिप त्यांना तशी बिनमूडचीच गेली. केव्हा एकदा गावी परततो, असं त्यांना झालं. नाही तरी असल्या निरुद्देश्य, करमणुकीच्या फिरण्यात त्यांना अजिबात रस नव्हता. तीर्थं-यात्रा-तथाकथित अध्यात्म वगैरे निरुद्योगी लोकांचे उद्योग.

तसलं करायला ते कधीच जात नसत. लोकांना टीव्हीचं वेड. तेही त्यांना नसे. फुकट नाचगाणी बघण्यात काय वेळ घालवायचा, असं त्यांना वाटे. फार झालं तर एखादा फिनॅन्शियल ॲनॅलेसिस, अर्थकारण, आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर फार नामांकित वक्त्यांची चर्चा - असं काही असलं तर, ते बसले तर बसत. नाहीतर फक्त महत्त्वाचे बातम्यांचे, मार्केटचे अपडेटस्. प्रत्येक ॲक्टिव्हिटी उच्च दर्जाची हवी, इंटलेक्च्युअल असं काही तरी मिळवलं पाहिजे. शेअर मार्केटला मात्र ते पूर्वी कधीकधी भेट देत. त्याचासुद्धा अभ्यास. पण अंदाज अचूक ठरले पाहिजेत, पैसा मिळाला पाहिजे, योजनेनं - कल्पकतेनं मार्केटमधून काढता आला पाहिजे - असे त्यांचे आग्रह होते. त्याही विषयात गोलमाल होतो आहे, नुकसान होतं आहे, म्हटल्यावर वेळेत, फायद्यात राहून, ते बाहेर पडले - अर्थात त्यातून वेळेत बाहेर पडण्याचाही अभिमान आणि त्यातला पैसा सव्याज घेऊनच.

त्यांना अपयश फारसं माहीत नव्हतं. अपयश आलेला कुणी त्यांच्यासमोर सापडला की - 'तुम्हाला अपयश येतंच कसं, प्रयत्न कमी पडतात, दिशा चुकतात, तुम्हाला गायडन्स घ्यायला नको, योग्य संपर्क ठेवायला नकोत-भरपूर कष्ट नकोत' - असं म्हणून ते त्याला जेरीला आणीत. तो मनात म्हणे, 'ते अपयश अन् नुकसान परवडलं, पण यांचं लेक्चर नको.'

गावी परतल्यावर त्यांनी भराभरा साऱ्या ओळखीच्यांना फोन लावला. ते जुन्या सवयीप्रमाणं रजेवरून परतल्यावर सारा आढावा घेत तसे. पण त्यावेळचे प्रतिसाद वेगळे. आता जवळजवळ प्रतिसाद थंडच.अनेक जणांना महिन्याच्या आतच त्यांच्यात्यांच्या जागेवरून बदललेलं होतं. आता नव्या साहेबांनी आपला पट उलगडायला सुरुवात केली होती. त्यांच्या मनातही अनेक वर्षांच्या कल्पना दबून होत्या, त्यांचीही अनेक उपयुक्त माणसं होती. पटावर भराभर प्याद्यांचे बदल झालेले त्यांना कळले.

पत्नीनं रोखून धरल्यानंच त्यांनी कसेबसे घरी आठवडाभर दिवस काढले. राहिलेली खरेदी, घरातले बदल, काही नातेवाईकांना भेटून येणं - असली त्यांच्या दृष्टीनं 'फालतू' कामं त्यांनी केली. दीड-दोन महिन्यांनी त्यांनी हळूहळू बरीच माहिती इकडून तिकडून काढली. एकंदरीत बरेच बदल होते. कुणी चांगलं म्हणे, कुणी वाईट म्हणे. काही काही 'तुमच्या काळातल्यासारखी शिस्त राहिली नाही', 'आम्हाला

पुढचं काही खरं दिसत नाही', असंही म्हणत. असं कुणी म्हणालं की, त्यांना आतून खूप बरं वाटे. आपली शिस्त, दूरदृष्टी, बुद्धिमत्ता, मिळवलेलं यश - सारं चित्रपटासारखं त्यांच्या डोळ्यांसमोरून सरके. फोन ठेवल्यावर थोड्या वेळानं ते शांतपणे विचार करत तेव्हा त्यांना वाटे, हे खरंच असं असेल ना ? तोंडदेखलं बोलणारे त्यांना नवीन नव्हते. आत्ताही त्यांना नंतर ते लक्षात आलं. हे त्यांचा स्वभाव ओळखून त्यांना बरं वाटेल, असं बोललेलं होतं. बाहेर नेहमीच्या कापडदुकानात गेले होते. त्यानं नेहमीप्रमाणं खुर्ची मागवली, मग चहा. सर्व झालं. खरेदी, चर्चा मग एवढ्या गडबडीत दुकानात आल्याबद्दल कौतुक झालं. मग ते ओघात निवृत्तीचं बोलून गेले. त्यांच्या नजरेतून दुकानदाराच्या चेहऱ्यावरचा फरक सुटला नाही. तसे साहेब पैसेवालेच होते. त्यामुळं दुकानदाराला एवढी चिंता वाटायचं कारण नव्हतं. पण थोडा हात आखडता होणार, असं त्याला वाटलं की काय, असं त्यांना उगाच वाटलं. तो आता आपल्याकडं थोडं दुर्लक्ष करतो, असं त्यांना पुन्हा एक खेप झाल्यावर वाटलं. ते उगीच की खरं त्यांना ठरवता आलं नाही !

पूर्वी फोन करायचा तरी नातेवाईक वचकून करीत. सासरहून मान असे. त्यांच्या आवडीनिवडी, त्यांना वेळ नाही, जबाबदाऱ्या, कर्तृत्व - साऱ्याचं कौतुक त्यांच्या तोंडावरच नव्हे - मागंसुद्धा. तेसुद्धा काही तरी बदलल्यासारखं त्यांना वाटलं. ते लोक - आता यांना काय वेळ आहे, ते मोकळेच आहेत - म्हणून वेळीअवेळी फोन करतात, असं वाटू लागलं. पूर्वी त्यांना ते लग्नाकार्याला, कुणाच्या मृत्यूसारख्या महत्त्वाच्या प्रसंगी येऊ शकले तरी, त्यांनी खूप केलं असं वाटे. आता नातेवाईक त्यांना बारशाला, डोहाळेजेवणं, कुणाची साठी, वाढदिवस यांनासुद्धा बोलावू लागले. त्यांच्या उपस्थितीची अपेक्षा धरू लागले. इतकंच काय, आता त्यांची उपस्थिती गृहीत धरायला लागले. पुढंपुढं तर मदतीला बोलावू लागले. प्रथमप्रथम त्यांना असले सल्ले, निर्णय द्यायला बोलावीत, त्यात जरा त्यांना आपल्याला रोल दिला, मान दिला, असं वाटे. पण आता तो उपचार आहे, अनेकदा त्यांच्या सल्ल्याप्रमाणं होत नाही, निर्णय आपला विचारायचा म्हणून विचारतात की काय, अशी शंका येऊ लागली. कारण त्यांनी सांगितल्याप्रमाणं अलीकडं निर्णय फारसे होत नसत.

ते हे सारं रोज पत्नीशी हळूहळू बोलू लागले. पूर्वी तिची बुद्धिमत्ता त्यांना

कमी वाटे. अनेक गोष्टीही तिला कळत नाहीत, असं वाटे. तिला सारे प्रॉझकॉन्स लक्षात येत नाहीत, तिला निर्णयक्षमता नाही, ती उगाच भावनेच्या आहारी जाते, तिला उरक नाही, नियोजनाची दृष्टी नाही, लोकांना कसं वागवावं, याची नीट कल्पना नाही - असं वाटे. त्यामुळं ते घरी फारसं बोलतच नसत. पण आता त्यांना स्वतःच्याच काही गोष्टींची शंका, अनुभव तिच्याशी बोलावेच लागले, तेव्हा त्यांच्या लक्षात येऊ लागलं की, ती ते समजतात तेवढी बुद्दू नाही.

त्यामानानं तिला 'बरीच' समज आहे. परिस्थितीला तोंड देण्याची, परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता आहे, असं त्यांना वाटू लागलं. पूर्वी त्यांना आपल्या ॲसेसमेंटवर, आकलनावर फार विश्वास होता. ते बरोबरच असतं, याची खात्रीही होती. पण आता मात्र त्यांना त्याची शंका यायला लागली. तिच्यासुद्धा 'ॲसेसमेंट'मध्ये तथ्य आहे, असं त्यांना वाटू लागलं. आपलंच चुकत होतं की, ती सुधारली - याचाही त्यांना निर्णय घेता येईना.

शेवटी एक पाऊल मागं घेऊन त्यांनी पत्नीबरोबर फिरायला गेले असताना विषय काढला. तिला त्यांची ओळख इतकी पंचवीस-तीस वर्षांची. त्यांची घरं, गावं, आर्थिक परिस्थिती, स्वभाव, त्यांच्यावरच्या वाढत गेलेल्या जबाबदाऱ्या, त्यांची लौकिक प्रगती, मानमान्यतेची वलयं - बऱ्याच गोष्टी तिच्या डोळ्यांसमोर घडत गेलेल्या होत्या. पत्नीलाही तिच्या परीनं जगाचा, माणसांचा अनुभव होता. उलट तिचंही स्वतःचं मैत्रिणींचं विश्व होतं. मोकळ्या वेळेचा सदुपयोग म्हणून तिनं तिच्या परीनं समाजसेवी संस्थांचंही काम केलं होतं. तिच्या ठिकाणी सहज श्रद्धा होती. बाह्य अवडंबरं, कर्मकांडं, कुठले पंथ - या कशातही न अडकता ती समजुतीनं परमार्थही करी. शांतपणे जमेल तेव्हा मनाजोगं देवदर्शन घेई. उद्‌बोधक वाचन, कधी तरी खऱ्या निरिच्छ सत्पुरुषांचं प्रवचन - एवढंसुद्धा तिला पुरे होई.

या कुठल्या विश्वाचा रामनसाहेबांना परिचयही नव्हता. नव्हे, त्यांना त्यांतलं बरंचसं माहीत नव्हतं. जर ते असेच अजून नोकरीत, त्यांच्या विश्वात राहिले असते तर, त्याची दखल घ्यावी, असंही त्यांना कधी वाटलं नसतं. पण पत्नी शांतपणे म्हणाली, 'खरं सांगू, तुमचं काय आणि तुम्ही म्हणाला त्या लोकांचं काय, नातेवाईकांचं काय - काही चुकतं आहे, असं मला वाटत नाही. परिस्थिती सारखी बदलत असते.

आपलं तिच्याकडं लक्ष नसतं. आपण ती विचारात घेत नाही. आपण आपल्याच विश्वात असतो, आपल्याच कल्पनांत वावरतो. आपले आकार, कल्पना, विचार, अपेक्षा - जगावर नकळत लादायचा प्रयत्न करतो. आपल्या सत्तेच्या काळात किंवा काही कल्पना बरोबर असतात-जगाशी जुळतात म्हणून त्या स्वीकारल्या जातात. आपण उगाचच त्याला 'आपलं यश' समजतो. मग अपेक्षा वाढतात. त्याच बरोबर आहेत असा समज वाढतो. आपण जणुकाही या जगाच्या केंद्रस्थानी, नियंत्रणाच्या स्थानी असल्यासारखं वाटायला लागतं.

'जगात उठलेली वावटळ वाऱ्याबरोबर फिरते. कधी तरी फिरतफिरत आपल्याभोवती फिरते. म्हणून काय आपण तिचं केंद्र थोडंच असतो ? वारा आपल्या गतीनं जातो, ऊन्ह आपल्या वेळेला पडतं, मावळतं, पाऊस आपल्या गतीनं पडतो, थांबतो, नद्या वाहतात, तारे आपल्यापरीनं चमकत असतात. आपण तर एवढ्या सगळ्याचे किती नगण्य भाग असतो. पुन्हा प्रत्येक गोष्ट सतत बदलत असते. आपणही त्या अगणित बदलत्या गोष्टींतले एक असतो.

'आता आपलाच प्रपंच पहा ना. लग्न झालं, तेव्हा आईबाबांचं स्थान किती महत्त्वाचं होतं. आपण मोठे होत गेलो. जबाबदाऱ्या घेत गेलो. दोन्ही मुलांचा त्यात प्रवेश झाला. आईबाबांचं स्थान स्वाभाविकपणे बदललं. कमी झालं, असं नाही, पण ते आईबाबा राहिले नाहीत, आजीआजोबा झाले ना ? त्यांनी ते स्वीकारलं. सारं तुमच्या हाती सोपवलं. तुम्ही सारं बाहेरचं पेललं, मी घरातलं. ते हळूहळू करीत बाजूला झालेले. बदलाला सामोरे गेलेले. मध्येच आई काळाच्या पडद्याआड गेल्या. पोकळी झाली. बाबाही तसे एकटेच पडले. पण त्यांनी आईचं जाणं स्वीकारलं. बदल स्वीकारले. पुढं तर तेही गेले.

'तोवर दोघंही मुलं मोठी झाली. माझ्यावर बारीकसारीक गोष्टींत अवलंबून असलेली मुलं कधी घरट्याबाहेर पडली, तेही कळलं नाही. सहज घडलं, वारा वाहात जावा,नदीचं पाणी गाव ओलांडत जावं, तसं मुलं उंबऱ्याबाहेर पडली, रमली, शिकली. माझी त्यानंतर त्यांना आता विशेष गरजही उरली नाही. मीही तो बदल स्वीकारला. आता तो इंजिनिअर झाला. नोकरीला लागला. लग्न होईल. त्यांचंही, तिचंही. पुन्हा घर थोडं भरेल. नदीचं पाणी वाढावं तसं. परत ते ओसरतं तसं, ती

सासरी गेली की, रिकामं होईल. मी त्याही बदलाशी सुसंवादी राहीन. त्यात माझं जे काम येईल, त्याला सामोरी जाईन.

'बाहेरून आपण बदलांना सुसंवादी होतो, सामोरे जातो, तसं मी आतूनही जाते. मी बाकी काही फारसं वाचत नाही. एक ज्ञानेश्वरी नि त्यावरचं लिहिलेलं, सांगितलेलं काही. मला तेवढं आतून सुसंवादी राहायला पुरतं. एखादं देवदर्शन, तेही कधीतरी. ते मला आतून सुसंवादाचं बळ देतं. समाजाचे थोडे उपकार फेडावे, बाहेरच्यांची परिस्थिती कळावी, एवढा संपर्क मी बाहेर ठेवला आहे. त्यासाठी थोडेसे कष्ट मी घेते. वेळ तर चांगला जातोच आहे. पण जगात किती दुःख, उणिवा, लोभ, स्वार्थ, दांभिकता, खोटेपणा, किती प्रकारची आजारपणं-खूप कळतं. असलंच काही दुःख आपलं तर, ते त्या साऱ्यांपुढं काहीच नाही. त्यामुळं हेही वाटतं की, आपल्याला देवानं खूपखूप सुखात ठेवलं आहे. फक्त दिलेल्या परिस्थितीत तर काळ पुढं जाईल तसं, एकेक दिवसानं आपलं वय एकेक दिवसानं वाढतं, तसंच ते दुसऱ्यांचंही वाढतं - त्यानं होणाऱ्या बदलांशी सुसंवाद ठेवला तर अस्वस्थ व्हायला कारणच नाही.'

रामनसाहेबांना पटत होतं. पण ते म्हणाले, 'अगं, बदल होतात, आपण बदलावं, म्हणतेस ते बरोबर आहे. पण ते बदल चुकीचे असले तरी,आपण त्याप्रमाणं बदलायचं का ?' पत्नी म्हणाली, 'असं पहा, बदलांशी सुसंवादी राहायचं म्हणजे सगळेच बदल आपण स्वीकारायचे, असं नाही. बाबांनी धोतरशर्ट वापरले, आपण काळाप्रमाणं शर्टपॅन्ट, मुलं जीन्स... बाबांना शर्टपॅन्टचा आग्रह आपण धरला नाही. त्यांनी आपल्याला धोतराचा आग्रह धरला नाही. किंवा तुम्ही पॅन्ट वापरली म्हणून त्रास करून घेतला नाही, एवढं सुसंवादी राहिलं म्हणजे झालं. दुसरं असं होतं की, जे सध्याचं, सवयीचं असतं, तेच बरोबर वाटून अनेकदा बदलांना विरोध करावा, असं मनाला वाटतं. तसं नसतं. प्रत्येक बदलामागं इतर अनेक बदलांचाही विचार असतो. चालताना धोतर सोपं होतं. पण काळाबरोबर आलेल्या सायकली, मोटारसायकलींना पॅन्ट सोपी पडते ना ? म्हणून निदान विचार तरी करू, सोय, गरज आहे का ? तिसरं म्हणजे, बदलांत काही वाईट असलं तर, ते बदल काही काळानं आपोआपच फेकले जातात. बदल म्हणून काही पदार्थ खाल्ला नि तो विषारी असला तर तो आपोआप उलटून नाही का पडत ?

'लहान मूल मोठं झालं तर लगेच त्याला त्याचे नुकतेच घेतले असले, चांगले असले तरी, ते कपडे बसत नाहीसे होतात. आपण तेच घालायचा हट्ट धरीत नाही. बदल करतो. मोठे कपडे घेतो. आधीचे कपडे कितीही चांगले असले, तरी ते घालायचा हट्ट त्यानंही करण्यात अर्थ नसतो. आपणही, 'त्यात नुकसान झालं' म्हणण्यात अर्थ नसतो. रागानं कपडे टाकून देणंही योग्य नसतं. दुसऱ्या कुठल्या त्याच्याएवढ्या लहान मुलाला आवर्जून द्यावे. गरजूला द्यावे. कपडेच ते शेवटी, वेळेला वापरले गेले म्हणजे झाले. उलट देण्यातला, गरजूची गरज भागवण्यातला आनंदच मिळतो. थंडी पडली म्हणून, स्वेटर घालून जपायचं, आवडता घ्यायचा. पण आवडतो म्हणून उन्हाळा आला तरी, तोच स्वेटर घालायला मिळावा, म्हणण्यात काय अर्थ ? उलट तो काढून ठेवला तरच उकडायचं थांबेल. जरा वारं लागेल. जिवाला शांतता होईल !

'तुम्हीच पाहा ना, तुमच्या जागी आलेल्या माणसाला आपल्या मनाप्रमाणं, आत्ताच्या गरजांप्रमाणं वागायला हवंय ना ? तुम्हाला, तुम्ही तिथं आलात त्यावेळी, वागण्याची, स्वातंत्र्याची जी गरज होती, जो हक्क मिळाला होता, तोच आज त्यांना आहे, तीच गरज त्यांना आहे. तुम्ही गेल्यावर त्यांनी तिथली केबिनची जागा बदलली, फर्निचर बदललं - म्हणून तुम्हाला किती अस्वस्थता आली. पण आता त्यांना त्यांचा लेआऊट आणायचा आहे. काळ पुढं गेला. आपण आता तिकडं वळून बघायचं कारणच नाही. आपण तरुणपणी आपला लेआऊट आणताना आईवडिलांचा तेव्हाचा लेआऊट उपयुक्त नव्हता, असं वाटलं, म्हणून आपला आणला ना ? आता आपला जुना वाटेल म्हणून मुलं नवा आणतील ! तसंच सारं आहे !

'काळ फक्त पुढंच जाणं जाणतो. आपणच मागं रेंगाळतो, जुन्या मतांत, परिस्थितींत, काळात रेंगाळतो. आपणही पुढं जात राहिलो तर अस्वस्थता नाही, विसंवादही नाही, त्रास नाही. एकाच वेळीसुद्धा आपल्याला वडिलांशी वडिलांप्रमाणं, मित्रांशी मित्रांप्रमाणं, नोकरांशी नोकरांप्रमाणं, मुलांशी मुलांप्रमाणं वागतो - असं बदलत वागावंच लागतं - आणि तेच योग्य होतं ना ? तरच आपण आपलं कामही नीट करू शकू, इतकंच नाही तर, त्यांनाही आपण त्यांचे वाटू, तेही आपल्याशी सुसंवादी वागतील. सुखाचं होईल !

'तो साधा देवळातला देव पाहा. लहान मुलालाही आपला वाटतो, तरुणांना

आपला वाटतो, स्त्रियांना आपला वाटतो, म्हाताऱ्याकोताऱ्यांना आपला वाटतो. तो त्या प्रत्येकाशी त्याच्यासारखा बदलत, योग्य ते वागतो, प्रत्येकाला सत्प्रवृत्तींची, बदलांशी सुसंवादाची प्रेरणा देतो ...

'काळाप्रमाणं, सोयीप्रमाणं देवसुद्धा जुळवून घेतो. कधी काळा दगड शाळिग्राम, गार, संगमरवर - जसा काळाप्रमाणं घडवला जाईल तसा ! काळ पुढं जात असतो, तो घेऊन येत असतो, तशी सोबत घेऊन देव राहतो - मिणमिण पणतीत, पितळेच्या समईबरोबर, बल्बमध्ये, आता फ्लड लाईटमध्ये, आता विजेच्या बचतीसाठी सीएफ्एल्मध्येही वावरतो. तो आतून तसाच आहे प्रेमळ, समजूतदार - हे बाहेरचे बदल काळाचे - त्याला तो सुसंवादी आहे. बाहेर बदलत बदलत चालला आहे. म्हणून सर्वांना, सर्व वेळी श्रद्धेनं आपला वाटतो... आनंदात राहातो.. आनंदात ठेवतो आहे !'

'बस्स एवढंच ! तुमचा तर किती अभ्यास आहे, अनुभव आहे, मी तर बाहेरच्या जगात फार फिरलेली नाही, वावरलेली नाही. तुम्हीच उलट हे सारं अधिक चांगलं समजू शकाल, करू शकाल, आनंदी राहू शकाल...' आपण फार बोललो असं वाटून, पत्नी एकदम थांबली.

तोच बोलता बोलता दोघंही वाटेतल्या देवळाजवळ पोचले. त्रिपुरीमुळं बाहेरच्या दीपमाळांपासून आत गाभाऱ्यापर्यंत ओळीनं दिव्यांचा जणू उत्सवच मांडला होता. त्यांना उलगडत गेलेल्या आयुष्यात आनंद आणणाऱ्या नवनव्या मुद्यांसारखा. रामनसाहेबांना आयुष्यात प्रथमच एक अगदी साध्या, सोप्या, सरळ, विशाल आणि आनंदी जगाचा पडदा उघडला होता. ते जग काळाबरोबर सुसंवादी राहून शांतपणे पुढं जाणारं होतं, आनंदी होतं. आता त्या देवळात रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांचा झगमगाट लोकांनाही उजळून टाकीत होता, देवालाही. साहेबांना वाटलं, त्यांचं उरलेल्या पुढच्या आयुष्यावरचं मळभही दूर झालं होतं, आयुष्य सरळ, सोपं, साधं, शांत होतं. समाधानी होतं. आता ते सहज आनंदात जगू शकत होते. त्यासाठी त्यांना आता फक्त सुसंवादी राहायला हवं होतं आपल्या पत्नीसारखं नि तिच्या त्या साध्याभोळ्या देवासारखं - रोज बदलत्या आपल्या भूमिकेशी आणि बदलत्या काळाशी !

*

११. '..पाहिजेत..पण..!'

विमानतळ आता तासाभरावरच होता. अद्‌भुतनं आपल्या सीटवर आलेलं सारं खाणंपिणं संपवलं, समोर ठेवलेली मासिकंही संपवली. आता तासभर काय करायचं, अशा विचारात तो होता. तो स्वतःच्याच नादात असल्यानं, त्याच्या दोनबायदोनच्या सीटवरच्या पलीकडच्या व्यक्तीकडं त्याचं लक्ष गेलं नव्हतं. ती व्यक्ती तशी लक्ष जाण्यासारखी नव्हती, पण नेहमीपेक्षा पेहराव थोडा वेगळा होता. डोळे शांत, पण भेदक होते. पेहराव थोडा पठाणी झग्यांसारखा. त्यामुळं हातांचा, उंचीचा नीट अंदाज लागत नव्हता. वास्तविक, अद्‌भुतला माणसांची उत्तम पारख होती. तरीही त्याला काही तरी चुकल्यासारखं वाटत होतं. आपण ही व्यक्ती नीट ओळखू शकत नाही, असं त्याला वाटलं.

हे तसं त्याच्या बुद्धिमत्तेला अस्वस्थ करणारं असल्यानं, इतका वेळ आपल्या ते लक्षात कसं आलं नाही, असंच त्याला वाटलं. त्यानं बाजूला झुकून त्या व्यक्तीला 'नमस्ते' म्हणून संभाषणाचा सूर दर्शवला. त्या व्यक्तीनंही त्याला झुकून 'नमस्कार' करून प्रतिसाद दिला. त्याला अर्थातच बोलण्याची उत्सुकता होती. अद्‌भुतनं आपलं कार्ड पुढं करत म्हटलं, 'मी अद्‌भुत - माझी 'एनी प्लेसमेंट' 'कोणत्याही नोकरीकरता आणि अशा अनेक अन्य गरजांसाठीही..' अशी मोठी कंपनी आहे.' शेजारच्या व्यक्तीनं थोडे डोळे विस्फारून आश्चर्य व्यक्त केलं. पण धीमेपणानं. पुढं काही कार्ड वगैरे न देता म्हटलं, 'योगायोग आहे. मला तुम्ही जेनिस म्हणू शकता. मीही थोडा शोधातच आहे. काही माणसं मला हवी आहेत !'

अद्‌भुतला फारच आश्चर्य वाटलं. ती व्यक्ती तशी साधी वाटत नव्हतीच. कदाचित आज एखादं मोठं काम मिळून जाईल की काय, असा आशाजनक विचारही येऊन गेला. मग धंदा, लोक पुरवण्याचं मोठं कमिशन - किती, कसली माणसं हवी आहेत त्यावर.. पण ठीक आहे, ते नंतर पाहाता येईल - हेही विचार त्याच्या मनात येऊन गेले. पण नेमकी अशा गरजू गिऱ्हाईकाची गाठ पडावी, ही आपल्या गुरुमहाराजांची कृपाच, असंही त्याच्या मनाला वाटून गेलं. धंदा तर उत्तमच चालला होता, पण एक कोटीचं लक्ष्य अजूनही गाठता येत नव्हतं. एक लाख कधीच गाठले.

पण हा टप्पा दमवत होता. पाहू, गुरुकृपेची कमाल असेल तर कदाचित त्यासाठीच आपण विमानात त्याच माणसाशेजारी नेमके बसले असू !.. त्याच्या मनात झटझट विचार येत होते...

एकदम शेजारचा जेनिस हळूच म्हणाला, '..ते गुरुकृपेची कमाल वगैरे आपण नंतर पाहू.' पुढं मोठ्यानं म्हणाला,'फक्त माणसं शोधायचं काम आपल्याला करायचं आहे. तुम्ही मदत करत असला तर, प्रत्येक माणसामागं मी तुम्हाला एक लाख रुपये द्यायला तयार आहे !'

अद्‌भुत खूशही झाला पण दुसऱ्या क्षणी दचकलाही. हा माणूस काही मनकवडा आहे की काय ? ते गुरुकृपा वगैरे आधी पुटपुटला ते काय...? हस्तरेषावाले, तसे चेहरे वाचणारेही असतात. पण दुसऱ्या क्षणी त्याला ते 'प्लेसमेंट कमिशन एकदम दिसायला लागलं...एक लाख...' हा माणूस त्या माणसाला काय पॅकेज-पगार देणार असेल, असं वाटू लागलं. दुसरं मन म्हणालं, काही का देईना, आपल्याला आपले पैसे मिळाल्याशी मतलब. वाटलं तर, त्या माणसाकडून आपण नेहमीचे चार्जेस कमी घेऊ, मोठी ऑर्डर असली तर... तंद्रीतच त्यानं विचारलं,'पण आपण एकदा नीट बसून तुमच्या रिक्वायरमेंट-गरजा नीट ठरवू, समजून घेऊ. मग मी मदत करीन..!'

जेनिस थोडं मंद स्मित करीत म्हणाला, 'चालेल, फक्त माणसं मात्र योग्य पाहिजेत... तशी बरीच गरज आहे.. मोठं प्रोजेक्ट आहे..' प्रकरण थोडं बुचकळ्यात टाकणारं होतं. पण माणूस तर चांगला, सभ्य, विश्वासू वाटत होता. फक्त त्याच्याकडं पाहायला मात्र थोडी नजर धजावत नव्हती. तो आपल्या आत पाहातो आहे की काय, याची उगाचच शंका येऊन किंचित भीती वाटे.

इतक्यात विमान उतरत असल्याच्या सूचना आल्या. बेल्टच्या सूचना आल्या. उतरल्यावर 'जरा भेटू', म्हणत अद्‌भुतनं आजूबाजूला सहज नजर टाकली. एका तीन कोचच्या जवळजवळच सीटवरची तीन माणसं एकमेकांशी काही बराच वेळ बोलत होती. ती विमानतळ जवळ आला म्हटल्यावर एकदम गप्प झाली. विशेषतः इतका वेळ त्यांच्या चेहऱ्यावरचे अगदी जवळिकीचे भाव एकदम लोपले. ते तिघेही एकदम त्रयस्थासारखे वाटू लागले. वेगवेगळ्या दिशांना पाहू लागले.

अद्‌भुतच्या नजरेतून हे सुटलं नव्हतं. त्याला माणसांची पारख करण्याचा सराव होताच, त्यामुळं एक वेगळेपणा म्हणून त्यानं ते दृश्य टिपलं होतं.

सर्व विमानतळाबाहेर आले. बाहेर आल्यावर नेहमीच्या सवयीनं अद्‌भुतनं टॅक्सीला हात केला. पण क्षणभर मगाचचं ते संभाव्य गिऱ्हाईक... एकदम त्याला आठवण होऊन त्यानं मागं बघितलं. ते नेमके त्याच्या मागंच उभे होते. आता ती व्यक्ती चांगली उंचीपुरी, भारदस्त आहे, हे त्याला जाणवलं. शहराच्या ज्या भागात तो जाणार होता, त्याच्या अलीकडं ते उतरणार होते, हे कळताच त्यानं त्याच टॅक्सीत त्यांना घेतलं. ते दोघं शेजारी बसले. त्यांचा प्रवास सुरू झाला.

'प्रवास छान झाला. आज विमान वेळेत आलं..' वगैरे एकदोन औपचारिक उद्‌गारांपर्यंत गाडी गेली नव्हती. इतक्यात जेनिस अचानकपणे उद्‌गारला, '..मला हवीत ती माणसं आज तुम्ही देणार ना ?..'

अद्‌भुत आपल्याच विचारात होता. त्याच्या डोक्यात ती मगाचची तीन माणसं अजूनही होती. तो काही बोलायच्या आत जेनिस म्हणाला, '... हां ! ती जी तीन माणसं.. तुम्ही पाहात होता ना, तसली मात्र आपल्याला नकोत बरं का..'

आता अद्‌भुतला मात्र धक्काही बसला नि खात्रीही झाली की, आपण कुठल्या तरी वेगळ्याच व्यक्तीच्या संपर्कात आलो आहोत. तरीही अनुभवी प्लेसमेंट मॅनेजरचा गंभीर आव कायम ठेवीत तो म्हणाला, 'कुठली तीन माणसं..?'

'उतरताना तुम्ही पहात होता ती..' जेनिस.

'अरे.. म्हणजे तुमच्या ते लक्षात आलं तर..! पण ती का नकोत म्हणे ?'

अद्‌भुत मनात म्हणाला, 'ती कोण, कुठली कुणास ठाऊक. ती थोडीच, आपल्या ओळखीची आहेत आणि अशी का कुणी रस्त्यावरची माणसं कुणाला सुचवतं.. अर्ज, बायोडेटा..सीव्ही..पर्सनल चेक..' असंख्य गोष्टी..! या जेनिसला काही माहीत नसावं किंवा हा थोडा ढिला असावा. आपण उगाच याला लिफ्ट दिली असंही क्षणभर त्याला वाटलं. पण त्यानं ते मनातलं ओळखलं होतं, त्यामुळं जरा दमानं घ्यायचं त्यानं ठरवलं. पाहू तरी काय प्रकार आहे ते.

'पाहायचंय ?' त्यानं होकार देताच जेनिसनं गाडी पुढच्या चौकात उजवीकडं घ्यायला सांगितली. एका चार मजली इमारतीसमोर ती स्लो होऊन कडेला थांबवली.

त्या तिघांतले एक कोट-टाय घालून टॅक्सीतून उतरत होते. त्यांचं हार घालून स्वागत झालं. ते अद्‌भुतला पाहायला सांगून त्यानं गाडी पुढच्या रोडला घेतली. तिथं त्यातले दुसरे एका लॉजसमोर उतरत होते. अनेक जण त्यांच्या स्वागताला जमले होते. आता अद्‌भुतच्या थोडं लक्षात आल्यानं, जेनिसनं गाडी तशीच पुढं नेली. ती वळून गेली, तेव्हा तिथंही एक लॉज होतं. त्याच्यासमोर त्या तिघांतले तिसरे उतरत होते. लॉज साधं होतं. पण स्वागताला गर्दी प्रचंड होती. घोषणा सुरू होत्या. अद्‌भुतला यातलं काहीच कळलं नाही.

एकच कळलं की, हीच ती तीन माणसं होती. जेनिसकडं त्यानं आश्चर्यानं पाहिलं. जेनिस म्हणाला, 'तुला ही माणसं कोण माहीत आहेत ?'

'नाही.' अद्‌भुत.

'एक एका फार मोठ्या कंपनीचा मालक आहे. नंतर उतरले, ते त्यांच्यातल्या सुपरवायझर संघटनेचे नेते आहेत. तिसरे उतरले, ते त्यांच्या कर्मचाऱ्यांचे नेते आहेत. वेगवेगळ्या मागण्यांसाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन उत्तम चाललेली कंपनी संप करून बंद पाडली आहे. कंपनी फायद्यात जरूर आहे. आता तिघंही एकत्रच होते. उद्या वाटलं तर त्यांच्या वाटाघाटींना जा , बातम्या पाहा. तू पाहिलंस टेबलवर ते किती अटीतटीनं एकमेकांशी संघर्ष करतील, आपापल्या कामगारांच्या हितासाठी प्राण पणाला लावण्याच्या घोषणा ते करतील. संप ताणून धरतील.

'त्यांनी किती मागणी करायची, कितीवर तडजोड करायची - सारं ठरलं आहे. त्यासाठी एकमेकांना वरच्या पातळ्यांवर काय द्यायचं, तेच त्यांनी वाटेत ठरवून घेतलं आहे. चार दिवस वाटाघाटींचा घोळ चालेल. मग कामगारही घाईला येतील, अधिकारीही. काम तुंबत चाललं आहे, कंपनीचा रोज तोटा होतो आहे...असा आरडाओरडा होत आतून ठरलेल्या मागण्यांवर तडजोड होईल. प्रत्येक जण आपण कसे जिंकलो, याची पत्रकं काढतील. एकजुटीबद्दल कामगारांचे आभार. नेत्यांचे सत्कार सर्व सुरू होईल..!

'पुढं ही कंपनी कशी बंद पाडायची...साऱ्या कायद्यांचा पळवाटा सांभाळून...मग तिच्या जागा कशा सोन्याच्या भावानं विकायच्या..त्यात कोणाचे किती - सारं शिजतं आहे... कामगार बिचारे आशेनं थोड्या पगारवाढीवर काही

दिवस काम करतील... पुन्हा हे असंतोष उत्पन्न करतील... त्या लढ्यात हे सारं अंमलात येईल..हे कारस्थानी, लोभी सारं हळूहळू लाटतील... देणार तुम्ही ही 'माणसं' मला ? मला नकोत..'

'ड्रायव्हर.. जरा थांबा...माझा स्टॉप आला. मी उतरतो.' म्हणत तो उतरूनही गेला...'फक्त तुम्ही दुसरा विचार करून ठेवा... मी संपर्क साधतो नंतर'..असं म्हणत.

अद्‌भुत खरं तर नावानंही अद्‌भुत होता. लौकिकात यशस्वी होता. पण जे एका तासात घडलं, ते त्याहीपेक्षा त्याला अद्‌भुत वाटत होतं. तो त्या धक्क्यातून सावरायच्या आत त्यानं सांगितलेल्या मूळ पत्त्याकडं गाडी सुसाट सुटलीही होती. तेव्हा त्याच्या क्षणभरानं लक्षात आलं..आपण याचा पत्ता कुठं घेतला..?

त्याला हादरवून सोडणाऱ्या माणसाच्या त्या धक्कादायक सांगण्यातून तो अजून सावरला नव्हता. विमानात हा माणूस दिसल्यापासूनच्या प्रत्येक घटनेवर तो विचार करीत होता.. घरी येऊन तो त्या विचारात कधी झोपी गेला, त्याला कळलंही नाही.

दुसरे दिवशी सकाळची वृत्तपत्रं येऊन पडली. नेहमीप्रमाणं चहा घेताघेता त्यानं ती चाळली. पहिल्याच पानावर संपाच्या पाचव्या दिवसाची बातमी. 'व्यवस्थापन भूमिकेवर ठाम' तर 'कामगार व अधिकारी नेते मागण्यांत तसूभरही मागे सरकणार नाही'च्या शीर्षकांनी मात्र आता अद्‌भुतचा ताबा घेतला. त्या साऱ्या बातमीच्या अक्षरन् अक्षरावर त्याची नजर खिळली होती.

शेवटी त्याच्या पत्नीला - लीलालाही - थोडं कुतूहल वाटलं, थोडा रागही. एवढं काय त्या बातम्यात होतं ? अद्‌भुतला वाटलं, एकदा सांगावं. पण तो काही बोलला नाही. पण पुढं या कंपनीच्या बातमीचा तो पाठपुरावा करीत होता. अखेर जेनिसनं सांगितलेल्या शब्दांतच तिचा शेवट झाला. आता मात्र त्याला राहावेना. हा गृहस्थ पुन्हा कसा, कधी, कुठं भेटेल..? त्याच्या तळमळीबद्दल पत्नीला शंका होतीच. शेवटी त्यानं सारा खुलासा केला. तिलाही त्या धक्क्यातून सावरायला वेळ लागला.

त्या कंपनीलासुद्धा त्यांनी अनेक कामगार पुरवले होते. इतकंच काय, त्या

कंपनीच्या कामगारांचे व सुपरवायझर लोकांचे पुढारीसुद्धा मुळात त्यांच्यामार्फतच लागले होते. पण त्यांच्या स्वभावानं घेतलेलं हे वळण दोघांच्याही कल्पनेपलीकडं वाईट होतं. ते तर नुकसानीचंच होतं. पण पुढं त्या कामगारांचं भवितव्य किती धोक्यात होतं ! 'काय करणार आपण', 'काय चुकलं आपलं' - अशा नजरांनी त्यांनी एकमेकांकडं पाहिलं. कोण सावरील हे सारं ? जेनिस ?

इतक्यात फोन वाजला. नंबर अपरिचित पण अद्‌भुतनं उचलला. 'हॅलो, मी जेनिस.'

'काय जेनिस ! किती आश्चर्य आहे ! कुठं आहात तुम्ही ?' अद्‌भुत ओरडलाच.

'दोघंही वाट पाहात आहातच ना ? मी इथंच आहे दारात !' जेनिस.

अद्‌भुतनं बाहेर पळत जाऊन दार उघडलं. मागून उत्सुकतेनं लीला. पाहताच काही वेगळं वाटावं, असा जेनिस होता खरा. पण का कुणास ठाऊक, तिला त्याचं भय नाही वाटलं. कुठलंही. उलट पाहाताच तिला आतून शांत वाटलं.

'तुमची आमची परत भेट होते आहे, यावर माझा विश्वासच बसत नाही, तुम्ही त्या दिवशी सांगितलेल्यावर तर अजूनही !'

'नाही बसत अजूनही. मी तर समोर आहे. सांगितलं त्यावर विश्वास बसायला हरकत नसावी !' जेनिसच्या बोलण्यात ठामपणा पण मंद स्मितही होतं.

'नाही, नाही, तसं नाही. सांगितलं त्यावर तर पूर्णच विश्वास बसला. पण आपल्या भेटीवर. कारण माझ्या बाजूनं मी तुमचा पत्ता घ्यायचाच विसरलो, हे माझ्या उशीरा लक्षात आलं !' अद्‌भुत म्हणाला.

'असू दे. म्हणून तर मी आपण होऊन पुन्हा आलो.' जेनिस.

तोवर लीलानं कॉफी आणलीही होती. घेताघेता अद्‌भुत म्हणाला, 'खरं तर मला आधीच कळायला हवं होतं, ती कंपनीच काय, ते कामगारही माझे क्लायंट आहेत. मी त्यांतल्या अनेकांची आमच्या फर्मच्या माध्यमातून गाठ घालून दिली आहे !'

लीलाला बसायची खूण करीत अद्‌भुत म्हणाला, 'पाहा तसं तर आमच्या माध्यमातून अनेकांची गाठभेट होत असते !'

'होय. अगदी विवाह जमवणं, आयुष्याचे साथीदार जोडून देणं, एकट्यादुकट्यांना, शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना केअरटेकर्स मिळवून देणं, गरजूंना विक्रीला मदत करणं, नि जमिनींच्या गरजूंना जमिनी खरेदी करून देणं, जमिनीपासून असंख्य वस्तूंपर्यंत - अनेक बाबतींत, तुमची मदत देणाऱ्या नि घेणाऱ्याला आज वर्षानुवर्षं होत असते...!' बोलण्यातून सहज जाणवत होतं, जेनिसला, तो बोलत होता त्यापेक्षा जास्त माहिती होतं. ही दोघंही आतून अवाक् झाली होती. याचा उद्देश तर काही वाईट दिसत नाही, कळत नाही, त्याच्या शक्तीचा अंदाज लागत नाही, इतकी माहिती याच्याकडं कशी याचा उलगडा होत नाही.

'आज तुमचा दिवस मोकळा आहे ना ?' जेनिसनं विचारलं. ती दोघंही एकमेकांकडं पाहात आहेत, हे जाणून जेनिस म्हणाला, 'तुमच्या रात्रीच्या कार्यक्रमाची मला कल्पना आहे. दिवसभर वेळ असला तर आपण वाटल्यास चक्कर मारू. तिघंही जाऊ. दुपारी वाटल्यास दुपारी परतू. वाटल्यास संध्याकाळपर्यंत !'

दोघांच्याही मनात आलं, 'बाप रे, याला आपला रात्रीचा पार्टीचा कार्यक्रमही माहीत आहे. दिवसभर खरंच काही नव्हतं. कालचं त्याचं काम उरकून तो लवकर परतला होता. मुलगा चेन्नईत शिकत होता, नोकरीही करत होता. भेटल्यावर एवढ्या प्रवासाचा कंटाळा आला म्हणून अद्भुतनं विमान पकडलं होतं. त्यामुळं आजचा दिवस मोकळाच. उलट आता याच्याबरोबर दिवस म्हणजे आणखी काय काय घडतं, त्याची विलक्षण उत्सुकता होती. त्यानं पत्नीकडं पाहिलं. तिला सारी कल्पना आल्यानं आणि तिलाही जायला मिळणार असल्यानं तिनं चटकन होकार दिला. फक्त अजून नाश्तापाणी नव्हतं.

चटकन जेनिस म्हणाला, 'नाश्ता आपण वाटेत करू.'

अद्भुतच्या गाडीतून तिघं जात होते. वाटेत एक मोठं डेअरी प्रोजेक्ट लागलं. गाडीत जेनिस मागं एकटाच बसला होता. ती दोघंही पुढं बसली होती. तो मागून म्हणला, 'मालक दिसतात गल्ल्यावर. तुमचेच क्लायंट आहेत. जाऊया का पाच मिनिटं ?'

अद्भुतला आता धक्क्यांची सवय झाली होती. कुठलीही माहिती याला कशी कळली, म्हणून विचारायचं नाही. फक्त या डेअरीचं नि मालकाचं त्यालाच

कौतुक होतं. कारण त्यानं त्याला एक साधा कामगार म्हणून सुचवलं. कर्तबगारीनं मालकानंतर तोच मालक झाला होता. त्याच्याकडं जाणं कौतुकाचंच होतं. गाडी आत घेऊन अद्‌भुत दोघांसह आत गेला. मालकानं ओळख दिली. आत बसायला सांगितलं. तिथं गरम स्पेशल मसाला दूधविक्री केंद्रही होतं. तिघांना टेबलवर दूध पाठवून दिलं. पण अद्‌भुतला नेहमीसारखं वाटलं नाही. येताना काउंटरवर मालकांनी पैसे घेतले नाहीत. 'कसं चाललंय ?' विचारता 'छान!' म्हणून उत्तर दिलं. तिघंही बाहेर पडले.

अद्‌भुतला आपल्या कार्याचं एक कौतुक दाखवायचं होतं. पण तसा आनंद तिथं दिसला नाही. गाडी सुरू झाल्यावर जेनिस मागून म्हणाला, 'हे तुमचे मालक मित्र. आज त्यांनी विशेष ओळख नाही दाखवली, का ? त्यांचं तोंड पैशानं काळं झालं आहे, म्हणून ते चुकवीत होते. त्यांनी आता एक दूधभेसळीचा प्लँट टाकला आहे. आडबाजूला. हजारो लिटर दूध तिथं भेसळ होऊन येतं. यांच्या नव्हे, यांच्याकडं एजन्सी असलेल्या नामांकित कंपन्याचं. रात्रीत त्या पिशव्या उघडून दूध काढून पाणी मिसळलं जातं. पॅक होतात. कंपन्यांच्या नावावर प्रचंड खप होतो. असं खूप काही. त्यावर दोन दिवसांपूर्वी धाड पडली. मामला असाच पैशानं आता पॅक होईल. कुणी निःस्पृह अधिकारी असले तर कठीण आहे. नाहीतर पूर्वीही हे झालं आहे, ते पैशानं मिटलं. पाहू आता.. !'

अद्‌भुतला आता त्याच्या वागण्याचा अर्थ लागत चालला. गाडी हळू जात होती. लांबून येणाऱ्या व्यक्तीनं हात केला. अद्‌भुतनं गाडी थांबवली. तो उतरून त्या माणसाजवळ जाऊन पाच मिनिटं बोलून आला. ती व्यक्ती निरुत्साही दिसत होती. त्याच्या खांद्यावर थोपटून अद्‌भुत परत आला. गाडी सुरू झाली. जेनिस मागून म्हणाला, 'काय, अजून पुरा पगार नाही ना ? किती वर्षं झाली ? दोन ?'

अद्‌भुतनं खेदानं मान हलवली. 'पण मॅनेजमेंटही तुमचीच क्लायंट आहे!'

'हो. त्यांनी मूळ पगाराप्रमाणं पेमेंट केलं एक महिन्याचं !'

'अन् या माणसानंही तुमचं पेमेंट केलंच की !' जेनिसनं टाळलेलं उत्तर पुरं केलं आणि पुढं म्हणाला, 'पण त्या माणसाला अजूनही पावपट पगारावरच काम करावं लागतं ना ?' अद्‌भुतचा चेहरा पडला. त्यानं होकारार्थी मान हलवली.

तेवढ्यात एक मध्यमवयीन बाई क्रॉस झाल्या. त्यांनीही हात केला. जेनिस

म्हणाला, 'आपल्या मॅरेज ब्यूरोच्या विंगमधला हा पहिला घटस्फोट ना ?'

'हो' अद्‌भुतनं कबूल केलं. 'पण तिची तक्रार नाही..'

'तक्रार नाही नव्हे. करून उपयोग नाही. कारण तुमची तशी काही जबाबदारी नाही. पण तिच्या नवऱ्याची संगत चांगली नव्हती, हेही तुम्ही सांगितलं नव्हतं. तसंच तिचं व्यंगही !'

अद्‌भुत म्हणाला, 'खरं आहे ! पण मी आता यात कुठं कुठं जबाबदार आहे ?'

'सध्या निदान दुसऱ्या बाजूच्या कमिशनपुरता..'

अद्‌भुत म्हणाला, 'आणि उपाय ?'

'बोलू आपण.. इथलं महामंदिर आलं... वाऽऽ.. प्रवचनही सुरू दिसतंय मंडपात... वाटलं तर थांबू.. तेवढाच बदल होईल.. मनाला शांती मिळेल...' जेनिस तो विषय तोडत म्हणाला.

अद्‌भुतची गाडी मंदिराच्या बाजूला कडेला थांबली. पण त्याला वाटलं की, 'हे शब्द आपण कुठंतरी पूर्वी ऐकले आहे की काय ?' पण फार ताण न घेता तिघंही खाली उतरली. शांतपणे दर्शनाकडं गेली. गाभारा प्रशस्त होता. बाहेर मोठी लाईनही होती. पण आत गाभाऱ्यात कडेला बसायला मार्बलचे कट्टे होते. तिघांनाही अद्‌भुतच्या ओळखीनं थेट आत प्रवेश मिळाला. ते एका कोपऱ्यात बसून राहिले.

अद्‌भुतच्या मनात आलं, इतक्या देवभक्तीनं एवढी माणसं बारीचे कष्ट घेऊन गाभाऱ्यात येऊन देवाच्या भेटीचा किती आनंद घेत असतील.. आपण मंदिर बांधण्यात जो पुढाकार घेतला, जो मोठा आर्थिक वाटा उचलला, त्याचं सार्थक होत असेल. निदान यानं तरी जेनिस खचितच खूष होईल. त्या अपेक्षेनं त्यानं पत्नीकडं पाहिलं, पण ती गंभीर दिसत होती. जेनिसच्या चेहऱ्यावर तर प्रतिक्रियाच नव्हती.आठ-दहा भक्त दर्शन घेऊन बाहेर पडताच,तिनं अद्‌भुतला खूण केली.तिघंही बाहेर पडले.

नाश्त्याची वेळ झाली. एका लॉन रेस्टॉरंटला गाडी थांबली. बाहेर एका कोपऱ्यातल्या, बाजूच्या अशा छत्रीखाली तीन खुर्च्यांवर तिघं विसावले. त्यांचा निवांत बसण्याचा बेत पाहून हॉटेलच्या वेटरनं, मालकानंही गडबड केली नाही. काही किरकोळ सूप वगैरे झालं. सरळ जेवायची ऑर्डर दिली. तीही सावकाश पाठवण्याची

सूचना दिली.

अद्‌भुतनं जेनिसला उत्सुकतेनं विचारलं, 'मंदिरात तरी तुम्हाला बरं वाटलं असेल ना ? शांतता वाटली ना ? भक्तांच्या दर्शनानं, भावानं तरी तुम्हाला आनंद दिला ना ?'

जेनिस म्हणाला, 'मी नेहमीच आनंदात असतो...' म्हणून त्यानं लीलाकडं पाहिलं.

लीलानं आत्ता मौन सोडलं. 'अद्‌भुत, ते जे तुला भक्त वाटले, म्हणजे तसे ते मलाही पूर्वी वाटत होते..पण काय कुणास ठाऊक, आज प्रत्येकानं डोकं टेकलं की यांनी - जेनिसनी- काय केलं होतं कुणास ठाऊक... प्रत्येकाची ओळख, म्हणणं कानांत ऐकू येई..'

'हे व्यापारी...उद्या मोठा सौदा आहे...आपल्या बाजूनं झाला तर एक लाख पेटीत टाकीन..'

'हे नेते...उद्या हायकमांड तिकीट देवो... न दिलं तर अपक्ष... पण सीट मिळू द्या देवा..'

'हे भाऊबंदकीवाले.. उद्या निकाल आहे.. देवा, सर्व व्यवस्था केली आहे.. लक्ष असू दे..'

'देवा...मॅनेजमेंट कोट्यातनं ॲडमिशन..'

'देवा...लग्न..'

'देवा...वाटण्या होऊदेत..वेगळं राहायचंय..'

'देवा...प्रमोशन..'

'देवा...नोकरी..'

'देवा...आमच्या पार्टीची सरशी नाही झाली तरी चालेल, पण त्यांचं पॅनेल पाडा..'

'देवा...एवढा घटस्फोट सुखरूप होऊ दे..'

'देवा...फॉरिनला जातोय...लांब आहे.. लक्ष ठेवा.. तिकडं आंदोलन आहे.. म्हणतात..'

अद्‌भुतनं शेवटी कानात हात घातले. म्हणाला, 'बासऽऽऽ' त्याला आठवलं.

त्याचेही एक गुरुमहाराज होते. त्यांनी सांगितलेलं काहीच न करता त्यानं गुरूंनाही एक कोटी धंद्याचं साकडं घातलं होतं !

लीला म्हणाली, 'हेच..हेच.. माझं झालं म्हणून मी उठले..!'

'जेनिस, काय करायचं आम्ही...? इतक्या गोष्टी आमच्या फर्ममार्फत केल्या. चांगल्यासाठीच केल्या. पाहून केल्या. आज तर एकांच्या ठरावयाद्या आहेत. दोन जिवांचं भलं होईल, या भावनेनं.. मॅच आहेत... माणसं चांगली आहेत. आता बोलणी झाली असतील. रात्री त्यांनीच पार्टीला बोलावलं आहे..'

'ठाऊक आहे. पण त्या 'चांगल्या माणसां'ची आता 'चांगली' बोलणी चालली आहेत. ती माणसं चांगलीच आहेत. घराणी चांगली आहेत. पण लोभ वाईट आहे. 'फक्त चांगली मुलगी पाहिजे. फक्त लग्न करून द्या', म्हणत आता ते कार्यालयात साखरपुडा, मानपान, सोनं फक्त तीस तोळे - अपेक्षा काहीच नाही... करीत करीत... मुलीच्या आईवडिलांच्या डोळ्यांसमोर आता तारे चमकताहेत... चांगलं स्थळ म्हणून कर्जाच्या खाईत पडायचं की, पुन्हा मुलीसाठी श्रीगणेशा करायचा... या पेचात आहेत...ती चांगली माणसं !...पण हेही नाही, यांच्या मुलाचं लग्न दोन वर्षांपूर्वीच झालं... यांनीही त्यांच्या प्रमाणावर हेच केलं होतं.. आता ही तरी चांगली माणसं... एवढी सुशिक्षित मुलं आहेत... जग सुधारायच्या गप्पा आहेत, काहींत कुवतही आहे पण पैसा म्हटलं की, लोभानं म्यांऊ म्याऊं करतात.. मोठ्यांनी तर मुलगा विकायलाच काढला आहे...नाव भले प्रतिष्ठेचं असो नि बोली चार भिंतींच्या आत असो...!' जेनिस शांतपणे म्हणाला.

अद्‌भुत थक्क होऊन ऐकत होता. हे खरं आहे का, विचारायचं त्याला धाडसही झालं नाही. कारण आत्ताचं काय असेल ते असो... इतर चांगल्या माणसांचा असा अनुभव त्यानं पूर्वी पाहिलाही होता...

आता हा भक्तिमार्ग...लीलाचं बोलणं त्याच्या कानांत अजूनही घुमत होतं. त्याशिवाय पुजाऱ्यांचीच काय, ज्योतिषांची काय, मध्यस्थांची काय, शिक्षणसंस्था- माल-दुकानं-औषधं-दवाखाने...आपण शाळेत प्रवेश मिळवून दिलेल्या विद्यार्थ्यांकडून परस्पर देणगी कशी घेतली गेली, इतकंच नव्हे तर, त्याच विद्यार्थ्यांना पुढं कॉपी प्रकरणात पकडण्यातही आलं होतं...कशाकशाचा विचार करायचा. आपण

एखाद्या भयपटात सापडल्यासारखा त्याचा चेहरा झाला होता. लीलाही गंभीर होती. शांत होता फक्त जेनिस !

'हताश होऊ नको अद्‌भुत. तुम्हा दोघांनाही चांगलंवाईट कळतं आहे. फक्त तुम्ही आत्ता पैशाच्या स्वाभाविक गरजेमुळं इतकी वर्षं फक्त तुमचा व्यवसाय पाहिला. व्यवसाय म्हणून चांगला आहे. थोडी काळाची गरजही आहे...' जेनिस.

'पण असं जर या साऱ्यांतून होत असेल तर आम्ही करायचं काय ? हा सारा उद्योग बंद करून टाकू. जाऊ दे ते कमिशन. माझं काही नडणार नाही. आहे एवढ्यावर सहज जगू शकतो आम्ही सर्व कुटुंब !...' अद्‌भुतला मार्ग दिसेना.

जेनिस पुन्हा तितक्याच शांतपणे म्हणाला, 'जरा थांब. अंधार असेल तर प्रकाश येईलच. कदाचित थोडा संधिकालही असेल. माणसं जन्मतः पशुवतच आहेत. फक्त जरा पुढचं व्हर्शन - आवृत्ती, आकृती. आपली विज्ञानयुगातली संगणकासारखीच जितकी पुढं जाल तितकी प्रगत पण कमकुवत, नाजुकही. संरक्षकव्यवस्था फार पक्क्या लागतात त्या प्रमाणात. जितकं आधीचं तितकं अप्रगत, कमी संहारक. पशूसारखं. वाघ खाईल पण किती खाईल. पोटापुरतं. पोट भरलं की, ढुंकून बघणार नाही. माणूस पुढचं व्हर्शन, प्रगत, अधिक संहारक. गंमत म्हणूनसुद्धा बैलांच्या जोड्यांच्या पायांत त्यांच्याच सणात फटाके लावीत होता. आता - प्रचंड संहारक - ज्याला त्याला जगाचा ताबा हवा आहे. मग ते जग आपल्या जोडीदारापुरतं असो, मूलसुनेपुरतं असो, संस्थेपुरतं असो, गावापुरतं, नाही तर देशापुरतं. दुसऱ्या देशांचा मिळाला तर अजूनच हवा आहे. माणूस अधिक प्रगत, संहारक - अन्नानं पोट भरत नाही तर, निर्दयपणे आपल्याच सजीव प्राणिमित्रांवर उलटेल, कापून, मारून खाईल. पुन्हा साठवून ठेवील. पैसा तर प्राण. किती खाल्ल्यानं पोट भरतं, ते अजून जगात कुठल्याच संशोधनानं सिद्ध झालं नाही... आपल्या वर्चस्वासाठी सुनेचे हाल करणं आणि वर्चस्वासाठी हातात आहेत म्हणून क्षेपणास्त्रं टाकण्याची धमकी देणं - यांत तत्त्वतः फरक नाही... म्हणून जन्मतः पशू.. मध्ये काहीच संस्कार झाले नाही.. पशुवत वागेल, दानव होईल... माणूस नाही.. देव तर नाहीच नाही...'

'मग आम्ही काय करावं...?'

'आजवर कसं चाललं आहे. मालकाला टर्नर हवा, टर्नरला काम हवं..

द्या जोडून..घ्या कमिशन..बेघराला घर हवं..घरवाल्याला गिऱ्हाईक हवं.. द्या जोडून.. घ्या कमिशन...मुलीला मुलगा हवा आहे... मुलाला मुलगी.. द्या गाठून...घ्या कमिशन... व्यवहारानं बरोबर आहे. थोडं अजून काम करा.. माणुसकीचं शिक्षण व्हायचं असेल त्यांचं, तर ते आधी द्या नि मग रवाना करा पुढं... माणूस म्हणून आकार दिसत असला तरी, आतली माणुसकीची मूर्ती घडवावी लागते... घरोघरी होत्या शाळा त्याच्या...आता पैशापाठी सवड नाही कुणाला... आणि खरं सांगायचं तर, या माणुसकीची ओळख नि गरज वाटेनाशी झाली...वाटतं, पैशानं मी काहीही करीन...काहीही मिळवीन... पशूसारखं माझं पोट भरलं नि चैन करून खाऊन सुस्त पडलो की संपलं काम... कुठल्याही मार्गानं का असेना, पैसा ओढून गडगंज झालो म्हणजे झालं...तेसुद्धा कमी कष्टांत झालं तर आणखीच बरं...आयती शिकार कुणी पशुसमोर आणून टाकली तर, चार पायांवर चार पावलं चालायचेही कष्ट नको म्हणतो तशी कळा आली आहे.. म्हणून नुसतीच गरजेनुसार माणसं इकडची तिकडं करू नका.. ती 'माणसं' आहेत ना पाहा... नसतील तर करा... तुमची कुवत आहे ती... तिला नेहमीच साथ असते निसर्गाची...ईश्वराची...!

'पण हे करणार कसं... शाळेला विद्यार्थी गाठून द्या पण सांगा, इथलं प्रशिक्षण करावं लागेल... विद्यार्थ्याला सारं समजवा... या रॅगिंगच्या भुतानं नि कॉपीच्या भस्मासुरानं आपलंच नुकसान आपण का करतो... समजा, आपलीच मुलं आहेत ती... तळमळीचीसुद्धा एक भाषा असते... ती दगडालाही कळते... त्यांना कळणार नाही ?.. समजावा.. म्हणावं, अभ्यास करून पास व्हा... कष्टानं पास व्हा...कष्ट केलेला जर नापास झाला तर आम्ही फी भरू...पण कॉपीला स्पर्श करणार नाही... कॉपी नि डोपिंग करून मिळवलेली पदकं चिखलात फेकून देण्याच्या लायकीची आहेत, हे म्हणण्याएवढं धाडस येईपर्यंत शिकवा... पाहू, किती मुलांची फी तुम्हाला भरावी लागते...

'त्याच वेळेला शाळेलाही सांगा ठणकावून... शिक्षणाचा खर्च पै न् पै घ्या... पण पैसे उकळू नका... गरज पडली तर आम्ही देणगी मिळवून देऊ... खर्च भागवू.. नाही तर शाळेवर बहिष्कार टाकू... पैसा उकळायचं माध्यम नाही ते.. माणूस घडवण्याचं पवित्र मंदिर आहे...मूर्तीच्या कवच्या उडतात, टवके उडतात पण

शिक्षकांनाही टाकीचे घाव घालताना हादरे सोसावे लागतात... हाताला घट्टे पडतात.. चांगल्यासाठी आहे हे सारं... आपल्याला हे जग निसर्गानं दिलं, ते 'माणसं' पाहिजेत म्हणून दिलं.. 'अधिक माणसं', 'खरी माणसं!'

'विवाहाच्या खऱ्या गरजा, अगदी सगळ्यांचा मान राखून तुमच्यासमोर ठरवा... माणुसकीला तयार असतील, त्यांचीच लग्न ठरवा... असल्या लोभाच्या पशूंची नि एकेक पत्ता पुढं टाकणाऱ्या बेदरकार जुगारी पशूंची कशाला ठरवता...तशीच द्या जाहिरात... जाऊदेत दहाऐवजी पाच जमतील...पण तुम्हाला कमी पडणार नाहीच पण खरे, प्रेमळ, समजूतदार जोडीदार तयार होतील... सद्गुणी मुलांची पिढी पुढं येईल..!

'तुमच्याकडं तर प्रेमविवाहाचे लोक येतात.. त्यांना म्हणावं.. आज तुम्हाला प्रेम वाटतं, त्यांतलं आकर्षण तुम्ही ओळखू शकाल, ते ओळखाच.. पण आज तुम्ही पहिल्या भेटीपासून एकमेकांच्या जमणाऱ्या गोष्टींचीच यादी करता आहात. ती खूप मोठी झाली म्हणून तुम्हाला वाटतं आहे - आपण सुयोग्य जोडीदार आहोत. असालही. फक्त या नादात राहिलेली न जमणाऱ्या, एकमेकांच्या एकमेकांना न आवडणाऱ्या गोष्टींची यादी करा. त्या गोष्टींना तुम्हाला रोज तोंड द्यायचं आहे... कितपत कसं देऊ शकाल.. खात्री वाटली की, तेही देऊ शकू किंवा नावडतं समर्थपणे टाळू शकू तर पुढं जा... अन्यथा काय वाढून ठेवलं आहे, ते सांगा.. कारण नंतर तो अनेकांचा प्रश्न होतो... समाजाच्या स्वास्थ्यावर ते येतं... त्यासाठीही फार करायचं नाहीच आहे फक्त त्यांना माणूस होऊ देत...!

'टर्नरला, फिटरला, क्लार्कला नोकरीच्या जागी पाठवा, पण प्रशिक्षणानंतर. आत जाताना, आज गरज असताना पहिल्या दिवशीची कृतज्ञता शेवटपर्यंत कशी टिकवावी, का टिकवावी, हे सांगून द्या..कायम होणं म्हणजे बेफिकीर होणं नव्हे, उलट अधिक जबाबदार कामगार होणं, हे लक्षात ठेवा.. माणसं आहेत अन्याय होऊ शकतो, पण तो निदर्शनाला आणा, न्याय आणि क्षमा जरूर जाग्या ठेवा.. कंपनीच कशी चालते बघतो - असले पशू होऊ नका... माणूस पाहिजे व्हायला... कंपनी जिवंत राहील, तुम्हीही राहाल, तुमची मुलंबाळंही राहातील... तेच नोकरांची मागणी करणाऱ्या मालकांना शिकवा...नोकरांना माणूस म्हणून वागवा.. फायदा जरूर वाढवा..

पण पिळवणुकीनं नको.. उत्पादकता वाढून..फायद्याचे ते साक्षीदारच नव्हे, प्रेमळ जबाबदार भागीदार आहेत... हे ध्यानी ठेवून... त्यांचा तो वाटा त्यांना द्या.. तर कामगार देतो ! नुसते कामगार नव्हे, 'माणसं' देतो म्हणावं आम्ही..!

'मॅनेजरना आणि ऑफिसर्सना सांगा की, क्लार्क न् शिपाई म्हणजे पालापाचोळा नव्हे. ते कामाचा प्राथमिक आधार आहेत आणि क्लार्कना आणि शिपायांनाही हे बजावा की, मॅनेजरना आणि ऑफिसर्सना किरकोळीत काढू नका. त्यांच्या खुर्च्यांना काटे असतात आणि त्यावर बसल्याशिवाय ते कसे टोचतात, ते कळत नाही, याची जाणीव ठेवा...!'

अद्‌भुतसमोर कामाचा पट उलगडत होता. आव्हान होतंच, पण आता त्याला दिशाही होती. त्याची आणि लीलाची सारी कल्पकता नि कर्तृत्व कामाला लागलं तर, त्यांच्या 'एनी' प्लेसमेंटला 'ह्यूमन' प्लेसमेंट 'माणसांची खाण' बनवणं अवघड नव्हतं. 'पाहिजेत... माणूस असलेले टर्नर, फिटर...' 'आपण अर्ज करू नयेत... जर आपण नोकरीच्या शोधात असाल अनुभवी टर्नर, फिटर असाल,पण समजूतदार माणुसकीचं प्रशिक्षण घेऊन त्यात उत्तीर्ण होऊ इच्छीत नसाल तर अर्ज करू नयेत...' अद्‌भुतचं डोकं काम करू लागलं. अखेर तो बुद्धिमान, प्रतिभावान, यशस्वी उद्योजक होता. आता कामाची विधायक दिशा कळली होती..

जेनिस म्हणाला, '..बरोबर.. जा, असेच जा, अजून विचार करीत जा... वाईटाला वाटा असतील तर चांगल्यालाही वाटा असतीलच आणि राहाता राहिला पैसा. तुमच्याकडचा पैसा आजपासूनचा सारा या माणुसकीच्या प्रशिक्षणावर घाला नि तो येणं कमी झालं तरी तुम्हाला कमी पडणार नाही. आहे तो तुमचा तुम्हाला पुरणारच. लक्ष्यच ठेवणार असाल तर, आता तरी कोटींचं नको. माणसांचं ठेवा.. किती माणूस माणूस नव्हते अन् तुम्हाला मनापासून कष्ट घेत त्यांना माणूस बनवता आले आणि कुणा कंपनीच्या, शाळेच्या, कुटुंबाच्या स्वास्थ्यासाठी पुरवता आले त्यांचं लक्ष्य ठेवा..हे पैशाचं फार विधायक दान होईल..'

'अलबत्, आता ते कोटी रुपयांचं टार्गेट कधीच पुसलं गेलं डोक्यातून. मला माझ्या गुरूंकडंही आता त्यातलं काहीच मागायचं नाही.द्यायचं तर - या कामात यश द्या - म्हणेन. मला त्यासाठी आता त्या भक्तांसारखं रांगेत उभं राहायचीही गरज

नाही. काम करता करताच माझी गुरुपूजा नि प्रार्थना होऊन जाईल. प्रत्येक 'माणसा'गणिक माझ्या गुरूंची सेवा होईल.'

'मी आहे मदतीला. अहो, आपण आपल्या मुलाला माणुसकीचे संस्कार दिले. त्यामुळं त्याची आज काळजी नाही. तो जिथं आहे, तिथंही प्रश्न बनला नाही. विधायक काम करतो आहे. तिथले लोक नाही का आपल्याला मनापासून धन्यवाद देत. तेच काम आता सर्वांसाठी..!' लीला उद्‌गारली.

'असा विचार केला ना, तर मलाही वाटतं, आपण मिळवलं आहे ते खूप आहे आपल्याला. पुढं अगदी बिनपैशाचं काम केलं तरी नडणार नाही...' अद्‌भुतचा मेंदू आता विलक्षण वेगानं पळू लागला होता. तेवढ्यात त्याला वाटलं, पण आज ही दृष्टी कुणामुळं आली ?

'जेनिस ! सगळं पटलं... पण आज कशामुळं... जेनिसमुळं...!' त्यानं थोड्या भावुक स्वरात जेनिसला विचारलं, 'पण आमच्यासारखे नुसते असं यंत्रासारखं नि ठोकळ्यासारखं काम करीत पैशासाठी पळणारे लोक थांबवायला...जेनिस हवेत...जेनिस..!'

पण जेनिससारखं काहीतरी वाचल्यासारखं त्याला वाटलं. बरोबर. त्यानं विमानात समोर ठेवलेलं मासिक वाचलं होतं. त्यात थोर ग्रीक तत्त्वज्ञ डायोजेनिसची गोष्ट होती. तो एकटा दिवसा हातात कंदील घेऊन रस्त्यानं निघाला होता. तो प्रसिद्ध होता. त्यामुळं दिवसाढवळ्या कंदील घेऊन काही शोधत रस्त्यानं जाताना पाहून एकानं विचारलं, 'आत्ता तर रात्र नाही. आपण काय शोधता आहात ?' तो म्हणाला, 'मी माणूस शोधतो आहे !' त्यावर त्या माणसाला तो विक्षिप्तपणा वाटून त्यानं विचारलं, 'ही इतकी रस्त्यानं माणसंच चालली आहेत की !' एव्हाना गर्दी जमली. त्यानं प्रत्येकाजवळ कंदील नेऊन पहात विचारलं, 'खरं सांगा, तुम्ही माणूस आहात का ? अनावर क्रोधी, स्वार्थी, मतलबी, अहंकारी, लोभी, मत्सरी... असे कितीतरी पशू मला दिसताहेत. मी माणूस शोधतो आहे. मला माणूस पाहिजेत... हे जीवन सुंदर बनवायला, सुखी बनवायला माणूस पाहिजेत. हे दिसतात ते नको ! माणूस पाहिजेत..!..' डायोजेनिसनं माणसांना विचार करायलाही लावलं आणि अनेकांना खऱ्या माणसांत बदलवलंही !

अद्‌भुतनं 'जेनिस'कडं पुन्हा एकदा निरखून पाहिलं. तो त्याला थोडा तसा वाटत होता. पण हा विषय कसा काढावा, ते त्याच्या लक्षात येईना. जेनिसनंच त्याची त्यातून सुटका केली. तो म्हणाला, 'तुम्हाला मी म्हणतो ते पटलं आहे ना ? आता तुमच्या मनात विचार येतात ते बरोबर आहेत. पण ते आपण बाजूला ठेवू ना ! डायोजेनिस कशाला हवा ? तुमच्या प्रत्येकाच्या मानवी हृदयात, मनात डायोजेनिस आहेच. तो सतत सिग्नल देतो आहे. प्रपंचाच्या, पैशाच्या आणि देहसुखांच्या डांगोऱ्यात त्याची हाक ऐकू येत नाही, त्याचे सिग्नल अनेकांपर्यंत पोचत नाहीत. पण सारं जग काही असं नाही. त्यातही अशी खूप खरी माणसं आहेत, ती कामं करताहेत. खऱ्या अर्थानं करताहेत. म्हणून तर माणुसकीचं दर्शन आजही कुठंही होऊ शकतं आहे. फक्त ते क्वचित दिसतं. त्याचं प्रमाण कमी झालं म्हणजे निसर्गच हृदयातल्या डायोजेनिसला साद घालतो. तो प्रकट होतो. काम करतो. आपल्यासारखी अजून बरीच माणसं निर्माण करून.. माणुसकीचा ढासळलेला तोल सावरून जातो...!'

'पण अशी दुसऱ्या माणसाला माणुसकीची हाक कशी पोचेल..?'अद्‌भुतनं विचारलं.

'का नाही पोचणार ? तुम्हाला तर पोचली..पण..' लीलाकडं बोट करून जेनिस म्हणाला, 'यांना पण नाही का पोचली...? न पोचली तर तुम्ही द्या.. ती पोचेल..मी तर केव्हाही, कुणाच्याही हृदयात बसलोच आहे... गरज पडली तरीही येतो.. हाक दिली तरीही येतो...!'

लीलानं प्रफुल्लित चेहऱ्यानं, 'हो, मला हाक पोचली !' म्हटलं.

अद्‌भुत म्हणाला, 'मग बस्स... आता काम सुरू...फक्त एवढी जाग आणि दिशा देणाऱ्या जेनिसचे आपण दोघंही आभार मानू...'

छत्रीखालच्या जेनिसच्या खुर्चीकडं ते वळले. खुर्ची रिकामी होती !

अद्‌भुतला एकदम धक्का बसला ! जेनिस अंतर्धान पावल्याचा !

तो धक्का खरा होता!पण तो जेनिस अंतर्धान पावल्याचा नव्हता !! विमान जमिनीला टेकताना बसणारा तो लॅंडिंग जर्क होता, उतरतानाचा धक्का होता! अद्‌भुत जागा झाला. त्याच्या लक्षात आलं. त्या थोड्याश्या डुलकीतलं ते स्वप्न...पण ते दुसऱ्या अर्थानं स्वप्न नव्हतं.. भावी कृतीचा आराखडा होता. त्याच्यातल्या आत्मतत्त्वानं..

डायोजेनिसनं प्रकट होऊन आखलेला...आता तो खऱ्या अर्थानं जागा झाला होता...

'एनी प्लेसमेंट' नाही फक्त 'ह्यूमन प्लेसमेंटच !'

विमानतळावरून तो बाहेर पडला. टॅक्सीत बसण्यापूर्वी त्यानं लीलाला फोन केला, 'मी अद्‌भुत. आत्ताच पोचतोय, येतोच आहे.'

'पण लवकरात लवकर घरी ये...!' लीला.

'हो. अगदी पोचल्यापोचल्या घरीच निघालो आहे ! का ? काही विशेष?'

'विशेष ?... घरी आल्यावर सांगते ! अद्‌भुतच आहे घडलेलं सगळं. आणि ते खरंही आहे...आपली जीवनाची दिशाच बदलतेय, असं वाटतंय मला...!'

'का ? डायोजेनिस का ?' अद्‌भुतनं त्याच हरखलेल्या स्वरात विचारलं.

'..तुला काय ठाऊक...?' लीलानं विचारलं.

'तुझ्यासारखंच.. सांगतो आल्यावर...! पण भाग्य आहे खरं आपलं ! पाहिजेत...पण माणसं पाहिजेत... माणूस म्हणून वागायला तयार असलेल्या लोकांनीच किंवा त्याचं प्रशिक्षण पूर्ण करू इच्छिणाऱ्यांनीच अर्ज करावेत... असंच ना..?' अद्‌भुत.

लीला हर्षानं म्हणाली, 'करेक्ट..! हेच बोलणं झालं ! आता आपले सारे कष्ट आणि आपली प्लेसमेंट चालेल ती तेवढ्यासाठीच. माणसं तर पूर्वीही पाहिजे होतीच. आताही ती पाहिजेतच...पण...!'

*

१२. 'घातक मालमत्ता !'

आपापल्या कर्तृत्वाविषयी, मालमत्तांविषयी अनेकांना मोठा अभिमान असतो. ते एखाद्या घरगुती स्वरूपाचं - कुठं घर बांधलं, कुठं जमीन घेतली, नोकरी केली, मुलांचं संगोपन केलं, त्यांना उत्तम शिकवलं, स्वतः काही करियर केली, काही गाणं शिकलं, कुठली कला शिकली, घरात उत्तम बाग लावली - असलं काही असलं तर, त्याचं त्यांना स्वतःला आतून कौतुक वाटतं. इतकंच नाही तर, प्रसंगोपात् ते इतरांनीही करावं, असंही त्यांना मनोमन वाटतं. हे एकवेळ ठीक आहे. 'आता काही तरी करायचं ठरवलंय' असे संकल्प मधूनमधून म्हणणाऱ्या आणि काही न करणाऱ्यांपेक्षा हे नक्की बरं. कोणतं कर्तृत्व न करता केवळ जगून दाखवून, सहस्रचंद्रदर्शन वगैरे कुणी करण्याची अपेक्षा बाळगणाऱ्यांपेक्षा, हे लोक बरे. वैयक्तिक कर्तृत्व तरी त्यांच्या खाती जमा असतात. या त्यांच्या कौतुकाच्या वैयक्तिक मालमत्ता.

हे सारं झालं, त्या मानानं चांगल्या स्वरूपाच्या कर्तृत्व नि त्या अर्थानं वैयक्तिक मालमत्तांचं. पण आपल्या हे लक्षात आलं असेलच की, काही माणसांकडं काही घातक मालमत्ता असतात. आश्चर्य आणि विचार करण्यासारखं हे आहे की, अशाही कर्तृत्व नि मालमत्तांचा माणसांना अभिमान वाटतो, कर्तृत्व वाटतं. एखाद्याकडं एखादं शस्त्रास्त्र असावं, त्यानं ते जपून बाळगावं आणि त्याचं कौतुक मिरवावं. इतकंच नव्हे तर, इतरांनी ते करावं, असंही त्यांना वाटतं. त्यातही होतं काय की, ती मालमत्ता मुळातच घातक, शस्त्रास्त्रांसारखी असल्यानं इतरांना दबाव देऊनच ते त्याचं कौतुक करून घेतात. नव्हे करावं लागतं. एका अर्थानं हा बालिशपणा असला तरी, अलीकडं एका अशा धोकादायक मालमत्तेबद्दल अनेक जण गैरसमजानं अभिमान बाळगतात, असं आपल्याला आढळेल. ती मालमत्ता म्हणजे 'राग !'

ही तशी सहज असणारी मानवी प्रवृत्ती वगैरे वाटते. माणसाला अनेक गोष्टी-भाव-भावना दिसतात. त्यात लोभ, काम, इच्छा, असूया - अशा अनेक. त्यातच ती एक आहे, हे खरं. पण जसं काही व्यसनांच्या बाबतीत आढळतं, तसं याबद्दल झालं आहे, असं लक्षात येईल. पूर्वीही व्यसनं मुळीच नव्हती, असं नाही. पण एक तर प्रमाण कमी होतं आणि त्याहीपेक्षा विशेष म्हणजे ती कौतुकाचा विषय

नव्हती. मद्यपान होतं पण ते लपून-चोरून करण्याचा विषय होता. कधी तरी करायचा. त्यातही आपण काही तरी अपराध करतो आहोत, असं करणाऱ्याला वाटे. त्या माणसाकडं थोडं तुच्छतेनं किंवा वाईट म्हणून पाहिलं जायचं, कमी लेखलं जायचं.

पुढं पाश्चात्य संस्कृतीचं आक्रमण झालं. पैशाची काही उच्चभ्रू वर्गात सुबत्ता आली. चैन-चंगळ आली. त्यात या घरंदारं उद्ध्वस्त करणाऱ्या व्यसनाला अगदी अन्नपाण्याची प्रतिष्ठा आली. करणाऱ्यालाही चुकीचं वाटेना. उलट न करणारा आता अपराधी भावनेनं वागायला लागला. करणारे आपण जणू काही एखादी मर्दुमकी करतो आहोत, अशा तऱ्हेनं ही मद्यपानाची सवय म्हणजे कौतुकाची मालमत्ता समजायला लागले. इतर अनेक माणसं आता या प्रभावाखाली येऊन अशा माणसांना व्यसनी, वाईट न समजता प्रतिष्ठित समजायला लागली. एक घातक मालमत्ता - सवय कौतुकाची झाली, प्रतिष्ठेची झाली.

तीच अवस्था अलीकडं नकळत एका प्रवृत्तीची झाली. ती म्हणजे वर म्हटलेला राग. माणसाच्या अंतर्गत मालमत्तांपैकी ती एक त्याज्य प्रवृत्ती हा दर्जा जाऊन, आता उलट असं आढळतं की, लोक कौतुकानं सांगतात की, 'माझा राग फार वाईट आहे.' तो माणूसही रागाच्या भरात त्याच्यात्याच्या उपद्रवक्षमतेनुसार अपशब्द बोलण्यापासून एखाद्याला जिवानिशी मारण्यापर्यंत काहीही करतो, असं आढळतं. या दुर्दैवी अनुभवांमुळं, बाकीचे लोक आधी म्हटलं तसं एखादं शस्त्र बाळगणाऱ्याबद्दल, भीतीयुक्त का असेना, पण आदरानं पाहायला लागतात.

आणखी एक गोष्ट आढळेल, काहींवर रागाचासुद्धा मोठ्या माणसांकडून एक संस्कार होतो. रागावणाऱ्या अशा मोठ्या माणसांबद्दल एक दरारा लोकांना वाटतो, असं त्यांना आढळतं. त्यामुळं असा राग आपणही बाळगला तर, आपलाही दरारा वाढेल, वचक वाढेल, असा त्यांचा अर्थातच, चुकीचा समज होतो. कारण असला दरारा खरं तर पोकळ असतो. असा रागावणारा मनुष्य, किती मोठा असला तरी तो, आतून कुणालाच आवडत नसतो. इतर माणसं, जी त्यांचा राग जपायचा प्रयत्न करतात, तीसुद्धा केवळ त्या रागापासून होणाऱ्या हानी टाळण्यासाठी ते करतात, हे लक्षात आलं तर, असा समज टाळता येईल आणि हा संस्कारही टाळता येईल. अशा तऱ्हेनं संस्कारानं निर्माण होणारा राग आपल्याला टाळता येईल.

या रागाला वय, स्थान - असा कुठला धरबंध नाही. पूर्वीही राग नव्हता, असं नाही. एखादा माणूस रागीट म्हणून गावात प्रसिद्ध असे. पण त्याचं भांडवल नव्हतं. त्याला प्रतिष्ठा तर अजिबात नव्हती. त्यातही पूर्वी खूप अनुभवी, वयस्कर माणूस असला, लहानानं एखादी चूक केली तर तो रास्तपणे रागावे. त्याच्या रागावण्यालाही काही सभ्य पद्धती असत. त्यामागं त्याचा अनुभव, वय, रागावण्याची गरज, त्याचाही एक अधिकार होता-तो गरजेचाच होता. पण आता तसं राहिलं नाही. सर्वसाधारण प्रवृत्तीच रागाला प्रतिष्ठा आणणारी झाली. म्हाताऱ्यांनाही राग सहन होत नाही, सासूलाही नाही, सुनेलाही नाही - इतकंच नव्हे, तरुणालाही नाही. आपल्या अपेक्षा तातडीनं पुऱ्या झाल्या पाहिजेत, या अलीकडं फोफावलेल्या प्रवृत्तीनंही रागाला उत्तेजन मिळत चाललं आहे. आईच्या काही सांगण्यानं, सातत्यानं रागावलेला तरुण आता नवीन राहिला नाही. पिढीचं अंतर, मतभेद असणार. पण आईचा, बाबांचाही मान होता. लहानांनी तोच तरुणांबद्दल दाखवायचा होता. आपल्याला राग वाटला तरी, ती आवरायची वस्तू होती.

आता ती वस्तू त्याज्य, लाज वाटण्यासारखी नाही, मिरवण्याची वस्तू झाली. मनाविरुद्ध झालं की, लहानांनी, तरुणांनीही शब्दाला शब्द करणं, आदळआपट करणंच नव्हे तर, तो राग आता नियंत्रणाबाहेर जाऊन घरातून ऑफिसला, कॉलेजला जातानासुद्धा त्या बिचाऱ्या बाईकला दाणदाण किक मारून तितक्याच रागात ती एकदम भीतीदायक वेगात घेऊन जाणं आता कॉमन झालं. त्यामुळं घरातल्या माणसांना लागणारी काळजी. इतकंच नव्हे तर, तशा प्रत्यक्ष काही दुर्घटना, हेही आपण वाचलं असेल.

या रागाची किती विविध रूपं आपण पाहिली असतील. मनाविरुद्ध एखादी गोष्ट दिसते, घडते. तिचं स्वरूपही लहानसर असतं. तशी मनात उमटणारी रागाची रेषाही लहानसर. परिणामही लहानसा असतो. कपाळावर उमटून जाणाऱ्या लहानशा आठीसारखा. तोवर ती गोष्ट निरुपद्रवी वाटते. स्वतःच्या काय किंवा इतरांच्या काय रागावर पूर्वी कधी फारसा विचारही करावा लागत नसे. कुणीतरीच एखादे दुर्वास. पण एकतर, ते एकीकडं तपोमूर्तीही होते आणि मग दुसरीकडं ही घातक वस्तू आटोक्यात न ठेवू शकणारे.पण त्यांच्याही रागाच्या परिणामानं त्यांच्या तपाची होळी

झालेली आपण पाहिली आहे, ऐकली आहे.

म्हणजे पूर्वी तो कमी प्रमाणात असेल, पण स्वरूप घातक मालमत्तेचंच होतं. विशेषतः सात्त्विक माणसांनाही चकवून त्यांच्या मनात घर करणारा, हा राग. त्यामुळं वाईट वस्तू ती वाईटच आहे. मुळातच रागाचं मूळ एखाद्या वडाच्या किंवा पिंपळाच्या मुळांसारखं सत्त्वाच्या उंच होत जाणाऱ्या मंदिराखाली कधी सहज दिसत नाही. वाढतं आहे, याची कल्पनाही येत नाही. पण अशा झाडाची मुळी शेजारच्या कित्येक फूट अंतरावरच्या प्लॉटमध्ये खणताना त्या घराच्या पायाखाली वाढलेली-पोचलेली सापडावी, तसं हे रागाचं मूळ-अहंकाराचं असतं. त्यामुळं ते नकळत अन् शक्यतो जमिनीखालील, मनाच्या तळाशीच वाढतं. कळतही नाही. वाटतं, तपश्चर्या वाढते आहे, बुडाशी सावध नसलं, तर तिकडं तितकाच अहंकार वाढत असतो. मग तपश्चर्येला कुणी आव्हान दिलं, नाकारलं की, अहंकार रागाचा फणा काढतो, नव्हे, दंश करायला तयार होतो. त्यातही अहंकाराला समर्थन नावाचा सख्खा धाकटा भाऊ असतो. तो मदतीला येतो. तो, तोच त्याज्य राग, कसा बरोबर आहे, हे सांगून घात करायला कमी करीत नाही. ही भाऊबंदकी आहे, हे लक्षात न आल्यानं, अखेर ती रागाची, कौतुकाची वाटणारी मालमत्ता आपलाच बळी घेऊन जाते.

पूर्वी निदान हे सारे अपवाद होते. आता तो नियम वाटावा इतकी रागाची व्याप्ती वाढली आहे. ती चिंताजनक आहे. कारण इतर अनर्थ घडवायची शक्ती या रागाच्या मालमत्तेत आहे. विद्यार्थ्याला अमानुष अशी काही शिक्षा करू नये, हे खरं.पण त्याला वाईट प्रवृत्तीबद्दल हितबुद्धीनंसुद्धा रागावण्याची सोय राहिली नाही. मुलांचं शाळेत चुकलं म्हणून त्याला शिक्षा झाली आणि ते घरी कळलं तर शाळेच्या शिस्तीला पूरक म्हणून पुन्हा घरी शिक्षा व्हायची. पण आता मुलांची चूक असली तरी शिक्षेचा मुलांना राग येतोच पण आमच्या मुलाला शिक्षा का केली, याचा राग पालकांना येतो आणि त्याचा जाब विचारायला, नव्हे शिक्षकांवर अक्षरशः कोणत्याही पद्धतीनं राग काढायला पालक हजर होतात, हे दृश्य नवीन नाही.

या रागानंच पूर्वी सुनांचे छळ झाले. अगदी त्या आयुष्यभर न विसरतील एवढेही. पण सुना तेव्हाही त्यातून शिकल्या नाहीत की - हा राग मुळात योग्य आहे का ? उलट त्याचं उट्टं पिढ्यान्पिढ्या पुढच्या सुनांवर निघालंच. ही परंपरागत घातक

मालमत्ता इतर इस्टेटींसारखी वाढतच चालली आहे. इतर इस्टेटी उधळून खलास तरी होतात. पण ही इस्टेट मोठी विचित्र नि घातक आहे. जो उधळेल त्याची वाढतेच आणि ज्यांच्यावर उधळू त्यांच्या रागाची इस्टेटही वाढते.

आधीच मनाच्या शेतीत लागवड न करता येणारं हे पीक. त्यात कुणी अशी उधळून, बेजबाबदार पेरणी केली तर रागाचं पीक उदंड न आलं तरच नवल ! आता ते इतकं आलं की, प्रत्येकाच्या मूलभूत हक्कांत आता घटनेतही कुठं 'रागावण्याचा' हक्क घातला आहे की काय, असं वाटावं एवढी घरातली लहानसहान भावंडं, मित्रमित्र, मैत्रिणीमैत्रिणी, मित्रमैत्रिणी, आईवडील, वडीलमुलगा, आईमुलगी - कुठल्याही नात्यांत आता हे रागाचं घातक पीक, नको इतक्या जोमानं येत आहे.

ही मालमत्ता घातक असली, वैयक्तिक असली तरी, तिची अभिव्यक्ती नि परिणाम हे महाघातक आहेत. त्यातही काळानं, विज्ञानानं दिलेल्या साधनांच्या गैरवापरानं त्या अभिव्यक्तीचे परिणाम आता साधे नाहीत, भयानक आहेत. दुष्परिणाम म्हणण्यापलीकडचे आहेत. एकतर्फी प्रेमाला नकार देणाऱ्या मुलीला त्या तथाकथित मित्राकडून पूर्वी अबोला, संबंध तुटणं - इतपतच परिणाम सोसायला लागत. आता रागाच्या भरात ॲसिडनं विद्रूप व्हावं लागल्याच्या आणि त्यामुळं आयुष्य उद्ध्वस्त झाल्याच्या घटना किती शहरांत घडताना दिसतात ! रागातून पुढं फसवणुकीनं घडणारे अत्याचार, हेही भयाण परिणाम आता किती ठिकाणी आढळतात. तेव्हा या रागावर विचार करण्याची गरज किती गंभीर झाली आहे, हे लक्षात येईल.

आपण आठवत जाल अशी अनेक चित्रं आपल्या डोळ्यांसमोर येतील. साधी गाडी मागं टाकून मागची गाडी पुढं गेली तर, ओव्हरटेक करणाऱ्या गाडीवानाला रागाच्या भरात पुन्हा त्याच्यापुढं गाडी घालून मारहाण होते - हे दृश्य आपल्याला आठवत नाही ? व्यसनाला विरोध करणाऱ्या पत्नीच्या डोक्यात झोपल्यावर दगड घालून खून करणारे पती आठवत नाहीत ? वार्षिक साधारण सभेच्या किंवा लोकप्रतिनिधींच्या सभेसारख्या सामाजिकदृष्ट्या गांभीर्याच्या आणि कामकाजांच्या प्रसंगी - वैयक्तिक रागानं हमरीतुमरीवर येऊन नुसते अपशब्दच नव्हे तर, खुर्च्या-पेपरवेट-चपला यांची फेकाफेक आठवत नाही ?

या बेलगाम मालमत्तेचं अलीकडचं आणखी एक घातक स्वरूप म्हणजे

विस्कटले जाणारे किंवा मांडले न जाणारे प्रपंच. कधी घरी उशिरा येण्यावरून, कुणाच्या टीव्ही पाहण्यावरून, कुणाच्या नेटच्या वापरावरून, कुणाला अवेळी येण्याऱ्या ऑफिसच्या किंवा कंपनीच्या फोनवरून, अनेकदा फोन न करण्यावरून तर अनेकदा फोन न घेण्यावरून, दुसऱ्याला मान मिळण्यावरून, जेवणातल्या न जमलेल्या पदार्थावरून, श्रेय दिलं जाण्यावरून, कुणी काही कुठला शब्द वापरला म्हणून - कुठल्याही किरकोळ काडीनंसुद्धा पतीचा किंवा पत्नीचा भडका उडतो. त्यात पैशाचा दोघांनाही वाटणारा आधार. मिळवतेपण. त्यामुळं पुढची उत्तरं-दुरुत्तरं-वाद विकोपाला जातात. वारंवार खटके, दुसऱ्याला शोधूनशोधून दोष देणं, अखेर घटस्फोटासारखे आततायी निष्कर्ष. आज आपल्याला कल्पना नसेल इतक्या खटल्यांची भर या त्वरित भडकणाऱ्या रागाच्या मालमत्तेनं घटस्फोटांच्या रूपानं घातली आहे. कित्येक कुटुंब-न्यायाधीश ग्रासले आहेत. शिवाय अनेक संसार तुटून दोन्ही कुटुंबात, संबंधितांत प्रश्न उद्‌भवत आहेत, ते वेगळेच. न्यायाधीश - सहा महिने थांबा, मोठ्यांचा विचार घ्या - वगैरे सल्ले देतात. पण ज्यांच्याकडून शिकावं, असे काही 'अक्रोधमूर्ती', शांत, समजूतदार मोठे पालक तरी त्यांनी घरी कुठून आणायचे ? तेही याच 'जलदगती रागमार्गा'वरचे प्रवासीच !

काही वेळा अनेक वर्षं चांगले, समजूतदार संबंध असलेली माणसं एखाद्या न पटणाऱ्या निर्णयावरून, एखाद्या शब्दावरून रागाचे बळी ठरतात. अनेक वर्षांचे चांगले संबंध हे रागाचं घातक शस्त्र अविचारीपणे तोडून टाकतात. राग डोक्यावर इतका स्वार होतो की, दुसऱ्याची बाजू निदान ऐकून घेण्याचं सौजन्यसुद्धा तो राग त्या व्यक्तीला दाखवू देत नाही. एवढी ही घातक आणि नुकसानकारक मालमत्ता !

वाईट हे की, आपल्याला मुळात राग येतो, शिवाय आपण पटकन भडकतो हा व्यसनासारखा अप्रतिष्ठित, लपवायचा विषय राहिला नसून उलट कौतुकानं मालमत्तेसारखा वागवला जातो, हा नव्या काळातला बदल गंभीर आहे. हानिकारक आहे. ती कौतुकाची नि मिरवण्याची गोष्ट नसून, अभ्यासानं कमी करण्याचा, टाळण्याचा विषय आहे. तो गुणांच्या यादीत कधीच नव्हता, नाही. विकारांच्या नि दुर्गुणांच्याच यादीत आहे.

खरं तर, रागावर लहानपणापासूनच फारसं चिंतनच कधी होत नाही. एखादं

रागीट मूल आहे म्हटलं की, आजाऱ्याला जपावं तसं त्याला राग येईल असं न करण्याकडंच इतरांचा कल असतो. वास्तविक तो विकार आहे, आजार आहे तर, त्यावर औषधपाणी करून तो आटोक्यात आणणं, नाहीसं करणं - हा खरा चिंतनाचा विषय बनायला हवा ना ? ज्यानं आजार वाढतो, असे पदार्थ आपण आजाऱ्याला पुरवतो का ? उलट ज्यानं आजार बरा होईल असं अन्न, औषध, पथ्य आपण सांभाळतो - तर मनुष्य त्यातून बरा होतो. तेच रागाच्या आजाराचं नाही का ?

अर्थात रागाचे दुष्परिणाम सगळ्यांनाच जाणवत नाहीत, असं नाही. काहींना त्यामुळं झालेली नुकसानं कळतात, पण त्याला आवर कसा घालावा, हे कळत नाही - असंही आहे. त्यासाठी कायकाय करता येईल, त्याचा विचार करूया. प्रथम 'राग येणं' ही प्रकृती नव्हे, विकार आहे - इथंपासून सुरुवात करायला हवी. राग येतो तो सर्वसाधारणपणे मनासारखं झालं नाही की ! हे मन आदर्श कुठं आहे की, त्याच्यासारखं घडवण्यासाठी आपण धडपडावं नि ते होत नाही म्हणून रागवावं ?

हे समजून घेण्याची गरज आहे की, काही संस्कार, आठवणी, आवडीनिवडी, हवेनकोपण, संभाव्य नुकसानींच्या काळज्या, अहंकाराची अवाजवी जपणूक, जग माझ्यासाठी जन्माला आलेलं आणि चाललेलं आहे - अशा स्वरूपाचे अनेक भ्रम, जगाच्या रचनेचं, रचनाकाराचं, वैविध्याचं नसलेलं ज्ञान-भान, एकूण अज्ञान, पण ज्ञानाचे मात्र भ्रम - अशा असंख्य गोष्टींची एक गोळाबेरीज म्हणजे हे आपलं मन. पायावरून हत्तीला खांबासारखा ठरवणारं. ते जगाचं असंच अपुरं मोजमाप करतं. जगात अविरत घडत असलेल्या बदलांची नोंद घ्यायला असमर्थ असतं. ढोंग करण्यात ते प्रवीण असतं. त्याला सारं कळतं, असं ते भासवतं. पण ते प्रत्यक्षात मात्र अपूर्ण आणि अज्ञानी असतं.

स्वतःला कुणीतरी 'विशेष' समजणाऱ्या मनाला सर्वांत मोठा पहिला धडा हा हवा आहे की,आपण या जगाच्या विशाल पटावर एखाद्या बिंदूचंही स्थान नसलेले सामान्य, नगण्य, पोटभरू,नोकरचाकर, व्यावसायिक मन आहो.कुणी आदर्श-असामान्य मन नव्हे. माझ्या मनाप्रमाणं जगात काही घडायला हवंच असेल, तर त्यासाठी आधी माझं मन आदर्श घडवावं लागेल. आजच्या माझ्या क्षुद्र पण स्वतःला फार मोठं लेखणाऱ्या विकाराग्रस्त मनाप्रमाणं घडण्याची तर अजिबात गरज नाही.

आपल्या आजच्या मनाप्रमाणं न घडलं, तरच उलट आपलंच काय, जगाचंसुद्धा काही भलं होण्याची शक्यता आहे. जर माझ्या मनाप्रमाणं होत नसेल तर, ईश्वराचे उपकारच आहेत ! कारण माझं मन क्षुद्र आहे, स्वतःपुरतं पाहणारं, अहंकारी आहे !

म्हणून या रागाला आवर घालायला मनालाच पहिला प्रश्न विचारावा की, 'तुझ्यासारखं सर्वांनी वागायला हवं, असं वाटणारं तू कोण एवढं लागून गेलं आहेस?' दुसरं म्हणजे, ते जर परिपक्व नाही, उदात्त नाही, त्याग करीत नाही, झळ सोसत नाही, मानअपमानापलीकडं जात नाही, विश्वात्मक होत नाही तर, माझ्या मनाप्रमाणं घडण्याची अपेक्षा करणंच चुकीचं आहे. अर्थातच मनाप्रमाणं न घडलं तर रागावण्याचा प्रश्नही येत नाही. म्हणजे माझ्या बाजूनं रागाला कारण उरत नाही.

राहाता राहिला इतरांच्या मनाप्रमाणं घडण्याचा विचार. वास्तविक, समजा वर म्हटलं इतकं माझं मन मी परिपक्व करू शकत नसेन, तर तीच परिस्थिती मला इतरांच्या बाबतीतही गृहीत धरावी लागेल. मला जर अजून परिपक्व होता येत नसेल, तर त्याही व्यक्तीला त्याच मर्यादा कदाचित असतील. स्वाभाविक त्याला जलद राग येत असेल. मग मला हे कळत असल्यामुळं मला आधी शांत रहावं लागेल. आपली समजूत जास्त तर मग आपण तरी शांत रहाणं आपलं कर्तव्यच. उलट त्या अपरिपक्व मनाला समजून घेणं, वेळी क्षमा करणं, त्याला परिपक्वतेची कल्पना आणून देणं, आपण केलेले प्रयत्न, त्यातल्या अडचणी, प्रगतीची गरज, त्याचे होणारे फायदे...असं बरंच काही काम आपल्याला न रागावता आधी करावं लागेल. म्हणजेच दुसरा रागावला म्हणूनही मी रागावण्याचा प्रश्न मिटतो.

काहींना हीसुद्धा शंका येऊ शकेल की, 'रागा'ला माणसाच्या जगात काही स्थान आहे की नाही ? आपल्यासमोर कुत्रं येऊन उभं राहिलं आहे, आपण बोलत उभे आहोत तर 'हे श्वानमित्रा, तू जरा निघून जाशील का ?' वगैरे बोलायचं का ? अर्थात नाही, हे उघडच आहे. त्याला काही रागाचे शब्द वापरूनच हाकलता येईल. पण त्यापेक्षा आणखी काही विघातक करणं - उदा. दगड मारणं इ.- टाळणं शक्य आहे. रागाला काही स्थान मानवी जीवनात जरूरच असेल. फक्त ते ओळखून आपण त्यांना 'वापरायला' शिकलं पाहिजे ! राग ही मनातली एक मालमत्ता आहे खरी. पण ती जपून आणि नाइलाजानं वापरण्याची गोष्ट आहे. कारण,अखेर ती घातक

आणि विनाशक असल्यानं तिच्या वापराची योग्य माहिती, गरज, त्यावरचं नियंत्रण - ही सारी कल्पना त्या माणसाला हवी.

हेच वरच्या उदाहरणात पाहिलं तर आपण कुत्र्याला रागावलो खरं. त्यानं आपलं कामही झालं. पण पुढं कुत्र्यावरच नव्हे तर आपल्या कामावरही त्याचा काहीच दुष्परिणाम झाला नाही अन् आपण बोलायला मोकळे झालो. आपलं मूळ काम अधिक चांगल्या तऱ्हेनं करू लागलो.

खरं तर, रागावणाऱ्याला राग ही आपली मिरवण्याची मालमत्ता वाटते, इथंही गडबड आहे. कारण त्याची ती मालमत्ता असती तर तो राग त्याच्या ताब्यात राहिला असता. आज तर उलट हाच रागाच्या ताब्यात आहे. आता रागाचं स्थान नोकराचं नसून मालकाचं झालं आहे. म्हणूनच राग आज इतके अनर्थ करतो आहे. नोकर म्हणण्यात हाही भाव आहे की, ती गोष्ट वडिलोपार्जितही नाही आणि एखाद्याला हा नोकर लागणारही नाही !

झेन गुरू हे तसे एखाद्या अशा मूळ प्रश्नावर चटकन पण मोलाचा प्रकाश टाकून आपल्याला विचार करायला लावणारे आहेत. अशा गुरूंकडं एक शिष्य गेला आणि विचारलं, 'माझा राग अनेकदा माझ्या ताब्यात राहात नाही. मी काय करू ?' गुरूंनी आश्चर्य व्यक्त करीत म्हटलं, 'तुझ्याकडं काही तरी विलक्षण गोष्ट दिसते आहे. माझ्या लक्षातच येत नाही. ती तुझ्या ताब्यात न राहणारी तुझी ती गोष्ट जरा मला दाखवशील का ?' शिष्य उत्तरला,'आत्ता या क्षणी तरी मला ते शक्य नाही !' गुरू म्हणाला, 'मग तू ती गोष्ट मला केव्हा दाखवू शकशील ?' शिष्य म्हणाला, 'अत्यंत अनपेक्षितपणे येते हो ती !' गुरूनं स्पष्ट केलं, 'मग लक्षात ठेव, ती मुळात तुझी गोष्ट नसली पाहिजे ! तुझ्यात ती असती, ती तुझी असती तर, ती तुला केव्हाही दाखवता आली असती. तुला जन्मतः मिळालेली ती मालमत्ता नव्हे. ती तुझ्या पालकांनीही तुला दिली नाही. एवढं पुरे. आता तू विचार कर जरा यावर !'

तसा विचार केला तर इतकं तिला काही हातपायडोळ्यांसारखी जन्मजात मालमत्ता समजायचं कारण नाही, हेही खरं आहे. जीव जशी मनाची घडण घेऊन आला, त्यावर जे बाह्य संस्कार झाले, किंबहुना आपण बेसावधपणे जे होऊ दिले, त्यांचा तो परिणाम आहे. स्वकष्टार्जित मालमत्तेचासुद्धा तिला दर्जा नाही. आपण

रागवलंच पाहिजे,अशी उलट आपल्यावर सक्ती नाही. कदाचित अजिबात न रागवताही आपलं सबंध आयुष्य आनंदात जाऊ शकेल आणि अर्थातच त्यामुळं इतरांचंही.

राग वापरण्याला आणखीही एक विधायक बाजू आहे. उपाय आहे. तो असा की, आपल्याला एरवी राग कशासाठी नि कुणामुळं येतो, ते पाहावं. असं आढळेल की, आपल्या मनाविरुद्ध झाल्याचा नि तसं करणाऱ्यांचा राग येतो. मग पुढं असा विचार करावा की, मला आयुष्यात अनेक चांगल्या गोष्टी करायच्या असतात. त्या माझ्याच मनानं विचारपूर्वक ठरवलेल्या असतात. समजा, एखादं ज्ञानेश्वरी पारायण करायचं आहे, शांत रहायचं आहे, चांगलं वागायचं आहे, जिभेवर ताबा ठेवायचा आहे, निरपेक्ष राहायचं आहे. पण तशा संधी येऊनसुद्धा माझ्या मनाप्रमाणं मला वागता येत नाही. आता मनाप्रमाणं वागता येत नाही, याचा मला राग का येत नाही ? एरवी येणारा राग जर याच कामी आला, तर मनाला मोडून काढायला तोच राग वापरता येईल. असला राग जितका जास्त, तितकी उलट आपली माणूस म्हणून प्रगती जास्त. आता तोच राग जिभेला आवर घालायला, चांगलं वागायला, पारायणाला शक्ती देऊन जाईल, आपल्याला मदत करील, आपल्याला वापरता येईल.

तसं तर बॉम्बगोळ्यांनाही स्थान आहे. पण ते देशाला वाचवणाऱ्यांच्या, सैनिकांच्या हाती-रणांगणावर आणि वापरही-देशाच्या शत्रूंसाठी, वैयक्तिक अहंकारासाठी नव्हे. नागरी जीवनात त्यांना स्थानही नाही, त्यांची गरजही नाही.

उगीच वाडवडिलार्जित मालमत्ता समजून त्यांना घरोघरी ठेवलं नि वापरलं तर, आज होऊ घातली आहेत तशी कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात रणांगणं घडतील. ज्यात सर्वांचंच अहित आहे, खरं ना ? कारण ही रागाची मालमत्ता असलीच तरी, घातक आहे, नाइलाजानं, जपून, समजून आणि खरं तर न वापरायचीच गोष्ट आहे !

*

१३. बासरी

सकाळची गडबडीची वेळ. उठायला उशीर. चहानं दिवस सुरू व्हायचा. त्याऐवजी घरातून हाक आली. लक्षात आलं. दूध नासलं. नेहमीचं दूध उशिरा येई. आता न तापवता दूध राहिलं, की फ्रीजमध्ये टाकायचं राहिलं - वगैरे चर्चा करण्याएवढा वेळ नाही आणि उपयोगही नाही. मुकाट्यानं पैसे-पिशवी घेऊन अपार्टमेंटच्या पायऱ्या उतरून किराणा दुकानाकडं निघालो, काय एकेक कटकट एकेका दिवशी उभी राहील ते सांगता येत नाही, अशा त्राग्यानंच.

तोवर वाटेत मागून आवाज आला, 'हां, चालव बिनधास्त. मी सीट धरली आहे !' आवाज रघुनाथरावांचाच. वळून पाहिलं तर सकाळची कमी गर्दीची वेळ, म्हणून धाकट्या मुलाला सायकल शिकवीत ते पळत होते. मुलगा सायकल शिकत असल्यानं त्यांना सायकलच्या सीटला धरून पळावं लागत होतं. त्यामुळं ते फक्त हसले आणि हात करून मला मागं टाकून पुढं गेले.

संध्याकाळी ऑफिसमधून घरी स्कूटरवरून परत येत होतो. एक मित्र बसला उभे दिसले. त्यांनीही पाहिलं. हात केला. आता तसंच जाणं बरोबर वाटेना. म्हणून पुढं जाऊन साइडला थांबलो. ते पळत आले. ते आमच्या घराच्या जवळच राहात असल्यानं त्यांनाही बरोबर येणं सोयीचंच होतं. वाटेत ते मागून बोलत होते. 'आज जरा वेळ झाला. मीटिंग. साहेबांनी झापलं. अर्थात चुका आमच्याच होत्या.'

मी सहज विचारलं, 'कोण साहेब तुमचे, आपले ते नेहमीचेच ना ?' त्यावर ते म्हणाले, 'ते नाही. त्यांचा सेक्शन बदलला. आता तुमचे मित्रच सेक्शनला हेड आहेत आमचे !' मी विचारलं, 'कोण रघुनाथराव ?' ते म्हणाले, 'हो ! त्यांनी सकाळीच सगळा आढावा घेतला होता. त्यांना डिपार्टमेंटहेडनी फाइल घेऊनच बोलावलं होतं. ते आत अर्धा तास त्यांच्या टेबलाजवळ उभे होते. त्यांची हजेरी झाली असणार. तेव्हाच आम्ही ओळखलं, आज संध्याकाळी बहुतेक आता आमची मीटिंग होणार. झाली. त्यांचं कर्तव्यच आहे. तसा चुकारपणाही वाढला आहे.' मागं बसलेल्या माणसाची नॉनस्टॉप कॉमेंटरी ऐकून आपण उगाचच ही कटकट मागं बसवून घेतली की काय, असं मात्र मला वाटून गेलं.

वाटेत मित्राला सोडून मी घरी परतलो. स्कूटर लावली. आवरून गॅलरीत खुर्ची टाकून मोकळ्या हवेला बसलो. तोवर समोरच्या बंगल्यातून गेट उघडल्याचा आवाज आला. रघुनाथरावांना दोन मुलगे होते. थोरला अपंग होता. त्याला सेरेब्रल पाल्सी. हात आखडलेले, पाय नीट उघडत नसत. त्याला खांदा देतदेत रघुनाथरावांनी गेटपर्यंत चालवत आणलं होतं. त्या मुलाकडं बघितलं तरी, माझ्या डोळ्यांत पाणी येई. पण रघुनाथरावांचा चेहरा रात्रीच्या ट्यूबच्या प्रकाशातही प्रसन्न दिसत होता.

ते त्या मुलाला उत्साहानं सांगत होते, 'मन्या, कालच्यापेक्षा आज चांगलीच प्रगती आहे बरं का ! हळूहळू आधार न घेता तू गेटपर्यंतच काय, बाहेरसुद्धा चालशील.' त्याच्या चेहऱ्यावरचं फिकट हास्य मला कठड्यावरून दिसत होतं. वास्तविक, मलाच काय त्यांनाही जाणीव होती की, प्रगती सोडाच, आयुष्यसुद्धा किती वर्षं लाभेल, हे सांगता येत नव्हतं. पण रघुनाथराव शांतपणे त्याला खांद्याचा, हाताचा आधार देऊन चालवीत आत घेऊन गेले.

मला साध्या दुधावरून माझा झालेला त्रागा आठवला. ऑफिसमध्ये कामावरून उशीर झाल्यामुळं मनाशी झालेली चिडचीड आठवली. मित्राला गाडीवरून आणताना मनात येऊन गेलेली नाखुशी आठवली. मनोमन खेदही वाटला. तसे माझ्यासारखे अनेक लोकही आठवले. कामांच्या तक्रारी, महागाईच्या तक्रारी, आजारपणांना त्रासलेले, सहकाऱ्यांवर नाराज - असे अनेक. त्यांचे वादविवाद. मतभेद. भांडणं. अनेकदा विध्वंसक निर्णय - कुठं वेगळी बिऱ्हाडं, कुठं वृद्धाश्रम, कुठं अनाथालयं, कुठं घटस्फोट. अशा अनेक गोष्टी आठवत होत्या आणि मनात विचार सुरू होते.

रात्री जेवणं झाल्यावर निवांतपणे फिरून यावं म्हणून आम्ही दोघंही बाहेर पडलो. रघुनाथरावांच्या घरात पहाणं प्रशस्त वाटत नव्हतं. पण मोठ्या काचेच्या उघड्या तावदानातून सहजच दिसत होतं. त्यांच्या नव्वदीच्या घरातल्या आईला ते कॉटवर उठवून बसतं करीत होते. ती त्यांच्याकडं ज्या आशेच्या नजरेनं पहात होती, ती नजर विसरणंसुद्धा कठीण होतं. रघुनाथरावांचं हास्य कायम होतं. तिला कॉटच्या तक्क्याला टेकवून त्यांनी बसतं केलं. शेजारची खुर्ची ओढून ते शेजारी बसले. समोरच्या स्टूलवरचा ग्रंथ उघडला. मला अंदाज होता. ते रामचरितमानस असणार

किंवा असंच काही. आईला ते वाचायची आवड नि आयुष्यभराची सवय. आता आईला डोळ्यांना दिसत नाही, तेव्हा ते तिला आता छान टेकवून बसवतील आणि तिला डुलकी येईपर्यंत आनंदानं वाचत बसतील. जणू काही त्यांनाच त्या 'रामचरितमानसा'चं वेड आहे. तिला डुलकी आली की, ते अलगद तिला झोपवतील.

मग वहिनींच्या दिवसभराच्या घडामोडी ऐकणं. नातेवाईक, मित्रमंडळी, कुणाकडून आलेले फोन-निरोप - सारं दिवसभरातलं तितक्याच उत्सुकतेनं पत्नीकडून ऐकून घेणं. कुठले निर्णय देणं-निरोप सांगणं. पत्नीच्या कुणाबद्दल तक्रारी,आलागेला, घरातलं संपलंसवरलं- सारं ते समजून घेणार-तितक्याच उत्साहानं, शांतपणानं !

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता सहज खाली रस्त्यावर लक्ष गेलं. रघुनाथराव अगदी साध्या वेशात गडबडीनं रस्त्यावरून येत होते. मी अंदाजानंच ओळखलं, कुणीतरी गेलं. म्हणून मी खूण केली, 'कोण ?' ते तिथूनच म्हणाले, 'अण्णासाहेब !' अण्णासाहेब तसे तरुण आणि ओळखीचेही. मी पटकन खाली गेलो. सकाळी साडेसहालाच त्यांना निरोप आला होता. ते लगेच तिकडं. फक्त म्हणाले, 'संध्याकाळी भेटू. आज जरा गडबड आहे. एक व्हिजिट आहे.'

संध्याकाळी मात्र मी त्यांना फोन करून त्यांची वेळच घेतली. त्यांच्या बंगल्यातल्या त्यांच्या खासगी खोलीत आम्ही बसलो. मला वाटत असलेलं, सारं मी मोकळेपणानं त्यांना सांगितलं आणि विचारलं, 'तुम्हाला तितक्याच उत्साहानं, शांतपणानं, कुणावर न त्रागा करता - हे इतकं सारं जमतं कसं ?'

ते थोडं इकडंतिकडं बोलले पण शेवटी न राहावून मी विचारलं, 'तुम्ही काही आध्यात्मिक बैठक, पंथ मानत नाही, कुठलं साधन करताना तर दिसत नाही..'

मला काय म्हणायचं आहे, त्यांच्या लक्षात आलं. अत्यंत सहजपणानं त्यांनी खोलीच्या एका बाजूच्या कॉर्नरपीसवर ठेवलेल्या सुरेख बासरीकडं बोट केलं. मला तर तेवढ्यावरून काही फारसा उलगडा झाला नाही. मी प्रश्नार्थक मुद्रेनं म्हटलं, 'ही तर बासरी आहे !'

रघुनाथराव म्हणाले, 'खरं आहे. पण ती माझा गुरू आहे ! पहा ना, कुठल्यातरी एखाद्या बांबूची नळी. कुणीतरी तिला आकार दिला, बासरीचं स्वरूप दिलं, तिच्यात हवा खेळती राहीलशी व्यवस्था केली. जगाला संगीताचा आनंद देईल

याचं साधन तिला बनवलं. तिचं स्वतःचं कर्तृत्व ते काय ? तेच आपल्या या शरीराचं आहे ना ?'

स्वतःकडं बोट करून म्हणाले, 'हीसुद्धा तशी बासरीच आहे. कुणी आकार दिला, नाक-डोळे-कान-पाय दिले. कार्यासाठी सज्ज केलं. कोण जो निसर्ग असेल, परमात्मा असेल त्याची ती बासरी आहे. तो रोज फुंकर घालतो आहे ना, न दमता. एक कवडी न घेता. आता आपल्या परिस्थितीनुसार कर्तव्यांचे राग आणि धून आळवायला आपण सज्ज नको का व्हायला ? बरं, बासरीत जशी हवा खेळती ठेवून ती संगीताला सज्ज ठेवली आहे, तशी या शरीराच्या बासरीतही परमात्मा श्वासोच्छ्वासाची फुंकर अविरत घालतो आहे. आपल्याला कर्तव्य करायला सज्ज करतो आहे. मग येईल त्या कर्तव्याप्रमाणं, परिस्थितीप्रमाणं सुसंवादी सूर आपल्या या शरीराच्या बासरीतून उमटायला काय अडचण आहे ?

'बासरीची तरी कुठं तक्रार असते, म्हणणं असतं की, हाच सूर लावा, तो लावू नका, शुद्ध हवा, कोमल हवा, तीव्र नको, हा सप्तक नको, तो हवा - काऽऽही नाही ! परमात्मा बोट ठेवील तेव्हा जे उमटायला हवे ते स्वर, जसे हवे तसे, निरंतर उमटले म्हणजे झालं ! आपल्या या शरीराची सुसज्ज बासरी आपल्या हाती कर्तव्य करायला रोज सोपवली जाते, याबद्दल मीच कृतज्ञ असतो, रोज. त्यामुळं तुम्हाला वाटतं की, मी तितक्याच उत्साहानं, शांतपणे इतक्या वेगवेगळ्या परिस्थितीत राहातो. वास्तविक, परमात्म्याची इच्छा बदलली, बोटं बदलली की, बासरी नाही का नव्या रागात तन्मय होत ? ती नाही मागच्या गाण्यात रेंगाळत. हेच जीवनसंगीत ! ते तर अतूट आहे. आनंदाचं आहे. कृतज्ञतेचं आहे. हे शिकायला पुरी होते एवढी बासरी !'

जगातले इतके विसंवाद, त्रास, कधी चुकून सुखाचा शिडकावा, विपरीत परिस्थिती, मनाविरुद्ध घडणाऱ्या अनेक गोष्टी - अशा साऱ्या चित्रविचित्र पार्श्वभूमीवर मला मात्र त्याक्षणी कधीही सुरेल रहाणारं जीवनसंगीत दोन ठिकाणांहून ऐकू येत होतं - एक बोलत्या झालेल्या बासरीतून आणि दुसरं कोपऱ्यात कॉर्नरपीसवर उभ्या केलेल्या बासरीतून !

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. **पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. **अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. **कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. **श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)** श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. **संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. **श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. **उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. **अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. **श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. **अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. **अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. **जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. **स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद


७८. **वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. **अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. **वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. **भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***



...जगातले इतके विसंवाद, त्रास, कधी चुकून सुखाचा शिडकावा, विपरीत परिस्थिती, मनाविरुद्ध घडणाऱ्या अनेक गोष्टी - अशा साऱ्या चित्रविचित्र पार्श्वभूमीवर मला मात्र त्याक्षणी कधीही सुरेल रहाणारं जीवनसंगीत दोन ठिकाणांहून ऐकू येत होतं - एक बोलत्या झालेल्या बासरीतून आणि दुसरं कोपऱ्यात कॉर्नरपीसवर उभ्या केलेल्या बासरीतून !